# लोकलेखा समिती

## (२०१५-२०१६)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ च्या स्थानिक संस्था अहवालामधील ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, शालेय शिक्षण, नगरविकास, महसूल, वन व सहकार विभाग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२, २.३) व नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.२)**

# बाविसावा अहवाल

सत्यमेव जयते

**(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास**
**दिनांक , २०१७ रोजी सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**विधान भवन, मुंबई/नागपूर**
**जुलै/ऑगस्ट, २०१७**

# लोकलेखा समिती

## (२०१५-२०१६)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ च्या स्थानिक संस्था अहवालामधील ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, शालेय शिक्षण, नगरविकास, महसूल, वन व सहकार विभाग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२, २.३) व नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.२)**

# बाविसावा अहवाल

एचबी १२९८—१

# लोकलेखा समिती
## २०१५-२०१६

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

*(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

**(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(२४अ) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक १ मे २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

---

* श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर २०१६ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

** श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी उप सभापती, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ रोजी समिती सदस्य म्हूणन नामनियुक्ती केली.

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ चा स्थानिक संस्था अहवालामधील ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) (परिच्छेद क्र. २.२ व २.३) व नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.२) यावर विचार करून लोकलेखा समितीचा बाविसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १६ फेब्रुवारी, २ मार्च व ८ जून, २०१६ रोजी प्रधान सचिव, ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सचिव, महसूल व वन, सहकार, नगरविकास विभाग तसेच दिनांक ७ जून २०१६, रोजी सचिव, नगरविकास विभागाच्या सचिवांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट “अ” मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक ११ व १३ जुलै, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई/नागपूर,
दिनांक १३ जुलै २०१७.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** ... ... ... ... ... | (पाच) |
| (१) | ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, शालेय शिक्षण, नगरविकास, महसूल, वन व सहकार विभाग) विभाग ... (परिच्छेद क्र. २.२, २.३) ... ... ... ... | १ |
| (२) | नगरविकास विभाग (परिच्छेद क्र. ५.२) ... ... ... ... | ५९ |

## (अ) ग्रामविकास व जलसंधारण विभाग

### (ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, शालेय शिक्षण, नगरविकास व महसूल व वन विभाग)

१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र.२.२ " पंचायती राज संस्थांची जमा " तसेच परिच्छेद क्र. २.३ " शासकीय निधीची अडवणूक " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील आक्षेप घेतलेले आहेत.

**२.२ पंचायती राज संस्थाची जमा**

**२.२.१ प्रस्तावना :**

१.१ विद्यमान अधिनियमांमध्ये म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ (ZP and PS Act) आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (VP Act) सुधारणा करून राज्यात जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदा (ZPs), गट स्तरावर पंचायत समित्या (PSs) आणि गाव स्तरावर ग्राम पंचायती (GPs) यांचा समावेश असलेली पंचायत राज संस्थानी (PRIs) त्रिस्तरीय व्यवस्था प्रस्थापित करण्यात आली होती.

PRIs च्या जमांमध्ये केंद्र शासनाकडून (GOI) आणि महाराष्ट्र शासनाकडून (GOM) मिळणारे अनुदान आणि त्यांच्या स्वतःच्या स्त्रोतातून होणारी प्राप्ती सम्मिलित असते. PRIs च्या स्वतःच्या स्त्रोतात PRI स्तरावर जमा होणारी महसुल आणि GOM ने PRIs नां दिलेल्या महसुली हिश्श्याचा समावेश असतो.PRIs च्या स्वतःच्या महसुलात मालमत्ता कर, पाणी कर, विद्युत कर, सामान्य स्वच्छता उपकर, भाडेपट्टी इत्यादी करांचा समावेश असतो. GOM ने मिळणाऱ्या महसुली हिश्श्यात जमीन महसुल उपकर, मुद्रांक शुल्क अनुदान, वन महसुल अनुदान, वाहन कर अनुदान, व्यवसाय कर अनुदान, अभिकरण शुल्क इत्यादींचा समावेश असतो. PRIs कडून जमांचा उपयोग विकास कामांसाठी आणि मुलभूत नागरी सेवा देण्यात सुधारणा करण्यासाठी केला जातो.

वर्ष २००९-१४ दरम्यान, ७५ GPs आणि २५ PSs सह ३३ ZPs पैकी आठ ZPs च्या दस्तऐवजांची, GOM कडून PRIs नां प्राप्त झालेली अनुदाने वेळात प्राप्त झाली होती अथवा नाही, ती पर्याप्त होती अथवा नाही आणि कर आकारणी आणि संकलनाची प्रणाली कार्यक्षम होती अथवा नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी चाचणी तपासणी करण्यात आली होती.

**ज्ञापन :**

१.२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदरील परिच्छेद ही प्रस्तावना असून, वर्ष २००९-१४ दरम्यान, ७५ GPs आणि २५ PSs सह ३३ ZPs च्या दस्तऐवजांची, GOM कडून PRIs ना प्राप्त झालेली अनुदाने वेळात प्राप्त झाली होती अथवा नाही, ती पर्याप्त होती अथवा नाही आणि कर आकारणी आणि संकलनाची प्रणाली कार्यक्षम होती अथवा नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी चाचणी तपासणी करण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदरील परिच्छेदामध्ये कोणताही आक्षेप उपस्थित करण्यात आलेला नाही.

**२.२.२ : लेखापरीक्षेची निष्पत्ती :**

**पंचायत राज संस्थाच्या स्वतःच्या स्त्रोतांकडून झालेल्या कमी जमा**

वर्ष २००९-१४ दरम्यान PRIs च्या जमांचे स्त्रोत तक्ता १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे होते.

**तक्ता १ : PRIs चे २००९-१४ दरम्यानचे जमांचे स्त्रोत.**

(रु. कोटींत)

| अ.क्र | जमांचे स्त्रोत | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | एकूण जमा | एकूण जमेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | सर्व GOM योजनांखालील योजनांना राज्य शासनाची अनुदाने. | ११७२६.६२ | १३२६०.९३ | १४२९४.७३ | १६४४४.४२ | १८१८४.७३ | ७३९११.४३ | ८५.६९ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सर्व केंद्र पुरस्कृत योजनांकडून GOI कडून अनुदाने | १८९०.३१ | २२८४.७० | १७७१.०१ | ९९८.३० | १२२०.०३ | ८१६४.३५ | ९.४७ |
| ३ | स्वतःचे स्त्रोत | ३७६.९६ | ६५६.८१ | ७०६.२७ | ८४९.६५ | १५८०.२७ | ४१६९.९६ | ४.८४ |
| | **एकूण ...** | **१३९९३.८९** | **१६२०२.४४** | **१६७७२.०१** | **१८२९२.३७** | **२०९८५.०३** | **८६२४५.७४** | |

तक्ता १ वरून असे दिसून येते की, वर्ष २००९-१४ दरम्यान झालेल्या एकूण प्राप्तीच्या तुलनेत PRIs ची स्वतःच्या स्त्रोतातून झालेली प्राप्ती ही अत्यल्प म्हणजे ४.८४ टक्के होती तर GOM कडून एकूण प्राप्तीच्या तुलनेत झालेली प्राप्ती ८५.५९ टक्के होती.

**ज्ञापन :—**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ च्या स्थानिक संस्था अहवाल क्र. ६ मधील परिच्छेद क्र. २.२.२ बाबत महालेखापालांनी दिलेल्या अभिप्रायाबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :—

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८, कलम १२४ व त्याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील तरतुदींनुसार पंचायतींना पुढील कर व फी आकारण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत—

(१) गावाच्या सीमेतील इमारती व जमीनीं यावरील कर.

(२) [वगळले].

(३) यात्रेकरूंवरील कर.

(४) जत्रा, उत्सव व इतर करमणूकी यांवरील कर.

(५) सायकली व जनावरांकडून ओढल्या जाणाऱ्या वाहनांवरील कर.

(६) संविधानाच्या अनुच्छेद २७६ च्या उपबंधास अधीन राहून पुढील व्यवसाय, व्यापार, आजीविका किंवा नोकऱ्या यांवरील कर :-

(अ) दुकान चालवणे व हॉटेल चालवणे.

(ब) वाफेवर, तेलावर, विद्युतशक्तीवर किंवा शारीरिक श्रमाने चालणाऱ्या यंत्राच्या साहाय्याने चालविलेला (शेतीव्यतिरिक्त) कोणताही व्यापार किंवा आजीविका.

(क) गुरांच्या बाजारातील दलालीचा धंदा किंवा आजीविका.

(७) सामान्य स्वच्छता उपकर.

(८) सामान्य पाणीपट्टी (आठ-अ) दिवाबत्ती कर.

(९) संविधानान्वये राज्य विधानमंडळास जो कर बसविण्याची शक्ती प्रदान केली आहे, व जो राज्य सरकारने मंजूर केला आहे असा [(मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८, कलम २० मध्ये उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त मोटार वाहनांवरील कर किंवा पथकर नसलेला)] इतर कोणताही कर.

(१०) बाजार व आठवड्याचे बाजार यावरील फी.

(११) गाड्यांचा व टांग्यांचा तळ यावरील कर.

(१२) पंचायतींकडून नळाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या पाण्याबद्दल खास पाणीपट्टी.

(१३) पंचायतीमध्ये निहित असलेल्या विहिरी व तलाव यांमधून घरगुती उपयोगाव्यतिरिक्त व गुरांव्यतिरिक्त इतर प्रयोजनांसाठी पुरविलेल्या पाण्याबद्दल फी.

(१४) कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर तात्पुरते इमले उभारणे, उपांगे ठेवणे किंवा तिचा तात्पुरता भोगवटा करणे याबद्दल फी.

(१५) खास स्वच्छता उपकर.

(१६) जमीनीवर मग ती पंचायतीच्या मालकीची असो किंवा नसो बांधलेली मलकुंडी साफ करण्याबद्दलची फी.

(१७) पंचायतीमध्ये निहित असलेल्या गुरे चारण्याच्या जमीनीवर गुरे चारण्याबद्दलची फी.

(१८) गुरांच्या नोंदणीसाठी फी.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ४५, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये योग्यरित्या पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या उत्पनापेक्षा पंचायतीचे उत्पन्न कमी असेल व पंचायतीने आवश्यक त्या मर्यादेपर्यंत आपले उत्पन्न वाढविण्यास कसूर केल्यास, कलम १२४ मध्ये विनिर्दिष्ट केलेले कर किंवा फी यांपैकी कोणतेही कर किंवा फी वाढविण्यास पंचायत समिती संबंधित ग्रामपंचायतीला फर्मावू शकते.

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० नुसार आकरण्यात येणाऱ्या विविध कर व फी मध्ये इमारती व जमीनीवरील कर हा ग्रामपंचायतींच्या आर्थिक उत्पनाचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. इमारती व जमीनीवरील कराची भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी करण्याबाबत हरकती व सूचना मागविण्यासाठी शासन अधिसूचना क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१४०/पंरा-४, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी प्रसिद्ध करून दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी प्रसिद्ध करून दिनांक ७ डिसेंबर, २०१५ पर्यन्त हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

उक्त अधिसुचनेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी करण्याबाबतची अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. इमारती व जमीनीवरील कराची भांडवली मुल्यावर आधारित आकारणी केल्यामुळे ग्रामपंचायतींचे आर्थिक उत्पन्न वाढणार आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ कलम १२४ व त्याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० नुसार दिनांक ०६ मार्च, १९९७ च्या अधिसुचनेन्वये दरडोई पाणीपट्टीचे किमान व कमाल दर ठरविण्यात आले होते. तथापि, शासन अधिसूचना दि. १७ जानोवारी २००२ नुसार कमाल मर्यादा काढून टाकण्यात आलेली असून फक्त किमान दर निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा योजना सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असणारा खर्च व उत्पनात वाढ या बाबी लक्षात घेऊन निर्दिष्ट केलेल्या किमान दरांपेक्षा कमी नाही अशा दराने विशेष पाणीपट्टीचे दर निश्चित करता येतात.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ कलम १३३ व त्याअंतर्गत महाराष्ट्र जिल्हा (ग्रामविकास निधीबाबत) नियम, १९६० मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ६२, पोट-कलम (३) अन्वये पंचायतींनी दिलेल्या अंशदानातून जिल्हा ग्रामविकास निधीची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ४५ मध्ये निर्दिष्ट केलेली अधिकार व कर्तव्ये पार पाडण्याकरिता पंचायतींना जिल्हा ग्रामविकास निधीमधून कर्ज वितरित करण्यात येते. यामध्ये व्यापारी गाळे बांधकामासाठी कर्ज देण्यात येते. व्यापारी गाळे भाडेतत्त्वावर देऊन ग्रामपंचायती स्वतःचे उत्पन्न वाढवू शकतात.

### २.२.३ अनुदानांची प्राप्ती आणि वाटप

#### २.२.३.१ व्यवसाय कर अनुदानात सुधारणा न करणे :—

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, उपजिविका आणि रोजगार कर कायदा, १९७५ (PT) च्या अंमलबजावणीपूर्वी, राज्यांतील १५ जिल्ह्यांतील स्थानिक प्राधिकारी व्यवसाय कर आकरत होते. PT कायदा अस्तित्वात आल्यापासून, स्थानिक प्राधिकाऱ्यांचे व्यवसाय कर आकारण्याचे अधिकार काढून घेतले गेले. PT कायद्यामध्ये, GOM कडून स्थानिक प्राधिकाऱ्यांना वार्षिक अनुदान प्रदान करण्याची तरतूद आहे, ज्या रकमेचे प्रगणन PT कायद्याच्या अंमलबजावणीच्या त्वरित अधिच्या तीन वर्षांच्या कुठल्याही वर्षी, स्थानिक प्राधिकरणाने संकलित केलेल्या जास्तीत जास्त रकमेवर केले जाते. अशा प्रकारे, महाराष्ट्र शासनाने एकूण वार्षिक अनुदानाची रक्कम रु. २७.४२ लाख ठरविली होती. आणि १९७५ पासून १५ जिल्ह्यांना ही दरवर्षी दिली गेली होती.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की, लोकसंख्या/रोजगार यात वाढ झाल्यामुळे व्यवसाय कराचे संकलन अनेक पटीने वाढले होते. वर्ष २००९-१४ दरम्यान राज्यात व्यवसाय कराचे एकूण संकलन रु. ७,६१२.७८ कोटी इतके झाले होते. तथापि, या १५ ZP नां वाढीव व्यवसायाच्या कराच्या प्रमाणात PT अनुदानाने निर्देशांकीत केली गेली नव्हती परिणामी या ZPs नां महसूल वाढीच्या लाभापासून वंचित रहावे लागले.

ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाने असे सांगितले की (ऑगस्ट २०१४). रु २७.४२ लाख रक्कम कायद्यातील तरतुदीप्रमाणे निर्धारित आणि प्रदान केली गेली होती तसेच ZPs हिश्श्यात वाढ व्हावी यासाठी विभाग प्रयत्नशील होता.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील सांविधीक तरतुदीनुसार जिल्हा परिषदांना अनुज्ञेय असलेल्या स्वउत्पन्नविषयक बाबीसाठी उदा. अधिनियमाच्या कलम २८८, अनुसूचि ११ अन्वये जिल्हा परिषदांना व्यवसाय, व्यापार व आजीविका आणि नोकऱ्या यावरील कर यांकरीता शासनाच्या व्यवसाय कायद्यातील कलम २९ अनुसार रुपये २७.४२ लक्ष इतकी नुकसानभरपाईची रक्कम संबंधित १५ जिल्हा परिषदांना प्रतिवर्षी उपलब्ध करून देण्यात येते.

शासनाने सन १९७५ पासून व्यवसाय कर कायदा लागू केला व ज्या जिल्हा परिषदां पूर्वी व्यवसाय कर वसूल करीत होत्या. त्यांचा व्यवसाय कर वसूलीचा अधिकार कलम २९ ने काढून घेतला आहे. त्या ऐवजी त्यांना, सदरचा कायदा अस्तित्वात येण्याच्या तारखेपूर्वी लगतच्या तीन वर्षात जास्तीत जास्त वसूली झालेल्या वर्षातील रक्कम संबंधीत जिल्हा परिषदांना देय आहे. त्यावेळी ते वसूल करत असलेल्या व्यवसायकराची जास्तीत जास्त रक्कम संबंधित जिल्हा परिषदांना नुकसानभरपाई म्हणून अनुदान स्वरूपात देण्याची तरतूद करण्यात आली. सदर तरतुदीनुसार राज्यातील ३३ जिल्हा परिषदांपैकी संबंधित ज्या १५ जिल्हा परिषद, व्यवसाय कर वसूल करीत होत्या. त्याच १५ जिल्हा परिषदांना एकूण रुपये २७.४२ लक्ष एवढी रक्कम उपलब्ध करून देण्यात येते.

सदर अनुदान पुढील १५ जिल्हा परिषदांना थेट अदा करण्यात येते. (१) ठाणे (२) नाशिक (३) धुळे (४) नंदुरबार (५) जळगाव (६) पुणे (७) सातारा (८) सोलापूर (९) परभणी (१०) हिंगोली (११) नांदेड (१२) भंडारा (१३) गोदिया (१४) चंद्रपूर (१५) गडचिरोली.

सदरचे स्वउत्पन्न विषयक अनुदान हे अत्यल्प प्रमाणात असून स्थानिक विकास विषयक योजना राबविण्यामध्ये जिल्हा परिषदांना आर्थिक अडचणी उद्धभवतात. ही बाब विचारात घेता. व्यवसाय, व्यापार व आजीविका आणि नोकऱ्यांवरील कराविषयी देण्यात येणारे रु. २७.४२ लक्ष एवढया अत्यल्प अनुदानाऐवजी व्यवसायकर कायदा, १९७५ च्या कलम २९ नुसार प्रत्यक्ष वसूल होणाऱ्या व्यवसायकराच्या रकमेपैकी किमान २५% इतकी रक्कम सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करून देण्यात यावी असा प्रस्ताव मंत्रीमंडळाला मान्यतेसाठी सादर केला होता.

याबाबत वित्त विभागाने सदर प्रस्ताव मान्य करणे शक्य नाही. विषयांकित प्रस्तावास सहमती देता येणार नाही. असे अभिप्राय दिलेले आहेत. व्यवसाय करात वाढ करण्याचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.

**२.२.३.२ मोटर वाहन कर अनुदानाची सुधारणा न करणे :**

मुंबई मीटर वाहन कर कायदा, (MVT Act.) १९५८ च्या कलम ११ (२)(ब) नुसार, MTV कायद्याच्या अंमलबजवणी पूर्वीपासून वाहनांवर जी टोलची आकारणी होत होती ती, ३१ मार्च, १९५८ रोजी संपणाऱ्या तीन वर्षांच्या टोल संकलनाचा खर्च अधिक १० टक्के रक्कम वगळून येणारी रक्कम ही त्या स्थानिक मंडळाचे निव्वळ सरासरी वार्षिक उत्पन्न होते. जे राज्य शासनाला प्रतिवर्षी प्रत्येक स्थानिक मंडळाला प्रदान करायचे होते.

या कायद्याच्या अंमलबजावणीपूर्वी, फक्त १४ ZPs मोटर वाहन करावी (MVT) आकारणी आणि संकलन करत होते आणि त्यांचे एकूण वार्षिक संकलन रु. ५.४४ लाख होते, जे महाराष्ट्र शासनाने १९५८ पासून आजतागायत या १४ जिल्ह्यांना वाटप केले होते. राज्याच्या आर्थिक विकासाबरोबर, १९५८ पासून वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. परिणामी, MTV च्या संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे (२०१३-१४ दरम्यान GOM कडून संकलित केलेली या कराची १४ जिल्ह्यांतील रक्कम रु. ३,२१४.०३ कोटी होती) तथापि, या १४ ZPs प्रदान केलेली MTV अनुदान मात्र मोटार वाहन कराच्या वाढीबरोबर निर्देशांकित वाढविली केली गेली नव्हती. परिणामी वाढत्या महसुलाच्या लाभापासून या ZPs वंचित राहिल्या होत्या.

ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाने सांगितले की (ऑगस्ट २०१४.) रक्कम रु. ५.४४ लाख रक्कम ही कायद्यातील तरतुदींनुसार निर्धारित आणि प्रदान केली गेली होती आणि ZPs या हिश्श्यांत वाढ व्हावी यासाठी विभाग प्रयत्नशील होता.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील सांविधीक तरतूदींनुसार जिल्हा परिषदांना अनुज्ञेय असलेल्या स्वउत्पन्नविषयक बाबीसाठी उदा. अधिनियमाच्या कलम २८८, अनुसूचि ११ अन्वये जिल्हा परिषदा अस्तित्त्वात येण्यापूर्वी त्यावेळच्या १४ लोकल बोर्ड व जनपथ या स्थानिक संस्था त्यावेळच्या तरतुदीप्रमाणे मोटार वाहन कर वसूल करीत होत्या. त्या भूतपूर्व १४ स्थानिक मंडळांना (जिल्हा परिषदांना) त्या वेळी

मिळणाऱ्या जास्तीत जास्त वाहन कराची रक्कम, मीटर वाहन कर अधिनियम, १९५८ च्या कलम ११ (२) अन्वये नुकसानभरपाई म्हणून उपलब्ध करून देण्यात येते. त्याकरीता प्रतिवर्षी रु. ५.४४ लक्ष इतके अनुदान शासनाकडून उपलब्ध केले जाते. सदर अनुदान पुढील जिल्हा परिषदांना देण्यात येते. (१) ठाणे (२) रायगड (३) रत्नागिरी (४) सिंधुदुर्ग (५) नाशिक (६) धुळे (७) नंदुरबार (८) जळगाव (९) अहमदनगर (१०) पुणे (११) सातारा (१२) सांगली (१३) सोलापूर (१४) कोल्हापूर.

सदर मोटार वाहन कराविषयी देण्यांत येणार रु. ५.४४ लक्ष एवढया अत्यल्प अनुदानाऐवजी राज्यभरातील सर्व जिल्हा परिषदांच्या कार्यक्षेत्रात जेवढा वाहन करापोटी महसूल जमा होती त्यांच्या २५% इतके अनुदान राज्यातील जिल्हा परिषदांना स्वनिधी म्हणून उपलब्ध करून देण्यात यावेत असा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला होता.

याबाबत वित्त विभागाने वाहन कर हा राज्याचे महत्त्वाचे उत्पनाचे साधन असून इतके अनुदान पंचायत राज संस्थाना देणे शक्य नाही. राज्य वित्त आयोगाशी संपर्क साधावा. तथापि, प्रस्तावास संमती नाही असे अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार मोटार वाहन कर अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव फेटाळ्यात आलेला आहे.

**२.२.३.३ : भविष्य निर्वाह निधी व्याजाच्या अनुदानाचे कमी वाटप :**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज प्रदानाचे दायित्त्व महाराष्ट्र शासनाचे आहे.आठ चाचणी तपासणी केलेल्या जिल्हा परिषद मध्ये असे आढळून आले की, २०१०-१४ दरम्यानचे कर्मचाऱ्यांच्या PF वरील व्याजापोटी रु. ७४४.७० कोटी अनुदान रकमेची मागणी जिल्हा परिषद ने महाराष्ट्र शासनाकडे केली गेली होती.तथापि,महाराष्ट्र शासनाने ही रक्कम रु. ४८३.४५ कोटी इतकी सिमित केली होती,परिणामी रु. २६१.२५ कोटी इतक्या PF वरील व्याजाच्या अनुदानाचे कमी वाटप झाले. तसेच राज्याच्या ३३ जिल्हा परिषद संबंधित PF वरील व्याज अनुदानाची रक्कम रु. ८५३.२८ कोटी इतकी होती.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१च्या कलम १३० मध्ये आवश्यक त्या सुधारणा करून कलम १०३ (अ) अन्वये शासनाने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी दिनांक १ मे,१९८५ पासून स्वतःच्या ताब्यात घेतला. यामध्ये जिल्हा परिषदेचे वर्ग -३ व वर्ग-४ चे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीधारक असून त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने व्याज देण्याची देयता शासनाने स्वीकारली आहे. भविष्य निर्वाह निधीवरील जमा रकमेवर व्याजाची रक्कम समायोजीत करण्यासाठी विभागाकडून मागणी क्रमांक एल-१२०४९ व्याज प्रदाने -०३- अल्पबचत भविष्य निर्वाह निधी इत्यादीवरील व्याज, १०४, राज्य भविष्य निर्वाह निधीवरील व्याज (०१)(०१) राज्य भविष्य निर्वाह निधीवरील व्याज-४५ व्याज (२०४९०७७१) या लेखाशिर्षांतर्गत जिल्हा परिषदांकडून प्राप्त होणाऱ्या अंदाजाप्रमाणे अर्थसंकल्पीय तरतूद केली जाते. प्रत्येक आर्थिक वर्षासाठी आवश्यक असणारी संभाव्य व्याजाची तरतूद विचारात घेऊन जिल्हा परिषदा विभागाकडे सुधारीत अंदाजामध्ये मागणी नोंदवितात. सुधारीत अंदाजाच्या मागणीनुसार आवश्यक त्या तरतुदीची मागणी विभागाकडून वित्त विभागाकडे करण्यात येते. परंतु वित्त विभागाकडून विभागाच्या मागणीनुसार निधी उपलब्ध होत नाही. ते खालील विवरणपत्रावरून दिसून येते. परिणामी प्राप्त निधीच्या मर्यादेत सर्व जिल्हा परिषदांच्या मागणीनुसार निधी वाटप करणे विभागास शक्य होत नाही.

| वर्ष<br>(१) | अर्थसंकल्पीय तरतूद<br>(२) | सुधारीत अंदाजामध्ये मागणी केलेली रक्कम<br>(३) | वित्त विभागाकडून सुधारीत अंदाजानुसार प्राप्त तरतूद<br>(४) | कमी अधिक (४.३)<br>(५) | वितरित तरतूद<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | ३१५,४४,१३ | ३८६,६४,४५ | २७८,५३,३७ | १०८,११,०८ | २७८,५३,३७ |
| २०११-१२ | ३२३,८४,५८ | ४६२,०६,१४ | ३८१,९५,९९ | ८०,१०,१५ | ३८१,९५,९९ |
| २०१२-१३ | ४५९,२३,२१ | ६४८,५२,०७ | ५४९,२६,४९ | ९९,२५,५८ | ५४९,२६,४९ |
| २०१३-१४ | ६५०,३०,८३ | ७६६,४४,४८ | ६३५,६२,६९ | १३०,८१,७९ | ६३४,६२,६९ |
| २०१४-१५ | ७४८,५८,५३ | ९३९,५७,११ | ७४८,५८,५३ | १९०,९८,५८ | ७४८,५८,५३ |

मार्च अखेरीस सदर योजनेवर झालेली जमा व खर्च रकमेनुसार त्यावरील व्याज जिल्हा परिषदा मार्च नंतर महालेखापाल कार्यालयाकडे पुस्तकी समायोजनासाठी मागणी नोंदवितात त्यामुळे सुधारीत अंदाजामध्ये केलेली मागणी व प्रत्यक्ष महालेखापाल कार्यालयाकडे केलेली मागणी यामध्ये तफावत आढळते महालेखापाल कार्यालय मार्च अखेरीस शासन निर्णयानुसार तरतूद समायोजित करत असल्याने बऱ्याच जिल्हा परिषदांना मागणीप्रमाणे तरतूद मिळत नाही. तसेच काही जिल्हा परिषदांनी कमी मागणी केल्याने तरतूद शिल्लक रहाते. सदर शिल्लक तरतूद महालेखापाल कार्यालय ज्या जिल्हा परिषदांना जादाचा निधी आवश्यक आहे त्यांना समायोजित करत नसल्याने सदर योजनेवर बचत दिसून येते.

सन २०१०-२०११ पर्यंत महालेखापाल कार्यालय, मुंबई यांच्याकडून या योजनेवर जिल्हा परिषदांच्या मागणीप्रमाणे रक्कम समायोजित करत होती. सदर जादा समायोजित झालेली रक्कम ही लोकलेखा समितीच्या शिफारशीनुसार विधानमंडळाने नियामनुकुल केली आहे. वास्तविकत : जिल्हा परिषदेचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीधारक असल्याने त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने व्याज देण्याची देयता शासनाने स्वीकारली आहे.त्यासाठी विभागाकडून आदेशानुसार जरी निधी कमी प्राप्त झाला तरी महालेखापाल कार्यालयाने जिल्हा परिषदांच्या मागणीनुसार व्याजाची रक्कम समायोजित करणे आवश्यक आहे. अशी विभागाची धारणा आहे.

या संदर्भात दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी लोकलेखा समितीपुढे मा.प्र.सचिव (ग्रा.वि.व. पं.रा.) यांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी सदर परिच्छेदावर मा.अध्यक्षांनी दिलेल्या सूचनाच्या अनुषंगाने करावयाच्या कारवाईचा भाग म्हणून वित्त विभागाकडे या विभागाच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ च्या पत्रान्वये सन २०१०-११ ते सन २०१४-१५ याकालावधीतील भविष्य निर्वाह निधीवरील प्रलंबित व्याजाची अंदाजित रुपये १२०० कोटी इतक्या तरतुदीची मागणी करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २००९ च्या परिपत्रकातील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना पुन्हा एकदा विभागाच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ च्या पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे.

**२.२.३.४ : मुद्रांक शुल्क अनुदानाचे कमी/ विलंबाने वाटप करणे :**

ZP आणि PS अधिनियमाच्या विभाग १५८ नुसार, महाराष्ट्र शासनाने ZP नां मुद्रांक शुल्क अनुदान अभिहस्तांकित करण्याची तरतूद आहे.महसूल विभागाकडून अचल मालमत्तांच्या व्यवहारांवर विहित दरापेक्षा एक टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्क ZP नां मुद्रांक शुल्क अनुदाने म्हणून वितरित करण्यासाठी संकलित केले जातो. एकूण प्राप्त झालेल्या मुद्रांक शुल्क अनुदानापैकी ५० टक्के अनुदान ZP कडे ठेवले जाते आणि उर्वरित ५० टक्के अनुदान हे GPS नां वितरित करण्यासाठी संबंधित PS कडून GPS नां अनुदानाचे वाटप हे मागील वर्षात प्रत्येक GP च्या अखत्यारीत प्रत्यक्षात संकलित झालेल्या मुद्रांक शुल्काची जी यादी मुद्रांक विभागाकडून अग्रेषित केली जाते,त्या आधारावर केले जाते.

निवड केलेल्या आठ ZP पैकी चार ZP मध्ये लेखापरिक्षेला असे आढळून आले की वर्ष २००९-१४ दरम्यान या चार ZP ना देय असलेल्या एकूण रु. ९३८.८२ कोटीपैकी फक्त रु. ७८९.०६ कोटीच शासनाने वाटप केले होते परिणामी रु. १४९.७६ कोटी मुद्रांक शुल्क अनुदानाचे कमी वाटप झाले होते.

लेखापरिक्षेला असेही आढळून आले की ठाणे आणि परभणी ZP मध्ये, २००९-१४ कालावधीसाठी महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या रु. १०८.७२ कोटी मुद्रांक शुल्क अनुदानांपैकी ,५० टक्के (रु. ५४.३६ कोटी) ZP कडून PSs ना पुढे संबंधित GPs च्या वाटपासाठी दिले गेले होते. तथापि, असे आढळून आले की, ZPs कडून फक्त रु. ५०.११ कोटी वाटप केले होते. परिणामी, रु. ४.२५ कोटी अनुदानाचे PSs ना कमी वाटप झाले होते.

ZP परभणी यांनी उत्तरात असे सांगितले की (जुलै, २०१४) मुद्रांक शुल्क विभागाकडून GP निहाय यादी प्राप्त झाली नव्हती आणि म्हणून रकमेचे वाटप केले जाऊ शकले नव्हते. हे उत्तर स्विकारणीय नाही कारण, GPs नां अनुदानाचे वाटप करण्यासाठी जरी GOM कडून अनुदाने प्राप्त झाली होती तरीही ZP कडून मुद्रांक शुल्क विभागाकडून यादी मिळविण्यासाठी कुठलीही कारवाई केली गेली नव्हती. तसेच, आठ निवड केलेल्या ZPs पैकी, चार ZPs मण्से, १९९६-२०१४ कालावधीशी संबंधित रु. ५४.४५ कोटी रकमेचे मुद्रांक शुल्क अनुदानाचे ZPs कडून PSs नां वाटप करण्यात एक ते १८ वर्षाचा विलंब झाला होता.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या स्थानिक संस्था अहवालातील क्र.६ मधील परिच्छेद क्र २.२.३.४ च्या अनुषंगाने दि. १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी लोकलेखा समितीची बैठक झाली सदर बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्दाच्या अनुषंगाने सुधारीत स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे :—

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यातील जिल्हा परिषदांना सन २००९-१० ते सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात वितरित केलेले अनुदान खालीलप्रमाणे आहे :—

(आकडे/ हजारांत)

| अ.क्र. | सन | जिल्हा परिषदांना देय अनुदान | प्रत्यक्षात वितरित केलेले अनुदान | शिल्लक अनुदान |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | २००९-१० | २९५२८०३ | १५००००० | १४५२८०३ |
| २ | २०१०-११ | ३०७५०३८ | ३९६८५२२ | -८९३४८४ |
| ३ | २०११-१२ | ४३२५१३० | ४४६७६०७ | -१४२४७७ |
| ४ | २०१२-१३ | ५३५४३३२ | ५३१५५४१ | ३८७९१ |
| ५ | २०१३-१४ | ६००४७७९ | ५६६४१३२ | ३४०६४७ |
| ६ | २०१४-१५ | ६३५२३०९ | ६४००००० | -४७६९१ |
| | **एकूण ...** | **२८०६४३९१** | **२७३१५८०२** | **७४८५८९** |

जिल्हा परिषदांच्या देय अनुदानाबाबत सर्व जिल्हा निबंधक कार्यालयाकडून नव्याने वर्षानिहाय माहितीबाबत खात्री करण्यात आली असून सन २००९-१० ते सन २०१४-१५ या कालावधीत जिल्हा परिषदांना कमी वितरित झालेले अनुदान पुढील आर्थिक वर्षात देण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदांना देय होणारे १% मुद्रांक शुल्क अनुदान १५ दिवसांच्या कालावधीमध्ये संबंधित जिल्हा परिषदांना वितरित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांस शासनस्तरावरून देण्यात आलेल्या आहेत.

**२.२.३.५ वन महसूल अनुदानाची कमी प्राप्ती :**

ZP आणि PS अधिनियमाच्या भाग १८१ नुसार, राज्य शासनाने याबाबत कायद्याद्वारे विनियोजन केल्यानंतर, प्रत्येक ZP ला दरवर्षी १ एप्रिल, १९७२ पासून सुरू झालेल्या पंचवार्षिक कालावधीच्या त्वरित/अगदी लगतच्या आधीच्या तीन वित्तीय वर्षात जिल्ह्याच्या मर्यादांमध्ये गोळा झालेल्या वन महसुलाच्या सरासरी सात टक्के रक्कम द्यायची असते.

चाचणी तपासणी केलेल्या ZPs च्या दस्तऐवजांवरून आणि वन विभागाने सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून आले की, २००९-१४ दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाकडून ZPs नां देण्यात येणाऱ्या वन अनुदानाची चुकीची निर्धारणा करण्यात आली होती. आठ चाचणी तपासणी केलेल्या ZPs पैकी पाच ZPs मध्ये GOM ने रु. ०.४१ कोटी रकमेचे वन महसूल अनुदानाचे अतिरिक्त वाटप केले होते तर तीन ZPs मध्ये रु. ६.७३ कोटी रकमेचे कमी वाटप केले होते.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१, नुसार कलम १६१ (अ) मध्ये केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने उपवनसंरक्षकांचे वनक्षेत्रातील वनोपजापासून प्राप्त होणाऱ्या मागील लगतच्या ३ वित्तीय वर्षांत प्राप्त होणाऱ्या वन महसुलाच्या अनुषंगाने गणना करण्याच्या तरतुदीप्रमाणे सरासरीच्या ७% येणारी रक्कम जिल्हा परिषदांना देय असते.

सन २००९-१० ते सन २०१०-११ पर्यंतचे निकष प्रमाणे जिल्हा परिषदांना देय असलेल्या अनुदानाचे संदर्भात मंजूर करण्यात आलेल्या पूरवणी मागणी अनुदानाचे वाटप संबंधित जिल्हा परिषदांना नियंत्रक अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आलेले आहे. यात सन २००५-०६ पासून कमी देण्यात आलेल्या रकमेचा सुद्धा समावेश आहे.

सन २०१३-१४ च्या लेखा परिक्षणामध्ये पुणे, ठाणे, रायगड, नाशिक आणि हिंगोली जिल्हा परिषदांना रु. ०.४१ कोटी रकमेच्या अतिरिक्त अनुदान वाटप केले असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु या विभागाकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीची तपासणी केली असता सन २०१०-११ पर्यंत सदर ४ जिल्हा परिषदांना रु. ०.०४ कोटी अतिरिक्त वाटप झाल्याचे निदर्शनास येते. सदर ५ जिल्हा परिषदांना सन २०११-१२ व सन २०१२-१३ मध्ये निकषप्रमाणे देय रक्कम देण्यात आलेली आहे. मात्र सन २०१३-१४ मध्ये रु. ०.०५ कोटी अनुदान अधिक वितरित करण्यात आले आहे.

(आकडे हजारात)

| अ.क्र. (१) | वर्ष (२) | सरासरी ७% वन महसूल (३) | शासनाकडून मंजूर अनुदान (४) | पुरवणी मागणी (५) | एकूण (६) | या कार्यालयाकडून अनुदान वाटप (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २००९-१० | ३६५४ | २२३५ | ० | २२३५ | २२३५ |
| २ | सन २०१०-११ | ४३०० | १५६४ | ५१०० | ६६६४ | ६६६४ |
| ३ | सन २०११-१२ | ४४३७ | ४४३८ | ० | ४४३८ | ४४३८ |
| ४ | सन २०१२-१३ | ३९५२ | ३९५३ | ० | ३९५३ | ३९५३ |
| ५ | सन २०१३-१४ | ३३२६ | २९३३ | ० | २९३३ | २९३३ |
| | **एकूण ...** | **१९६६९** | **१५१२३** | **५१००** | **२०२२३** | **२०२२३** |

जिल्हा परिषदांना वितरित करण्यात आलेले रु. ५ लक्ष ५४ हजारांचे अतिरिक्त अनुदान चालू आर्थिक वर्षी वळती करून घेण्यात येणार आहे.

यवतमाळ, रत्नागिरी व परभणी जिल्हा परिषदांना रु. ६.७३ कोटी कमी रकमेचे वाटप झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतु उपलब्ध असलेल्या आकडेवारी अन्वये सन २०१३-१४ अखेर फक्त रु. ७७ लक्ष ९४ हजार इतके कमी वाटप करण्यात आलेले आहे. सदर कमी अनुदानाचे संबंधात पुरवणी मागणी पुढील अधिवेशनाचे वेळी सादर करण्यात येत असून पुरवणी मागणीद्वारे अनुदान प्राप्त झाल्यानंतर, सदर अनुदान जिल्हा परिषदांना वितरित करण्यात येईल.(आकडे हजारांत)

| अ.क्र. (१) | वर्ष (२) | सरासरी ७% वन महसूल (३) | शासनाकडून मंजूर अनुदान (४) | पुरवणी मागणी (५) | एकूण (६) | या कार्यालयाकडून अनुदान वाटप (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २००९-१० | ८४४५ | १२५८ | ० | १२५८ | १२५८ |
| २ | सन २०१०-११ | १४७६३ | ५३५८ | ११३६० | १६७४५ | १६७४५ |
| ३ | सन २०११-१२ | १८९८८ | १८९८८ | ० | १८९८८ | १८९८८ |
| ४ | सन २०१२-१३ | २२७८२ | २२७८२ | ० | २२७८२ | २२७८२ |
| ५ | सन २०१३-१४ | २१८७६ | १९२८७ | ० | १९२८७ | १९२८७ |
| | **एकूण ...** | **८६८५४** | **६७७००** | **११३६०** | **७९०६०** | **७९०६०** |

**२.२.३.६ इतर अनुदाने मुक्त न करणे :—**

ZPs आणि PSs अधिनियमातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने जमीन महसूल उपकर, जमीन महसुल अतिरिक्त उपकर, प्रोत्साहन अनुदाने इत्यादि ZPs ना द्यावयाची असतात. लेखापरीक्षेला आढळून आले की, निवड केलेल्या आठ ZPs पैकी सहा ZPs मध्ये १९९४-२०१४ या कालावधीसाठी जरी रु. २११.१५ कोटी रक्कम ZPs नां देय होती तरी महाराष्ट्र शासनाने ते मुक्त केले नव्हते.

**ज्ञापन :—**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

महाराष्ट्र जिल्हा परिषदां व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४४ अन्वये जमीन महसूल उपकर व तद्नर्षंगिक अनुदाने पंचायत राज संस्थाना नुकसानभरपाईच्या रकमा म्हणून देय आहेत.

शासनाकडून विकास कामासाठी देय असणारी विविध थकीत अनुदानाची अचूक माहिती सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आली होती. जमीन महसूल वाढीव उपकरासाठी रु. ६१०,१५,४४,०७० इतके अनुदान जिल्हा परिषंदाना देय होते. सन २०१४-१५ पर्यत जमीन वाढीव उपकर अनुदानाची संपूर्ण रक्कम मंजूर झाली असून जिल्हा परिषदांना देय असलेल्या रु. ६१०,१५,४४,०७० अनुदानापैकी रु. ५८४,५१,८१,४८८ इतके अनुदान वितरित केले आहे. उर्वरित रु. २५,६३,६२,५८२ अनुदान वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**२.२.३.७ अभिकरण शुल्काची कमी प्राप्ती :**

ZP आणि PS अधिनियमाच्या विभाग १२३ बरोबर १९९९ च्या शासन निर्णयासह, राज्य शासनाने ZPs नां, प्रकल्प खर्चाच्या पाच टक्के रक्कम त्याच्या कार्यान्वयनासाठी किंवा अशा कामाच्या देखभालीसाठी किंवा योजनेच्या विकासासाठी राज्य शासनाच्या वतीने अभिकरण शुल्क म्हणून द्यावयाची असते.

आठ चाचणी तपासणी केलेल्या ZPs मध्ये लेखापरीक्षेला असे आढळून आले की, १९९२-२०१४ या कालावधी संबंधित महाराष्ट्र शासनाकडून देय असलेल्या रु. २१.२९ कोटींपैकी, या आठ ZPs नां फक्त रु. ९.९० कोटी रक्कमच प्राप्त झाली होती, परिणामी, रु. ११.३९ कोटी कमी प्राप्त झाले होते.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अभिकरण शुल्काची कमी प्राप्ती याबाबत संबंधीत जिल्हा परिषदांचे अभिप्राय खालील प्रमाणे आहे :—

**यवतमाळ.—**सन २००८-०९ ते सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात जिल्हा परिषदेच्या कृषी विभागास अभिकरण योजनेंतर्गत रु.५०,०१,८४,८७७ इतका निधी प्राप्त झाला असून, ४% अभिकरण शुल्क रक्कम रु. २,५०,०९,२४४ रक्कम वरील रक्कमेतून कपात करून जिल्हा परिषद सेस फंडात जमा करण्यात आली आहे.

**परभणी.—**परभणी जिल्हा परिषदेमधील अंदाजपत्रकानुसार गृहीत उत्पन्न धरलेल्या अभिकरण शुल्काची रक्कम रु. ३० लक्ष येणे अंदाजपत्रकानुसार अपेक्षित होते. या रक्कमेपैकी रु. २३.५१ लक्ष एवढी अभिकरण शुल्काची रक्कम प्राप्त झाली असून सन २०१४-१५ मध्ये रु. ६.४९ लक्ष अशी एकूण रु. ३० लक्ष रक्कम जिल्हा परिषद, परभणी यांस पूर्णतः प्राप्त झाली आहे.

**रायगड.—**सन १९९२ ते सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रायगड जिल्हा परिषदेस रु. ४६,६७,१५० इतकी अभिकरण शुल्काची रक्कम कमी प्राप्त झाली असून या थकीत अभिकरण शुल्काची मागणी शासनाकडे करण्यात येणार आहे.

**नाशिक.—**नाशिक जिल्हा परिषदेस येणे असलेल्या रु. २,७४,३२,३१७ या अभिकरण शुल्काच्या रक्कमेपैकी रु. १५,३३,२५० इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून उर्वरित अभिकरण शुल्काची रक्कम रु. २,५८,९९,०६७ प्राप्त करून घेण्यासाठी संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

**रत्नागिरी.—**रत्नागिरी जिल्हा परिषदेस येणे असलेल्या अभिकरण शुल्क रक्कम रु. १.४२ कोटी रक्कमेपैकी रु. १६.३४ लक्ष इतकी रक्कम जिल्हा परिषदेस प्राप्त झाली असून नोव्हेंबर, २०१५ अखेर अभिकरण शुल्कापोटी रु. १.३० कोटी रक्कम जिल्हा परिषदेस येणे आहे. सदर रक्कम महिला बाल कल्याण (रु. १.२६ कोटी) व ग्रामीणी पाणीपुरवठा (रु. ०.०४ कोटी) विभागाचे असून सदर रक्कम प्राप्त करून घेण्यासाठी संबंधित खाते प्रमुखांना आवश्यक त्या सूचना मासिक सभेमध्ये जिल्हा परिषदेकडून देण्यात आलेल्या आहेत/येत आहेत.

**हिंगोली.—**जिल्हा परिषद, हिंगोली अभिकरण शुल्काची येणे असलेली रक्कम रु. ०.३० कोटी रक्कम ही महिला बाल कल्याण, कृषी व आरोग्य विभागाकडे करण्यात आलेली आहे. अभिकरण शुल्काची रक्कम संबंधित विभागांकडून प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या सेस फंडामध्ये जमा करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**पुणे.—**जिल्हा परिषद, पुणे अभिकरण शुल्काची येणे असलेली रक्कम रु. २.९५ कोटी रक्कमेपैकी रु. २,५३,७९,५९७ इतकी अभिकरण शुल्काची रक्कम जिल्हा परिषदेस प्राप्त झाली असून उर्वरित अभिकरण शुल्कांची रक्कम प्राप्त करून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

**ठाणे.—**जिल्हा परिषद, ठाणे यासे रिउक अभिकरण शुल्काची येणे असलेली रक्कम रु. २,४७,५७,०७७ इतकी असून, अभिकरण शुल्कापोटी कोणतीही रक्कम आज अखेर जिल्हा परिषदेस प्राप्त झालेली नाही. सदर अभिकरण शुल्कांची रक्कम प्राप्त करून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

**२.२.३.८ विद्युत शुल्क अनुदानाची प्राप्ती न होणे :**

शासनाच्या ग्रामविकास विभागाने पारित केलेल्या (ऑगस्ट, २००९) शासन निर्णयानुसार GPs नी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर (RWSS) खर्च केलेल्या विद्युत शुल्काच्या ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती महाराष्ट्र शासनाने ZPs/PSs द्वारे ना करावयाची असते.

७५ चाचणी तपासणी केलेल्या GPs च्या वार्षिक लेख्यांची तपासणी केली असता असे आढळून आले की, २९ GPs मध्ये २००९-२०१३ दरम्यान विविध RWSS वर रु. ५.११ कोटी इतका खर्च केलेल्या शुल्काचा खर्च करण्यात आला होता. तथापि, GPs ने खर्च केलेल्या एकूण खर्चाच्या ५० टक्के (रु. २.५६ कोटी) अनुदानापैकी, मार्च, २०१४ पर्यंत GOM कडून चार GPs ना फक्त रु. ०.११ कोटी रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आली होती. उर्वरित २५ GPs नी संबंधित PSs/ZPs द्वारे GOM कडे रु. २.५ कोटीची मागणी केली नव्हती.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ च्या स्थानिक संस्था अहवाल क्र.६ मधील परिच्छेद क्र.२.२.३.८ मध्ये नमूद केलेल्या ग्रामपंचायती या नाशिक, ठाणे, रत्नागिरी, रायगड, परभणी, पुणे, हिंगोली व यवतमाळ या जिल्ह्यातील आहेत.

**हिंगोली** जिल्ह्यातील जवळा बाजार व शिरड शहापूर या ग्रामपंचायतींनी वसूल केलेली रु. १,५०,००० एवढी पाणीपट्टीची रक्कम जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये जमा करण्यात आलेली आहे. सदर ग्रामपंचायती या २० गावे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत असल्याने सदरील योजनेच्या विद्युत देयकाची रक्कम जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीमधून अदा करण्यात आली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यातील ८ ग्रामपंचायती संदर्भात प्रोत्साहन देण्यासाठीचे निकष पूर्ण होत नसल्याने सदर ग्रामपंचायतींना निधी वितरित करण्यात आला नाही.

**परभणी** जिल्ह्यातील बोरी ग्रामपंचायत यांनी सन २०११-१२ व २०१२-१३ या आर्थिक वर्षातील वीज देयकाच्या रकमेच्या ५०% प्रतिपूर्तीचे प्रस्ताव त्या त्या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेकडे सादर केलेले नाहीत. सदर प्रस्ताव ग्रामपंचायत बोरी यांनी चालू आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेकडे सादर केलेले आहेत. संबंधित ग्रामपंचायतीस सदर प्रस्ताव प्रत्येक आर्थिक वर्षातच सादर करण्याबाबत जि.प. मार्फत ताकीद देण्यात आलेली आहे.

**नाशिक** जिल्ह्यातील ५ ग्रामपंचायतींपैकी ३ ग्रामपंचायतींनी वीज शुल्काच्या प्रतिपूर्तीची मागणी केलेली नाही.

**ठाणे** जिल्ह्यातील वाशिंद, ता.शहापूर या ग्रामपंचायतीस सन २००९-१० या वर्षातील रु. १,९९,३२३ एवढ्या अनुज्ञेय रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आलेली आहे.

**पुणे** जिल्ह्यातील ९ ग्रामपंचायतीपैकी वडकी ग्रामपंचायतीस सन २००९-१० ते सन २०१३-१४ या वर्षातील एकूण रु. ४,८२,१३० एवढ्या अनुज्ञेय रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. कुंजीरवाडी ग्रामपंचायतीस सन २०१०-११ या वर्षातील रु. १,५३,८१५ एवढ्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. तसेच उरळीकांचन ग्रामपंचायतीस सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षातील रु. ६,२५,४५८ एवढ्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे.

**रायगड** जिल्ह्यातील नेरळ ग्रामपंचायतीकडून प्रतिपूर्तीचा प्रस्ताव जि.प., रायगड-अलिबाग यांच्याकडे प्राप्त झालेला नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, असे दिसून येते की, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अहवालात नमूद केलेल्या ग्रामपंचायतीपैकी काही ग्रामपंचायतींना विद्युत शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, सदर स्पष्टीकरणात्मक ज्ञापनास कृपया मान्यता देण्यात यावी.

**२.२.३.९ अ-प्राधिकृत नगरपालिकांकडून प्राथमिक शिक्षण अंशदानाची प्राप्ती न होणे :**

" महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण कायदा, १९४७ " मधील तरतुदीनुसार, प्रत्येक अ-प्राधिकृत नगरपरिषदेने नगरपालिका क्षेत्रातील मालमत्तेच्या पट्टीयोग्य मुल्याच्या वार्षिक ५% इतकी रक्कम प्राथमिक शिक्षण अंशदान म्हणून प्रदान करणे आवश्यक असते, निवड केलेल्या आठही ZPs मध्ये लेखापरिक्षेला असे आढळून आले की, नगरपरिषदांकडून प्राथमिक शिक्षण अंशदान वसूल केले नव्हते. चार ZPs मध्ये १९७३-७४ ते २०१३-१४ या कालावधीतील रु. ९.५२ कोटीची रक्कम नगरपरिषदांकडून देय होती ती वसूल केली नव्हती. उर्वरित चाचणी तपासणी केलेल्या चार ZPs मधील तीन ZPs नी (हिंगोली, परभणी आणि यवतमाळ) वर्ष २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत संबंधित नगरपरिषदांकडे कधी मागणीच पाठपुरावा संबंधित नगरपरिषदांकडे (कर्जत नगर परिषद) डिसेंबर, २००५ पासून केला होता. तरीही, नगर परिषदेने त्यांच्या अखत्यारित असलेल्या मालमत्तांचा तपशील सादर न केल्यामुळे, ZP कडून अशंदान निर्धारित केले जाऊ शकले नव्हते (ऑगस्ट, २०१४).

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ चा स्थानिक संस्था अहवालातील क्र.६ मधील परिच्छेद क्र.२.२.३.९ च्या अनुषंगाने दि. १६ फेब्रुवारी २०१६ रोजी लोकलेखा समितीची बैठक झाली सदर बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्दाच्या अनुषंगाने सुधारित स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे :—

मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ हा दि. १२ डिसेंबर १९४७ रोजी राज्यपालांची अनुमती मिळाल्यानंतर दि. २९ जानेवारी १९४८ रोजी मुंबई सरकारचे राजपत्र भाग-४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. सदर अधिनियम बृहन्मुंबई वगळून महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रास लागू होता. त्यावेळच्या मुंबई क्षेत्रामध्ये ठाणे, रायगड,रत्नागिरी, सिंधूदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या १४ जिल्हा परिषदांचा समावेश होता.

संबंधित १४ जिल्हा परिषदांना अ-प्राधिकृत नगरपालिकांकडून प्राथमिक शिक्षण अंशदानाची एकूण रु. ६२,८३,४१,२१८ इतकी रक्कम येणे आहे. या येणे असलेल्या रक्कमपैकी रु. ५,१०,९७,५७४ इतकी रक्कम जिल्हा परिषदांना प्राप्त झाली असून रु. ५७,७२,४३,६४४ इतकी रक्कम जिल्हा परिषदांना अद्यापही संबंधित नगरपालिकांकडून येणे आहे.

संबंधित अंशदान मिळण्याबाबत जिल्हा परिषदांकडून संबंधित नगरपालिका/नगरपरिषदांकडे वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच या विभागामार्फत नगरविकास विभागाला कळविले असून त्यांनी त्यांच्या दि. २६ फेब्रुवारी २०१६ च्या पत्रान्वये संचालक, नगरपरिषद संचालनालय यांना सूचना दिलेल्या आहेत.

यवतमाळ, परभणी व हिंगोली या जिल्हा परिषदांना मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ लागू नसल्याने, या जिल्हा परिषदांनी संबंधित नगरपरिषदांकडे प्राथमिक शिक्षण अंशदानाच्या रक्कमांची मागणी केलेली नाही.

**२.२.४, २.२.४.१ महसुलाची निर्धारणा, आकरणी आणि संकलन कराची थकबाकी :**

VP अधिनियमांतील तरतूदींनुसार पाणी आकार, मालमत्ता कर, सार्वजनिक स्वच्छता उपकर, पथदिव्यांवरील कर, इत्यादी विविध कर GPs कडून आकरले व संकलित केले जातात.

लेखापरिक्षेला असे आढळून आले की, GPs विविध करासंबंधीच्या चालू मागणीच्या वसूलीची तसेच थकबाकीची माहिती आपल्याकडे ठेवत नव्हते. परिणामी, थकबाकीची कालावधीनिहाय स्थिती आणि वसूलीवर झालेला परिणाम केलेल्या ZPs मध्ये मार्च, २०१४ ला, पाणी आकाराची रु. ५१.०३ कोटी थकबाकी होती जे एकूण मागणीच्या ३८ टक्के होते. तसेच मार्च, २०१४ ला इतर कर संकलनाची थकबाकी जसे मालमत्ता कर, सार्वजनिक स्वच्छता उपकर, पथदिव्यांवरील कर, इत्यादि रु. ३२.५१ कोटी इतकी होती आणि जी एकूण मागणीच्या १० टक्के होती.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ च्या स्थानिक संस्था अहवाल क्र.६ मधील परिच्छेद क्र.२.२.४.१ बाबतची जिल्हा परिषदनिहाय वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :—

**जिल्हा परिषद, नाशिक**

ग्रामपंचायतस्तरावर नमुना नं. ८ चे मागणी रजिस्टरमध्ये ग्रामपंचायतीकडून चालू वर्षाच्या मागणीसह मागील थकबाकीची नोंद ठेवण्यात आलेली आहे. मार्च, २०१४ अखेर घरपट्टी व पाणीपट्टीच्या एकूण मागणीच्या ८० टक्के पेक्षा जास्त वसूली करण्यात आली आहे.

**जिल्हा परिषद, परभणी**

जिल्हा परिषद परभणी अंतर्गत ९ पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात एकूण ७०४ ग्रामपंचायती असून, ग्रामपंचायतीकडून आकारल्या जाणाऱ्या विविध करांच्या वसूली व थकबाकीचीबाबतचा पंचायत समितीनिहाय मासिक प्रगती अहवाल जतन करून ठेवण्यात येतो. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात पाणीपट्टी कराची माहे मार्च, २०१३ अखेर थकबाकी रु. ५९.२२ लक्ष व चालू मागणीपैकी २४५.६३ लक्ष अशी एकूण रक्कम रु. ३०४.७५ लक्ष एवढी थकबाकी असून तिचे प्रमाण ८.८७% आहे. सदरील थकबाकी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये वसूल करण्यात आली आहे. तसेच मालमत्ता कर, सार्वजनिक स्वच्छता उपकर, पथदिव्यांवरील कर, आरोग्य कर व इतर करापोटी माहे मार्च, २०१३ अखेर

रु. ६२.६७ लक्ष व सन २०१३-१४ मध्ये चालू मागणी रु. ३१४.८१ लक्ष अशी एकूण रक्कम रु. ३७७.४८ लक्ष एवढी मागणी होती. त्यापैकी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात थकबाकीपैकी ६२.६७ लक्ष व चालू मागणी पैकी रु. २७९.६८ लक्ष अशी एकूण रक्कम रु. ३४२.३५ लक्ष वसूली करण्यात आलेली आहे. मार्च, २०१४ अखेर शिल्लक असणारी थकबाकी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये वसूल करण्यात आलेली आहे.

**जिल्हा परिषद, रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्हा परिषदस्तरावर ग्रामपंचायतीकडून आकारल्या जाणाऱ्या विविध करांच्या वसूली व थकबाकीची वर्षनिहाय अद्ययावत माहिती ठेवण्यात येते. मार्च, २०१४ अखेर रत्नागिरी जिल्ह्यातील पाणीपट्टी थकबाकीची रक्कम रु. १,४०,९३,२३७ एवढी होती. सदरील थकबाकीची मार्च, २०१४ अखेर सदरील थकबाकीची १०० टक्के वसूली करण्यात आली आहे.

**जिल्हा परिषद, पुणे**

पुणे जिल्ह्यातील १३ विकास गटातील एकूण १४०४ ग्रामपंचायतीमध्ये मालमत्ता कर, सार्वजनिक आरोग्य कर दिवाबत्तीकर व पाणीपट्टी इ. करांच्या चालू मागणी रजिस्टर मध्ये अद्ययावत नोंदी दरवर्षी केल्या जातात. चालू कर तसेच थकबाकीच्या वसूलीबाबत पंचायत समितीमार्फत कर वसूली पथकाच्या नियुक्त्या करून ग्रापंचायतींच्या कर वसूलीबाबत काही प्रकरणांमध्ये स्थानिक न्यायालयांत तडजोड प्रकरणांमध्ये वसूली केली जात आहे. सन २०१३-१४ मध्ये ग्रामपंचायतींकडून आकारल्या जाणाऱ्या मालमत्ता कर व पाणीपट्टी इ. करांच्या एकूण मागणीपैकी साधारणपणे ८० टक्के जास्त वसूली करण्यात आलेली आहे.

**जिल्हा परिषद, ठाणे**

ठाणे जिल्हा परिषदेमधील पंचायत समितीच्या अधिनस्त ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टी आकरणीनुसार दरमहा वसूली करून त्याचा अहवाल सादर केला जातो. सन २०१३-१४ मध्ये माहे मार्च, २०१४ अखेरच्या अहवालानुसार पाणीपट्टी कराच्या एकूण मागणीच्या ८९% एवढी वसूली करण्यात आली आहे. तसेच, शिल्लक थकबाकीची पुढील आर्थिक वर्षात वसूली करण्याची कार्यवाही करण्यात येते.

**जिल्हा परिषद, रायगड**

रायगड जिल्हा परिषदेतील १५ पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात एकूण ८२५ ग्रामपंचायती असून, ग्रामपंचायतींकडून आकारल्या जाणाऱ्या विविध करांची चालू मागणी तसेच, थकबाकीच्या वसूलीबाबतचा पंचायत समितीनिहाय मासिक संकलित अहवाल जतन करून ठेवण्यात येतो. रायगड जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामपंचायतींची सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाची पाणीपट्टी, मालमत्ता कर, सार्वजनिक आरोग्य कर दिवाबत्तीकर व इ. करांची मार्च, २०१४ अखेर १००% एवढी वसूली करण्यात आलेली असून या सर्व करांची मार्च, २०१४ अखेरची थकबाकी निरंक आहे.

**जिल्हा परिषद, यवतमाळ**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदींप्रमाणे ग्रामपंचायतींकडून पाणीपट्टी, मालमत्ता कर, सार्वजनिक स्वच्छता उपकर दिवाबत्तीकर व इ. करांची आकारणी करण्यात येते. वित्तीय वर्षाच्या शेवटी करवसूलीच्या गोषवारा (चालू + थकीत) काढण्यात येतो. याप्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर दरवर्षी नमुना नं.९ मधील नोंदी अद्ययावत केल्या जातात. यवतमाळ जिल्हा परिषदेची सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कर व पाणीपट्टी या करांच्या एकूण वसूलीची टक्केवारी साधारणपणे ६८% एवढी आहे.

**जिल्हा परिषद, हिंगोली**

कर वसूलीबाबतचे ग्रामपंचायतस्तरावरील सर्व अभिलेखे हे संगणीकृत असल्यामुळे ग्रामपंचायतीकडे विविध करांसंबंधीच्या चालू मागणी व थकबाकीच्या नोंदी अद्ययावत ठेवल्या जातात. त्यावरून पंचायत समितीस्तरावरून प्राप्त अहवालानुसार जिल्हा परिषदस्तरावर मागणी निश्चित होत असते. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदींनुसार हिंगोली जि.प. अंतर्गत ग्रापंचायतींकडून करांची आकारणी व वसूली करण्यात येते. सन २०१३-१४ मध्ये हिंगोली जि.प. स्तरावर पाणीपट्टीच्या एकूण वसूलीचे (थकबाकीसह) प्रमाण ९१% इतके तसेच, मालमत्ता कर व इतर करांच्या वसूलीचे (थकबाकीसह) प्रमाण ९०.९९% इतके आहे.

**२.२.४.२ भ्रमणध्वनी मनोऱ्यांवरील कराची न आकारणी**

ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार (ऑक्टोबर, २००६), GPs नी त्यांच्या सीमेत उभारलेल्या व्यावसायिक भ्रमणध्वनी मनोऱ्यांवर विहित दरांनी कर आकाणे आवश्यक होते. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, तीन PSs अंतर्गत ४४ GPs मध्ये २००५-१४ या कालावधींसाठी ७८ भ्रमणध्वनी मनोऱ्यांवरील कर निर्धारणा केली नव्हती. परिणामी रु. २२.८७ लाख कर रकमेची वसूली झाली नव्हती.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ च्या स्थानिक संस्था अहवाल क्र. ६ मधील परिच्छेद क्र. २.२.४.२ मध्ये नमूद पंचायत समितीनिहाय वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :—

**पंचायत समिती जिंतूर, जिल्हा परिषद, परभणी**

पंचायत समिती जिंतूर अंतर्गत एकूण १३६ ग्रामपंचायतीपैकी १४ ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात सन २००५ ते २०१४ पर्यंत एकूण २९ भ्रमणध्वनी मनोऱ्यांची उभारणी करण्यात आली आहे. सदरील भ्रमणध्वनी मनोऱ्यांवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२४ व महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० नुसार कर आकारणी करण्यात आली असून, रु. ७,८९,३५० एवढ्या रकमेची थकबाकी आहे. सदरील थकबाकीची वसूली तात्काळ करणेबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांना आदेशित करण्यात आले आहे. तसेच, संबंधित ग्रामपंचायती व ग्रामसेवक यांचेकडेही याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

**पंचायत समिती जव्हार, जिल्हा परिषद, पालघर**

पंचायत समिती जव्हार, जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत एकूण ७ भ्रमणध्वनी मनोरे असून, सदर मनोऱ्यांवर एकूण रु. ४,४५,९९० एवढया रकमेची कर आकारणी करण्यात आली आहे. त्यापैकी रु. १८०३६ इतकी वसूली झाली असून, शिल्लक रु. ४,२७,९५४ एवढया थकबाकीच्या वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

**२.२.४.२ पंचायत समिती पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ**

पंचायत समिती पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ अंतर्गत १८ ग्रामपंचायत क्षेत्रात विविध कंपन्याचे भ्रमणध्वनी मनोरे आहेत. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पांढरकवडा यांच्या दिनांक १० जुलै २०१४ रोजीच्या पत्रान्वये शासन निर्णयानुसार मोबाईल मनोऱ्यांवर कराची आकारणी करणेबाबत सूचना देण्यात आल्या असून, त्यानुसार प्राप्त अहवालानुसार एकूण १८ ग्रामपंचायतींनी कराची आकारणी केली असून, वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, शासन निर्णयानुसार निर्धारित दरापेक्षा कमी दराने कर आकरणी करणाऱ्या ग्रामपंचायतीनी तफावतीची उर्वरित कराची रक्कम आकारुन वसूल करणेबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पांढरकवडा यांनी दिनांक २७ नोव्हेंबर २०१५ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनूसार वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच कर आकारणी व वसूलीबाबतचा नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

**२.२.५ संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रणे**

जमांचे योग्य लेखांकन, लेखे तयार करणे आणि दस्ताऐवजीची देखभाल इत्यादी योग्य पद्धतीने होते अथवा नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी परिणामकारक संनियत्रण आणि अंतर्गत नियंत्रणे आवश्यक आहेत. PRLs मधील संनियंत्रण आणि अंतर्गत आणि नियंत्रण कमकुवत होते, जे खाली दर्शविले आहेत.

- चाचणी तपासणी केलेल्या सर्व ७५ GPs मध्ये, रोख रक्कम आणि लेखे ग्रामसेवक हाताळत होते जे महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या विरुद्ध आहे. अशा व्यवस्थेमुळे GPs मधील निधीच्या दुर्विनियोगाची/अफरातफरीची शक्यता बळावते.
- मार्च, २०१४ ला, आठ ZPs मध्ये, १९५८ पासून १,०५७ ग्रामसेवक/२०५ सरपंचांविरुद्ध रु. ४९.८७ कोटी रकमेची ४,३८७ प्रकरणे निपटाऱ्यासाठी प्रलंबित होती. ZPs आपल्याकडे दुर्विनियोगाच्या प्रकरणांची वर्षनिहाय माहिती ठेवत नव्हते. त्यामुळे लेखापरीक्षेला वर्ष २००९-१४ दरम्यान किती प्रमाणात दुर्विनियोजन झाले होते हे निश्चित करणे अवघड होते, यात ZP, पुणे मात्र अपवाद होती जिथे वर्ष २००९-१४ दरम्यान रु. २.३३ कोटी रक्कम सम्मिलीत असलेली ६२ दुर्विनियोजनाची प्रकरणे दिसून आली. तसेच आठ चाचणी तपासणी केलेल्या ZPs पैकी सहा ZPs मध्ये वर्ष २००५-१२ दरम्यान रु. ६०५२ कोटी रक्कम सम्मिलीत असलेली अफरातफरीची ४४ प्रकरणे आढळून आली होती. अफरातफर झाल्याचा शोध लागल्याच्या तारखेपासून प्रथम माहिती अहवाल (FIR) ४० ते ८४ महिन्यांच्या विलंबाने नोंदविला गेला.
- PS जव्हार (जिल्हा ठाणे) आणि PS औंधा (जिल्हा हिंगोली) येथे वर्ष २००९-१४ दरम्यान इंदिरा आवास योजनेअंतर्गत १,८३४ घरे बांधण्यात आली होती. या घरांची निर्धारण वहीत नोंद घेऊन निर्धारणा वही अद्यावत न केल्यामुळे ही घरे मालमत्ता कर आणि पाणी कराची निर्धारणा करण्यातून वगळली गेली. PS जिंतूर (ZPपरभणी) अंतर्गत GP अंबरवाडी येथे जरी निर्धारणा वही ठेवण्यात आली होती. तरीही वर्ष २००१-२००२ पासून मालमत्तेची निर्धारणा करण्यात आली नव्हती.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

ग्रामपंचायतीमधील सरपंच व ग्रामसेकांविरुद्ध असलेल्या अफरातफरीच्या प्रकरणांबाबत संबंधितांकडून अफरातफर/गैरव्यवहार झालेल्या रकमेची वसूली करून त्यांचे विरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याबाबतच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना देण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यातील पंचायत समिती, जव्हारच्या अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये वित्तीय वर्ष २००९-१४ या कालावधीतील इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांच्या नोंदी निर्धारण वहीमध्ये घेण्यात आल्या असून त्या अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत.

तसेच सन २००९-१४ या कालावधीमध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांना पाणीकर व मालमत्ता कर आकारण्यात आला असून त्यांच्या वसुल्या करण्यात आलेल्या आहेत.

तसेच काही ग्रामपंचायत कार्यालयाकडून मालमत्ता कर व पाणी कराचे निर्धारण होऊन त्याची वसूली करण्यात येत आहे.

(२) हिंगोली जिल्ह्यामधील पंचायत समिती औधा अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायती कार्यालयामध्ये वित्तिय वर्ष २००९-१४ या कालावधीतील इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांच्या नोंदी निर्धारण वहीमध्ये घेण्यात आल्या असून त्या अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत.

तसेच सन २००९-१४ या कालावधीमध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांना पाणीकर व मालमत्ता कर आकारण्यात आला असून त्यांच्या वसुल्या करण्यात आलेल्या आहेत.

(३) परभणी जिल्ह्यातील पंचायत समिती, जिंतूरच्या अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायत, अंबरवाडी कार्यालयामध्ये वित्तिय वर्ष २००१-१२ या कालावधीमध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांना पाणीकर व मालमत्ता कर आकारण्यात आला असून त्यांच्या वसुल्या वेळोवेळी करण्यात आलेल्या आहेत व त्यांच्या नोंदी नमुना ९ कर मागणी नोंदवहीमध्ये घेण्यात आल्या आहेत. वित्तिय वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांना पाणीकर व मालमत्ता कर आकारण्यात आला असून त्याच्या वसुल्या वेळोवेळी करण्यात आलेल्या आहेत.

**२.२.६ निष्कर्ष आणि शिफारशी :**

वर्ष २००९-१४ दरम्यान PRIs ची स्वतःच्या स्त्रोतांकडून असलेली प्राप्ती ही सर्व स्त्रोतांच्या एकूण प्राप्तीच्या फक्त ४.८४ टक्के होती आणि PRIs हे विकास कामांसाठी शासनाच्या अनुदानावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून होते. शासनाने ZPs नां दिली जाणारी विविध अनुदाने मुक्त केली नव्हती किंवा ZPs नां वाटप होणाऱ्या अनुदानीत कमतरता होती ज्यामुळे ZPs च्या प्राप्तींवर प्रतिकूल परिणाम झाला होता आणि परिणामी GPs च्या पुढील वाटपावरही परिणाम झाला होता. ZPs द्वारे संकलित केल्या जाणाऱ्य विविध करांची मोठ्या प्रमाणावर थकबाकी होती. PRIs मधील संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रण कमकुवत होते. रु. ५६.३९ कोटी इतक्या रक्कमेचा समावेश असलेली मोठ्या संख्येने दुर्विनियोग/ अफरातफरीची प्रकरणे निपटाऱ्यासाठी प्रलंबित होती.

PRIs ने कर आधार पुनर्विलोकीत करण्याची तसेच स्वतःच्या स्त्रोतातून प्राप्तीची वाढ होण्यासाठी कर संकलन प्रणालीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. शासनाने, PRIs नां देय असलेल्या अनुदानांचे वाटप वेळात होईल याची सुनिश्चिती करावी. दुर्विनियो/ अफरातफरीचे प्रसंग टाळण्यासाठी PRIs मधील संनियंत्रण/अंतर्गत नियंत्रणे बळकट करणे आवश्यक आहे.

हे प्रकरण शासनास सप्टेंबर, २०१४ मध्ये संदर्भित करण्यात आले होत. उत्तर मार्च २०१५ पर्यंन्त प्रतिक्षित होते.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या विविध कलमानुसार पंचायत राज संस्थाना नुकसानभरपाईच्या रकमा म्हणून देय आहेत.

शासनाकडून विकास कामासाठी देय असणारी विविध थकीत अनुदानाची अचूक माहिती सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आली होती. जमीन महसूल वाढीव उपकरासाठी रु. ६१०,१५,४४,०७० इतके अनुदान जिल्हा परिषदांना देय होते.सन २०१४-१५ पर्यन्त जमीन वाढीव उपकर अनुदानाची संपूर्ण रक्कम मंजूर झाली असून जिल्हा परिषदांना देय होते. सन २०१४-१५ पर्यन्त जमीन वाढीव उपकर अनुदानाची संपूर्ण रक्कम मंजूर झाली असून जिल्हा परिषदांना देय असलेल्या रु. ६१०,१५,४४,०७० अनुदानापैकी रु. ५८४,५१,८१,४८८ इतके अनुदान वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

जमीन महसूल उपकरासाठी रु. २९८,२८,४८,९९९ इतके थकीत अनुदान जिल्हा परिषदांना देय होते. जमीन महसूल अनुदानापैकी रु. २१७,०२,७३,००० इतके अनुदान वितरित केले असून उर्वरित रु. ८१,२५,७५,९९९ इतके अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

जिल्हा परिषदांनी स्वतःच्या स्त्रोतातून प्राप्तीची वाढ करता यावी म्हणून कर व करेत्तर महसूल असलेल्या साधनात स्वउत्पन्न वाढविण्यासाठी तसेच शासनाकडून देय असलेली अनुदान योग्य प्रमाणात व विहीत वेळेत मिळण्याकरिता जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्तरावर उत्पन्न वाढविण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

तसेच शासनाने देय असलेल्या अनुदानात वाटप वेळेत होण्यासाठी अनुदान वितरणाचे टप्पे कमी करून जिल्हा परिषदांना अनुदान थेट अदा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

ग्रामपंचायतीचे कर आधार पुर्नविलोकित करणे याबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :—

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० नुसार आकारण्यात येणाऱ्या विविध कर व फी मध्ये इमारती व जमीनीवरील कर हा ग्रामपंचायतीच्या आर्थिक उत्पनाचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. इमारती व जमीनीवरील कराची भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी करण्याबाबत हरकती व सूचना मागविण्यासाठी शासन अधिसूचना क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१४०/पंरा-४, दिनांक २१ नोव्हेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध करून दिनांक ७ डिसेंबर २०१५ पर्यत हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी करण्याबाबतची अंतिम अधिसूचना दिंनाक ३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दुर्विनियोग/अफरातफरीचे प्रसंग टाळण्यासाठी ग्रामपंचायतीमधील सरपंच व ग्रामसेवकांविरुद्ध असलेल्या अफरातफरीच्या प्रकरणांबाबत संबंधितांकडून अफरातफर/गैरव्यवहार झालेलया रकमेची वसूली करून त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याबाबतच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना दिनांक २१ डिसेंबर २०१५ च्या पत्रानुसार देण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

## (ब) ग्रामविकास व जलसंधारण विभाग

### (ग्रामविकास, सहकार विभाग)

**२. शासकीय निधीची अडवणूक :**

**२.१ सहा जिल्हा परिषदांमधील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची वित्तीय स्थिती घसरत असतानांसुद्धा महाराष्ट्र शासनाने या बँकांमधील ठेवी दुसऱ्या राष्ट्रीयकृत बँकांमध्ये स्थानांतरित करण्याची प्रतिबंधक कारवाई त्वरित न केल्यामुळे रु. ५२०.७५ कोटी निधीची अडवणूक झाली.**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ च्या कलम ४९ अनुसार एखाद्या जिल्हानिधी संदर्भातील पैसा आणि त्यामध्ये जमा झालेल्या सर्व रकमा, महाराष्ट्र जिल्हा परिषदां आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १३० च्या पोट-कलम ३ च्या खंड (b) अन्वये राज्य शासनाने मान्यता दिलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत (DCCB) किंवा शासकीय कोषागारात ठेवावयास पाहिजे.

बुलढाणा, नागपूर, उस्मानाबाद आणि वर्धा येथील जिल्हा परिषद त्यांचे व्यवहार संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेद्वारे करीत होते. जर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके जवळ कोणतीही बँकिग अनुज्ञप्ती नसतांना सुद्धा रिजर्व बँक ऑफ इंडिया (RBI) द्वारे त्यांना बँकिग विनियमन अधिनियम, १९४९ अंतर्गत अधिनियमांच्या काही तरतूदींच्या अनुपालनाचे अधीन राहून व्यवहार करण्याची संमती देण्यात आली.

ऑक्टोंबर २००९ मध्ये RBI ने मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली, त्या अनुसार ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे चार टक्के आणि त्यापेक्षा अधिक दराने जोखिम भारित मत्ता गुणोत्तर करिता भांडवल (Capital to Risk Weighted Assets Ratio—CRAR) आहे आणि मागील एका वर्षात ज्यांनी रोखराखीव गुणोत्तर/सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर पाळण्यात कसूर केली नसेल अशा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अनुज्ञप्ती जारी करता येईल. तद्नुसार, RBI ने ठरविले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ३१ मार्च, २०१२ नंतर विना अनुज्ञप्ती बँकेचे व्यवहार करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) द्वारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे सांविधिक निरीक्षण करण्यात येते आणि त्यांच्या शिफारशींवर RBI जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना अनुज्ञप्ती जारी करते. चार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे २००९-१० ते २०११-१२ या वित्तीय वर्षाचे सांविधिक लेखापरीक्षण नाबार्डद्वारे ऑक्टोबर, २०१० ते जुलै, २०१२ दरम्यान करण्यात आले, जे खाली **तक्ता १** मध्ये सविस्तरपणे दर्शविले आहे.

**तक्ता १ : नाबार्डद्वारे करण्यात आलेल्या निरीक्षणाचे वेळापत्रक, महाराष्ट्र शासनास त्याबाबत कळविण्याचे तपशील आणि महाराष्ट्र शासनाद्वारे त्यावर करण्यात आलेली कारवाई.**

| DCCB चे नाव | वित्तीय वर्ष | नाबार्डद्वारे करण्यात आलेल्या सांविधिक निरीक्षणाची तारीख | नाबार्डद्वारे मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना DCCBs च्या आर्थिक स्थितीच्या घसरणाबाबत माहिती देणारे अर्धशासकीय पत्र जारी करणे | DCCB मधील ठेवी इतर राष्ट्रीयकृत बँकामध्ये स्थानांतरित करण्याचे महाराष्ट्र शासनाचे आदेश |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| बुलढाणा | २००९-१० | १८.१०.२०१० ते ०४.११.२०१० | ११ जुले, २०११ | १७ जुलै, २०१२ |
| | २०१०-११ | १६.०८.२०११ ते १०.०९.२०११ | २० जानेवारी, २०१२ | |
| | २०११-१२ | २५.०६.२०१२ ते ०७.०७.२०१२ | उपलब्ध नाही | |
| नागपूर | २००९-१० | २८.०३.२०११ ते १९.०४.२०११ | सप्टेंबर २०११ | ०६ फेब्रुवारी, २०१४ |
| | २०१०-११ | ०५.०९.२०११ ते २३.०९.२०११ | १० फेब्रुवारी, २०१२ | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | २०११-१२ | १८.०६.२०१२ ते ०३.०७.२०१२ | उपलब्ध नाही | |
| उस्मानाबाद | २००९-१० | ३१.१२.२०१० ते २०.०१.२०११ | २९ सप्टेंबर, २०११ | १० जुलै, २०१२ |
| | २०१०-११ | ३०.०९.२०११ ते २०.१०.२०११ | ०४ फेब्रुवारी, २०१२ | |
| | २०११-१२ | २८.०६.२०१२ ते ११.०७.२०१२ | उपलब्ध नाही | |
| वर्धा | २००९-१० | १४.०३.२०११ ते ३१.०३.२०११ | २७ सप्टेंबर, २०११ | १४ जानेवारी, २०१३ |
| | २०१०-११ | २५.०.२०११ ते १५.०९.२०११ | १३ जानेवारी,२०१२ | |
| | २०११-१२ | २.०६.२०१२ ते ११.०७.२०१२ | उपलब्ध नाही | |

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना प्रस्तुत केलेल्या सर्व सांविधिक निरीक्षण अहवालात नाबार्डने या चार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची आर्थिक स्थिती घसरत असून (ह्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचे निव्वळ मूल्य आणि CRAR नकारात्मक होते) त्यांचे कामकाज असमाधानकारक होते, ज्यामुळे ठेवीदारांचे हित धोक्यात येईल असे निदर्शनास आणले होते. म्हणूनच, नाबार्डने जुलै २०११ ते फेब्रुवारी २०१२ दरम्यान मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ३१ मार्च, २०१२ पूर्वी इष्ट परिणाम साध्य करण्यासाठी कृती आराखडा तयार करून त्याची ताबडतोब अंमलबजावणी करून अनुज्ञप्ती मिळविण्यास पात्र ठरण्याकरिता निर्देश देण्याची विनंती केली. तथापि, या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकली नाही आणि RBI लोक हितासाठी यापुढे या चार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना ठेवी स्वीकारणे आणि ठेवींची परतफेड करणे यासारखे बँकेचे व्यवहार करण्यास प्रतिबंध असल्याचे निर्देश निर्गमित केले. (मे २०१२).

मे २०१२ (RBI द्वारे अधिस्थगन जारी केल्यापासून) ते सप्टेंबर २०१४ दरम्यान, चार पैकी तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये रु. ३६८ कोटी निधी अडकून राहिला. उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर लावण्यात आलेले अधिस्थगन जरी RBI पुढे काढून घेतले आणि जून २०१३ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अनुज्ञप्ती जारी केली तरी सप्टेंबर २०१४ पर्यंत रु. ५९.१३ कोटी निधी अडकून राहिला. परंतु नाबार्डद्वारे मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी जुलै २०११ मध्येच (वरील **तक्ता १** पहा) डळमळीत स्थितीची माहिती दिल्यानंतर सुद्धा महाराष्ट्र शासनाने खबरदारी घेतली नाही. महाराष्ट्र शासनाने फक्त जुलै २०११ ते फेब्रुवारी २०१४ मध्यवर्ती सहकारी बँकेमधील शासकीय निधी, कोषागाराचे व्यवहार चालतात त्या राष्ट्रीयकृत बँकांमध्ये स्थानांतरित करण्याचे आवश्यक निर्देश दिले. अडकलेला निधी दुसऱ्या राष्ट्रीयकृत बँकांमध्ये स्थानांतरित करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने विलंबाने निर्गमित केलेल्या निर्देशांमुळे कोणताही उपयुक्त हेतू साध्य झाला नाही कारण मे २०१२ मध्ये RBI द्वारे अधिरोध जारी केल्यामुळे चार पैकी तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील बँकेचे व्यवहार ठप्पच होते.

प्रधान सचिव, ग्रामीण विकास आणि जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी ही बाब मान्य केली आणि नमूद केले (जानेवारी २०१५) की नाबार्डचा निरीक्षण अहवाल त्यांना पृष्ठांकित करण्यात आला नव्हता आणि म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक घसरणाबाबत ते अनभिज्ञ होते. तथापि, प्रधान सचिव यांनी पुढे असे ही नमूद केले की महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग या आजारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील शासकीय निधीचे राष्ट्रीयकृत बँकांमध्ये स्थानांतरण करण्याकरिता योग्य पाऊले उचलण्याची विनंती केली आहे.

लेखापरिक्षणात पुढे असे निदर्शनास आले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ठेवी स्वीकारणे आणि ठेवींची परतफेड करणे यासारखे बँकेचे व्यवहार करण्यापासून प्रतिबंधित करण्याचे मे २०१२ चे RBI चे निर्देश धुळे आणि नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला सुद्धा लागू आहेत. तथापि, धुळे नंदुरबार जिल्हा परिषदांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसोबत व्यवहार सुरुच ठेवले आणि २६ ऑगस्ट २०१४ च्या अखेरीस या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये रु. ९३.६२ कोटीच्या ठेवी अडकून राहिल्या.

अशा प्रकारे, महाराष्ट्र शासनाने पाच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीच्या घसरणाची दखल न घेतल्यामुळे आणि त्यावर योग्यवेळी प्रतिबंधक कारवाई न केल्यामुळे शासनाचा रु. ५२०.७५ कोटी इतका निधी अडकून राहिला.

**ज्ञापन :**

२.३ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत संहिता, १९६८ च्या नियम ४९ नुसार जिल्हा परिषदांना, त्यांचा जिल्हा निधी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवणे बंधनकारक आहे. मात्र वित्त विभागाने दिलेल्या सूचनेनुसार या विभागाच्या दि. ५/७/२०१२ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे, नंदुरबार, उस्मानाबाद, बुलढाणा, वर्धा व नागपूर या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र पाठवून जिल्हा परिषदांच्या आर्थिक ठेवी सर्वार्थाने सुरक्षित राहाव्यात याकरीता तातडीने कार्यवाही करणेबाबत शासनस्तरावरून निर्देश देण्यात आले आहेत.

सदर परिच्छेदाचे अनुपालन महालेखापाल, नागपूर यांना सादर केले असता त्यांनी दि. २४/११/२०१५ च्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

(१) वर्धा, उस्मानाबाद, नंदूरबार, बुलढाणा, नागपूर व धुळे या सहा जिल्हा परिषदांचा जिल्हा मध्यवर्ती बँकेत रु. ५२०.७५ कोटी इतका निधी अडकूनही या सहा जिल्हा परिषदांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन, इतर कामे इत्यादी कशाप्रकारे करण्यात येत होती, याबाबतची माहिती संबंधित जिल्हा परिषदांकडून या विभागास प्राप्त झाली असून, सदर माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**(अ) वर्धा.—**वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती घसरल्याची बाब जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आल्यानंतर, जिल्हा परिषदेने राष्ट्रीयकृत बँकेमध्ये नवीन खाते उघडण्याची कार्यवाही पूर्ण केली. दरम्यानच्या कालावधीत कोषागारातून कोणतेही शासकीय अनुदान आहरीत न केल्यामुळे माहे डिसेंबर, २०१२ व त्यानंतर कर्मचाऱ्याच्या वेतनासाठी आवश्यक असलेला निधी, नवीन खाते उघडण्यात आलेल्या भारतीय स्टेट बँक या राष्ट्रीयकृत बँकेत जमा करण्यात आला. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी निधीची अडचण निर्माण झाली नाही. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकून पडलेला निधी हा योजना व विकास कामाचा असल्यामुळे, बरीचशी विकास कामे निधी अभावी खोळंबून पडलेली आहेत. तसेच पूर्ण झालेल्या कामांची देयके अदा करण्याची बाब प्रलंबित आहे.

**(आ) उस्मानाबाद.—**माहे जुलै, २०१२ मध्ये शासनाच्या परवानगीने जिल्हा परिषदेची सर्व खाती राष्ट्रीयकृत बँके (एस.बी.एच) मध्ये उघडण्यात आली असून वेतन व भत्याचे प्रदान वेळोवेळी त्या-त्या महिन्यांत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या वेतनाच्या कॅशफ्लोप्रमाणे वेतनाचा खर्च करण्यात आलेला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकून पडलेला निधी हा वेतन व भत्ते यांचा अखर्चित निधी शासनास परत करणे, तसेच योजना व विकास कामाचा असल्यामुळे, अपूर्ण कामे पूर्ण करण्यांस व अखर्चित निधी शासनास भरणा करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे विकास कामांवर विपरीत परिणाम होत आहे.

**(इ) नंदुरबार.—**जिल्हा परिषदेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यात येईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून वेतन व विकास कामांसाठी देण्यात आलेले धनादेश वटवून देण्यात येत होते. बँकेने जिल्हा परिषदेचा एकूण निधी रु. १८०.१८ कोटीपैकी रु. ९२.६६ कोटी मात्र एवढा निधीचे धनादेश वटवून घेण्यात आलेले असल्यामुळे वेतन व विकास कामांना अडथळा आला नाही व त्यानंतर प्राप्त होणारा निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यांत आल्याने वेतन अदा करण्यास अडचण आली नाही.

**(ई) बुलढाणा.—**शासनाने राष्ट्रीयकृत बँकेत नवीन खाते उघडण्याकरिता परवानगी दिल्यानंतर जिल्हा परिषदेने लगेच राष्ट्रीयकृत बँकेत (SBI) मध्ये जिल्हा परिषदेच्या सर्व योजनांचे नवीन खाते उघडून कोषागारातून प्राप्त होणारा निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या नवीन खात्यात जमा केला. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकलेला निधी बँकेला पत्रव्यवहार करून जिल्हा परिषद व पंचायत समितीस्तरावरील काही प्रमाणात कमी रक्कमेचे अरोखीकृत धनादेश व धनविकर्ष (D.D) पारित करून घेण्यांत आले. तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांकरिता बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची (O.D) स्वरुपात घेतलेली कर्जाची दरमहा होणारी वसूली ही बँकेला न देता जिल्हा परिषदेच्या राष्ट्रीयकृत बँकेत जमा करण्यांत आली.

**(उ) नागपूर.—**जिल्ह्यातील विकासाची कामे चालू राहण्यासाठी व जिल्हा परिषद नागपूरची प्रत राखण्याच्या दृष्टीने नवीन विकास कामासाठी येणाऱ्या शासकीय अनुदानातून नवीन (चालू वर्षाचा) तसेच मागील कामाची देयके पारित करण्यांत आली. तसेच नागपूर जिलहा परिषदेमधील बहुतांश कर्मचाऱ्यांनी नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून रु. ४७.१६ कोटी Over Draft ची उचल घेतली होती. सदर Over Draft कपातीची रक्कम रु. १८.३९ कोटी नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला त्यांचेच धनादेशाद्वारे प्रदान

करण्यात आली. त्यामुळे ही कपात केलेली Over Draft ची रक्कम नागपूर जिल्हा परिषदे तर्फे विकास कामासाठी वापरण्यात आली.

या दरम्यान वेतन व निवृत्ती वेतन यासाठी येणारे नियमीत अनुदान त्याच कामासाठी वापरण्यात आले त्यामुळे त्यावर विपरीत परिणाम झाला नाही. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व पेंशन वेळेवर प्रदान करण्यात आले.

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवहार बंद झाल्यामुळे मागील काही वर्षाचा अखर्चीत निधी रु. ३८.०८ कोटी शासनास परत न करता विकास कामावर वापरण्यात येत आहे.

**(ऊ) धुळे.—**जिल्हा परिषद, धुळे यांचा रु. ६९.३२ कोटी निधी अडकलेला होता. सदरच्या निधीपैकी दि. १/६/२०१२ ते दि. ३०/०४/२०१६ अखेर रु. ५७.९९ कोटी टप्याटप्याने प्राप्त झाला आहे. वसूल झालेल्या निधीसाठी शासनाने मुदतवाढ देऊन विकास कामांसाठी खर्च करण्याची परवानगी दिली आहे. त्यानुसार सदरचा निधी वेतन व विकास कामांसाठी खर्च केला असून वेतनाची अखर्चीत रक्कम शासनखाती भरणा केली आहे. तसेच शिल्लक निधी रक्कम रु. ११.३३ कोटी योजनांची आहे.

(१) प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांस या विभागाकडून दि. ६ मे, २०१३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा निधीचा जिल्हा सहकारी बँकेत अडकलेला विकास निधी राष्ट्रीयकृत बँकेत वर्ग करण्याबाबत त्या विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

(२) वर्धा, उस्मानाबाद, नंदुरबार, बुलढाणा, नागपूर व धुळे या सहा जिल्हा परिषदांचा, जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये आता अडकलेल्या रु. ५०१.४२ कोटी निधीची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :—

(रुपये/कोटीत)

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | राष्ट्रीयकृत बँकेत खाते उडण्यापूर्वी जिल्हा मध्यवर्ती बँकेत अडकलेला सुरूवातीचा निधी | आतापर्यंत वळती झालेला निधी | सद्यःस्थितीत जिल्हा बँकेकडे अडकलेला निधी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | वर्धा | १०१.१९ | ६.०५ | ९५.१४ |
| २ | उस्मानाबाद | ६१.६० | २.५४ | ५९.०६ |
| ३ | नंदुरबार | १०.१ | ९२.६६ | ७.५२ |
| ४ | बुलढाणा | १३३.६० | ११.७९ | १२१.१ |
| ५ | नागपूर | १४६.०९ | १९.७९ | १२६.५६ |
| ६ | धुळे | ६९.३२ | ५७.९९ | ११.३३ |
| | **एकूण ...** | **६९१.९** | **१९०.५६** | **५०१.४२** |

(३) वर्धा रु. ६.०५ कोटी, उस्मानाबाद रु. २.५४ कोटी, नंदुरबार रु. ९२.६६ कोटी, बुलढाणा रु. ११.७९ कोटी, नागपूर रु. १९.५३ कोटी व धुळे रु. ५७.९९ कोटी अशी एकूण रु. १९०.५६ कोटी इतकी रक्कम जिल्हा मध्यवर्ती बँकाकडून वसूल करण्यांत आली आहे.

(४) मुद्या क्र.५, ६ व ७ बाबतची माहिती सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडून या विभागाच्या दि. २/१२/२०१५ च्या पत्रान्वये मागविण्यांत आली असून ती सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने त्यांच्या दि. १४ जानेवारी, २०१६ च्या पत्राद्वारे या विभागास पाठविली असून माहिती साक्षीच्यावेळी सादर करण्यांत येईल.

विनंतीपूर्वक नमूद करण्यांत येते की, 'जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हानिधीची रक्कम सुरक्षित रहाण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा व त्यांना योग्य वाटल्यास जिल्हा निधीचे खाते, शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयकृत बँकेत चालतात त्या बँकेत सुरू करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावयाचा आहे.' मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना देण्यात आलेल्या आहेत.

## (अ) ग्रामविकास व जलसंधारण

### (ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, शालेय शिक्षण, नगरविकास व महसूल व वन विभाग )

**साक्ष :**

**३.१ परिच्छेद क्र. २.२.१. पंचायती राज संस्थांची जमा :**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ व २ मार्च, २०१६ रोजी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव, वन विभाग व नोंदणी महानिरीक्षक यांची साक्ष घेतली.

पंचायती राज संस्थांची जमा यासंदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती देताना असे विदित केले की, पंचायती राज संस्थेला अनुदान स्वरूपातून अधिक उत्पन्न मिळत असून स्व उत्पन्न अधिक मिळत नाही. या संबंधी शेरा उपस्थित करण्यात आला आहे. घरपट्टी, पाणीपट्टी व स्वच्छता कर इ. माध्यमातून जिल्हा परिषदेला उत्पन्न मिळत असते. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना शासनाकडून ग्रँट मिळत असते त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे.

या अनुषंगाने शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी नवीन कर निर्धारणाच्या संदर्भात शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. त्यामुळे उत्पन्नाच्या टक्केवारीमध्ये वाढ होणार आहे काय? या संदर्भात खुलासा करावा असे विभागास सांगितले असता यामुळे ग्रामपंचायतीमध्ये सुधारणा होणार असून त्यांचे उत्पन्न वाढणार आहे. या करिता इमारतीचे क्षेत्र, वय, डिप्रिसिएशन इ.क्रायटेरीया निश्चित केले असून सार्वजनिक उपयोग असल्यास त्याला वजा केले आहे. १.४० टक्के होऊ शकत नाही त्यामुळे १.३ टक्के केलेले आहे एकाच वेळी जास्त वाढवता येणार नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

नवीन इमारत बांधल्यानंतर आरसीसी वेगळे, लोड बेअरींग वेगळे, तसेच पत्र्याचे बांधकाम असेल तर ते वेगळे धरले जाते आता ४८ टक्के नागरीकरण झालेले आहे उद्योगांना कर कमी लावला जातो ते लोक ग्रामसेवककाकडे कमी कर लावावा यासाठी जातात कर लावण्याचे काम कायद्यानुसार व शासनाच्या गाईडलाईन्स प्रमाणे झाले पाहिजे. बॉडीमध्ये बराच भ्रष्टाचार होतो त्यामुळे हा अधिकार बॉडीला न देता ग्रामसेवकानेच कर आकारला पाहिजे. याकरिता पंचायत समितीमधील गट विकास अधिकारी यांना देखील समाविष्ट करून घेतले पाहिजे. कर संबंधी बॉडीने मान्यता द्यावी मात्र शिफारस करण्याचा अधिकार पंचायत समितीला असला पाहिजे. असे केल्यास शासनाच्या अनुदानाची आवश्यकता राहणार नाही या संदर्भात आपण कायद्यामध्येच बंधन घातले पाहिजे असे समितीने विभागास अवगत केले. तसेच अपिलीएट ॲथोरीटी बीडीओ असावेत अशी सूचनाही केली.

कर आकारणी समिती स्थापन केलेली असून त्यामध्ये विस्तार अधिकारी असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. आरसीसी बांधकामास गुणिले २, गुणिले ४ करावे त्याकरिता अपील ठेवू नये. अपिल असल्यास १५-१५ वर्षे केस सुरू राहते. ठोक करार करण्याचा कोणताही अधिकार विभागाने ठेवू नये असे समितीने विभागास सांगितले असता याची तपासणी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच या नवीन पद्धतीमध्ये डिस्क्रीशन कमी केले आहे औद्यागिक क्षेत्राकरिता ठराविक दर निश्चित केलेला असल्याचा खुलासाही केला.

श्रीमंत लोक आपल्या बंगल्यांची घर पट्टी ५ ते १० हजार रुपये असताना ती ५००, १००० रुपये करून द्या याकरिता मागणी करतात. यामुळे विभागाने अपिल किंवा कमिटी ठेवू नये. या संदर्भात कायदाच तयार करावा. विभागाने शासन निर्णय काढला आहे कायदा तयार केलेला नाही. शासन निर्णय हा कायदा होऊ शकत नाही. या संदर्भात विधेयक आणून सभागृहाची मंजुरी घ्यावी ॲक्टमध्ये तरतूद करावी असे समितीने विभागास सांगितले.

**३.२ परिच्छेद क्र. २.२.३.१ व्यवसाय कर अनुदानात सुधारणा न करणे :**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, महाराष्ट्रात व्यवसाय कर सुरू करण्यात आला त्या पूर्वी १५ जिल्हा परिषदांनी त्यांच्या जिल्ह्याकरिता व्यवसाय कर सुरू केलेला होता व्यवसाय कर कायदा आल्यामुळे त्यांचे नुकसान झाले.

रुपये २७.४२ लाख कायद्यातील तरतुदीप्रमाणे निर्धारित व प्रदान केली होती. व्यवसाय कर किती पटींनी वाढला? अशी पृच्छा समितीने केली असता ग्रामविकास विभागाने वित्त विभागाला प्रस्ताव पाठवला असून त्यांनी तो रद्द केला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२५ वर्षापूर्वी जे टॅक्स कलेक्शन होते ते आता १०० पटीने वाढले असेल. मात्र मागील नियमाप्रमाणेच अनुदान दिले जात आहे. वित्त विभागाने नकार दिला असेल तरी देखील जी मागणी योग्य आहे, ती विभागाने केलीच पाहिजे किंवा मंत्रिमंडळासमोर हा विषय ठेवला पाहिजे. ग्राम पंचायत किंवा जिल्हा परिषदेला ते अनुदान मिळालेच पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता जिल्हा परिषदेला काही तरी नुकसान झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असेल. शासनाचा कायदा आल्यानंतर जिल्हा परिषदांनी हे करणे शक्य होणार नाही. नुकसान होऊ नये या करिता त्यांनी त्या वेळी केलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

वित्त विभागाने सांगितले की, ग्रामविकास विभागाचा प्रस्ताव योग्य नाही. विभागाने एकदा प्रस्ताव सादर केला व नंतर अशी मानसिकता झाली आहे की, जे आहे ते योग्य आहे. १५ जिल्हा परिषदेमध्ये व्यवसाय कर सुरू असून इतर ठिकाणी तो आकारला जात नव्हता. हा अधिकार आता राज्य शासनाकडे आलेला आहे जिल्हा परिषदांच्या निधीमध्ये देखील वाढ झाली पाहिजे. ग्रामविकास विभागाने वित्त विभागाला प्रस्ताव सादर केला मात्र आता विभागाची मान्यता नाही, असे दिसते असे समितीने नमूद केले असता एकदाच पेमेंट करून हे अनुदान बंद केले पाहिजे. मोटर वाहन कर रद्द करून इतर उपाययोजना करून त्यांची कॅपेसिटी बिल्ड अप केली पाहिजे असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

### ३.३ परिच्छेद क्र. २.२.३.२ " मोटार वाहन कर अनुदानाची सुधारणा न करणे " :

उपरोक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने विभागाने यासंदर्भात कार्यवाही केली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता माहे एप्रिल, मार्च २०१५ मध्ये हा मुद्दा चौदाव्या वित्त आयोगासमोर मांडला होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने वित्त आयोगासमोर जो मुद्दा मांडला तोच मुद्दा मंत्रिमंडळासमोर देखील मांडला पाहिजे. वित्त विभागाने जर मान्यता दिली नाही तर विभागाकडे डिसेंडिंग नोट असताना देखील विभागाने कॅबिनेट समोर हा विषय का मांडला नाही? प्रत्येक विषयाला वित्त विभागाने मान्यता दिली पाहिजे असे काही नाही. हा प्रस्ताव कॅबिनेटसमोर सादर करावा असे समितीने सुचित केले असता विभागाची शिफारस आहे की, १८ किंवा २० महिन्याकरिता एकदाच पेमेंट देऊन हे पेमेंट बंद करावे लागेल. १५ लाख रुपये हा मोटार वाहन कर असून १४ जिल्ह्यांची एकूण वार्षिक रक्कम ५.४४ लक्ष रुपये आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

### ३.४ परिच्छेद क्र. २.२.३.३ भविष्य निर्वाह निधी व्याजाच्या अनुदानाचे कमी वाटप :

वरील परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी असे विदित केले की, प्रॉव्हिडंड फंड मधील व्याज जिल्हा परिषदेकडून दिले जात नाही असा विषय आहे. त्यांना शॉर्ट ॲलोकेशन झालेले आहे हा मुद्दा तांत्रिक आहे. या अनुषंगाने वित्त अधिकारी, ग्रामविकास विभाग यांनी अशी माहिती दिली की, जिल्हा परिषदेला लागणाऱ्या व्याजाच्या रकमेकरिता वित्त विभागाकडून बजेट मंजूर करून घेतले जाते व त्या प्रमाणात ते वितरित केले जाते. सर्व जिल्हा परिषदांकरिता ७०० कोटी रुपयांची तरतूद केली होती. मात्र व्याजाची रक्कम त्यापेक्षा जास्त होती. या संदर्भात सातत्याने वित्त विभागाकडे सुधारित बजेटसंबंधी पाठपुरावा केला जात आहे. हा भारित स्वरुपाचा खर्च असल्यामुळे तो उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सन २०१० पर्यंत एजी कार्यालयाकडून ३४ जिल्हा परिषदांच्या व्याजाच्या रकमेचे समायोजन करावयाचे आहे. सन २०१० पासून यामध्ये बदल झालेला आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेला स्वतंत्रपणे त्यांच्या व्याजाच्या रकमेएवढे समायोजन केले जाते. त्यामुळे काही जिल्हा परिषदेच्या रकमेमध्ये वाढ तर काही जिल्हा परिषदेच्या रकमेमध्ये बचत दिसून येते. भारित स्वरुपाच्या अनुदानासंबंधी पाठपुरावा करीत आहोत. ते उपलब्ध करून दिल्यास समायोजन होईल. सन २०१० पर्यंत जशी परिस्थिती होती, त्या प्रमाणे केले तर असे होणार नसल्याचेही समितीस सांगितले.

जिल्हा परिषदेला समायोजन करण्यास काही अडचण नसावी. ८५३.२८ कोटी रुपयांपैकी ७४८ कोटी रुपये रिलीज केलेले असून, उर्वरित रकमेची सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली. तसेच सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ पर्यंत हे व्याजाचे पैसे आहेत आणि ते त्यांच्या खात्यामध्ये जमा होण्याची गरज असल्याचे समितीने अवगत केले असता विभागाने सुधारित मागणी केलेली आहे.

ही रक्कम बुक ॲडजेस्टमेंट प्रमाणे होते. बुक ॲडजेस्टमेंट झाली नाही, एवढाच विषय असून तांत्रिकदृष्ट्या कोणाचेही नुकसान झालेले नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

जिल्हा परिषदेकडून वेळेवर मागणी आली किंवा कसे? असे समितीने विचारले असता ऑक्टोबर महिन्यात मागणी येते त्यानंतर बजेटमध्ये तरतूद केली जाते. प्रत्येक व्याजाच्या रक्कमा जिल्हा परिषदेकडून एजी ऑफिसमध्ये जातात. हे सर्व जमा आणि खर्चावर आधारित असते. त्यामुळे काही ठिकाणी बचत झाल्याचे दिसून येत आहे. सन २०१० पूर्वी एकूण रकमेवर समायोजन केले जात होते. त्यामुळे तेव्हा बचत दिसून येत नव्हती. आता जिल्हा परिषदेच्या मागणीनुसार समायोजन केले जाते. त्यामुळे काही ठिकाणी बचत झाल्याचे दिसून येते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच उर्वरित अनुदानाच्या संदर्भात वित्त विभागाकडे पाठपुरावा केला जाणार आहे. विभागाने ११३७ कोटी रुपयेंची मागणी केलेली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

वित्त विभागाचे दिनांक ३१ मार्च, २००९ रोजीचे एक परिपत्रक आहे. त्यासंदर्भातील रि-कन्सीलेशन मान्य केले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता वित्त विभागाचा दिनांक ३० मार्च, २००९ रोजीचा शासन निर्णय आहे. शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद आणि ट्रेझरिमध्ये रि-कन्सीलेशन होते. तसेच आणखी काही सुधारणा करावयाच्या असतील तर त्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या जातील असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

महालेखाकार कार्यालयाने जिल्हा परिषदेच्या मागणीनुसार व्याजाची रक्कम समायोजित करणे आवश्यक असल्याचे कळविले होते. त्यानुसार विभागाने मागणी प्रस्तावित केलेली आहे. याबाबत महालेखाकार यांना विभागाकडून काय माहिती देणार आहात? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१० पर्यंत सर्व जिल्हा परिषदांचे इन्ट्रेस्ट कॅलक्युलेट होत होते. बजेटची तरतूद ७०० कोटी रुपयांची असेल तर ती सर्व रक्कम

समायोजन होत होती आणि लोकलेखा समितीपुढे १०० कोटी रुपये रेग्युलरलाईज होत होते पण सन २०१० पासून तसे होत नसल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

या अनुषंगाने महालेखाकार यांनी अशी विचारणा केली की, सन २००९ तक ए.जी. ऑफिस एक्सपेंडिचर को बूक कर रहा था. क्या आपका मानना यही है कि वही प्राक्टिस अब भी फालो हों? आपका क्या कहना है? सन २००९ में वित्त विभाग का सर्क्यूलर आया है. पहले जो प्रॅक्टिस होती थी कि जिल्हा परिषद के कहने पर एक्सेस एक्सपेंडीचर ए.जी. ऑफीस बूक करता था और उसके बाद लेजीस्लेचर या कॉम्पीटंट ॲथॉरिटी उसे ॲप्रुव्ह करते थे. But this was not the proper procedure. Therefore this procedure was stopped and in the year 2009 the Finance Department had issued a new circular. Now, it is to be followed by the department. Is that being followed by your Department?

The second point, this amount is the charged expenditure. You are saying that this amount was reduced by the Finance Department. How the Finance Department can reduced the charged expenditure? This is not permitted.

यावर विभागीय प्रतिनिधी यांनी ११३७ कोटी रुपयाची मागणी केलेली असल्याचा खुलासा केला.

संबंधित अधिकाऱ्यांनी सुधारणा करण्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या जातील असे उत्तर दिलेले आहे. समितीला हे शिफारशीमध्ये घ्यावयाचे आहे म्हणून महालेखाकार यांना विभागाने त्यांची कोणती मागणी आहे त्याबाबत कन्व्हीन्स करावे अशी सूचना समितीस केली असता चार्ज एक्सपेंडिचर असल्यामुळे मागणीनुसार बजेट मंजूर झाले तर कोणतीही अडचण येणार नाही. सन २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत. जर काही ओमेशन असेल तर सूचना परत घेतल्या जातील. From the year 2004, the new pension scheme has also been launched for the employees असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

चार्ज एक्सपेंडीचर मायनस असताना देखील घेता येते यासाठी पुरवणी मागणी करण्याची गरज नसल्याचे समितीने विभागास अवगत केले असता मागणी करीत असतो विभागाला पुरेशी तरतूद प्राप्त झालेली नसून सद्यःस्थितीत ११३७ कोटी रुपयांची मागणी केलेली असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

चार्ज एक्सपेंडीचरला बजेट करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत वित्त सचिवांनी संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करावे असे समितीने सूचित केले असता वित्त, सचिव यांनी हा विषय कॅबिनेटसमोर चर्चेला आलेला असून सदर बैठकीत निर्णय घेण्यात आलेला होता. पहिल्या प्रथम त्यांच्याकडून प्रस्ताव येण्याची गरज आहे अशी माहिती समितीस दिली.

चार्ज एक्सपेंडीचरला अमाऊंट देता येईल असे वित्त विभागाचे म्हणणे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता वित्त विभागाच्या सचिवांनी It is a question of specific propoal. जब डिमांड करेंगे तब नियोजन और वित्त विभाग का संबंध आएगा असा खुलासा केला.

डिमांड केली आणि ती मिळाली नाही असे म्हणणे आहे काय? अशी पृच्छा समितीने केली असता डिमांड की है. But the Finance Department has imposed the cut on that amount. असा खुलासा महालेखाकारांनी केला.

चार्ज एक्सपेंडीचरला कट करता येत नाही. सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील स्थिती कशी आहे? याबाबत समितीने विचारणा केली असता सन २००९ के वित्त विभाग के सर्क्यूलर के अनुसार, The demand has to be raised by the Treasury Officer. Today, what is the procedure followed by your department? अशी महालेखाकारांनी विचारणा केली.

जिल्हा परिषदेकडून एजी ऑफिसकडे मागणी केली जाते. ट्रेझरीबरोबर रि-कन्सीलेशन केल्यानंतर पाठविण्याची गरज आहे. ट्रेझरीने विवरणपत्राची तपासणी करून पाठविले पाहिजे. परंतु, सद्यःस्थितीत जिल्हा परिषद विवरणपत्राची तपासणी करून पाठवित आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

सन २००९ का वित्त विभाग का जो सर्क्यूलर है वह यह है कि डिमांड तो ट्रेझरी ऑफिस से आनी चाहिए. You are not following that circular असा खुलासाही महालेखाकारांनी केला.

सन २००९ रोजीचा शासन निर्णय आहे. यानुसार ट्रेझरी ऑफिसमधून डिमांड आली पाहिजे आणि त्यानुसार पुढील कार्यवाही केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता समितीचे म्हणणे बरोबर असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी मत व्यक्त केले.

या अनुषंगाने जिल्हा परिषद और ट्रेझरी ऑफिस ने रिकन्साईल करना चाहिए, इस तरह का प्रोसिजर है असा खुलासा महालेखाकार यांनी केला. यावर यासंदर्भात योग्य तो पाठपुरावा केला जाईल असा खुलासा ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी केला.

सदरहू परिच्छेदाबाबत दिनांक २ मार्च, २०१६ रोजी पुन्हा साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी अधिक माहिती सांगताना विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा जो पी.एफ. आहे. त्याच्या इन्टरेस्ट बाबत राज्य शासनाने तरतूद केली पाहिजे. त्यांचा इन्टरेस्ट कमी झालेला आहे असा ए.जी.चा पॅरा आहे. शॉर्ट ॲलोकेशन ऑफ पी.एफ. इन्टरेस्ट ग्रॅन्टस् तो पुस्तकामध्ये एडजस्ट होतो. त्याबाबत वित्त विभागाकडे मागणी करतो ती झालेली नाही. यावेळी पुन्हा दिनांक १८.२.२०१६ ला मागणी केलेली आहे. यावेळी सुद्धा वित्त विभागास सादर केलेल्या बजेटमध्ये जो प्रस्ताव असतो तोच समाविष्ट केलेला आहे.

त्यांच्याकडून ग्रँट बजेटमध्ये उपलब्ध झाली नाही तरी विभागाकडे चार्ज एक्सपेन्डीचर आहे. चार्ज एक्सपेन्डीचरला समायोजन झालेले पाहिजे असे समितीने विदित केले असता याबाबत सतत पाठपुरावा करीत असून समितीने नजरेत आणून दिल्यानंतर आम्ही आणखी जोर देतो. फिल्डमध्ये कर्मचाऱ्यांना डिफिकल्टी नाही परंतु प्रोसिजरल मुद्दा आहे तो करणे आवश्यक असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आपण जिल्हा परिषदेला सुद्धा सूचना दिलेल्या आहेत का वित्त विभागाचा दिनांक ३१.०३.२००९ चा शासन निर्णय आहे त्याचे सुद्धा त्यांनी पालन केले पाहिजे या समितीच्या वक्तव्यावर अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

बऱ्याच जिल्हा परिषदांना मागणी प्रमाणे तरतूद मिळत नाही. काही जिल्हा परिषदांनी निधीची कमी मागणी केल्यामुळे निधीची तरतूद शिल्लक राहते. एका बाजूला काहींनी मागणी केली तेवढी मिळत नाही. काहींनी मागणी कमी केली नाही म्हणून तरतूद शिल्लक राहते हे तर मिस मॅनेजमेंट असल्याचे समितीने नमूद केले असता जिल्हा परिषदा ऑक्टोबर महिन्यात मागणी करतात, असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

जिल्हा परिषद, पंचायत समिती मागणी कधी करते, शासनाने मागणी केव्हा केली या सर्वांचे मॉनिटरींग करणे विभागाचे प्रमुख म्हणून सचिवांची जबाबदारी आहे. जिल्हा परिषदांना मंत्रालयामधून सूचना गेल्या पाहिजेत. जिल्हा परिषदेने सी.ई.ओ. ना सांगितले पाहिजे कोणत्या गोष्टी केव्हा केल्या पाहिजेत, जर ते काम वेळेवर करीत नसतील तर आपण मॉनिटरींग केले पाहिजे. विभागातून इन्स्ट्रक्शन गेल्या पाहिजेत याबाबत नवीन शासन निर्णय काढता येतो की, कोणी कधी काय केले पाहिजे ? परंतु असे बोलून ही गोष्ट टाळता येणार नाही असे समितीने नमूद केले असता याबाबत विभागाने पुन्हा त्यांना सूचना दिलेल्या आहेत ही सिस्टीम आम्ही इम्प्रुव्ह करतो. सन २०१४ नंतर आता नवीन पद्धती येणार आहे हा सर्व जुन्या प्रॉव्हिडेंट फंडाचा विषय आहे, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीला असे वाटते की, काही दिवसांनी प्रत्येक विभागामध्ये एक उप सचिव मॉनिटरींग करायला ठेवला पाहिजे. नगरविकास विभागामध्ये सुद्धा तशीच स्थिती आहे. नगरपालिका करीत नाही, महानगरपालिका करीत नाही मग कोण ऑथॉरिटी आहे. काही जिल्हा परिषदांनी कमी मागणी केली व काहींनी जास्त मागणी केली. हे नियमानुकूल नाही. त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. विभागाने कितीही शासन निर्णय काढले, कितीही पत्रे काढली जर त्याचे काटेकोरपणे पालन होत नसेल तर विभागाकडे ॲक्युरेट फिगर येणार नाही. त्यामुळे विभागसुद्धा वित्त विभागाकडे निश्चित मागणी करणार नाही. दर वर्षी विसंगती येणार आहे. समितीला जी फिगर दाखविली ती एकशे नव्वद कोटी तुम्हाला वित्त विभागाकडून सन २०१५ पर्यंत कमी मिळाले, मागणी केली त्याप्रमाणे तुम्हाला निधी दिला. रुपये सातशे अठ्ठेचाळीस कोटी रुपये तुम्हाला वित्त विभागाने दिले ते तुम्ही डिस्बर्स केले परंतु एकशे नव्वद कोटी रुपये हे तुमच्या ग्राऊंड लेव्हलच्या फिडबॅकच्या कमी जास्तमुळे झालेले आहे. यादृष्टीने ही यंत्रणा मजबूत करणे अत्यंत आवश्यक आहे असे समितीने विदित केले असता यासंदर्भात विभागामार्फत एक मोहिम करतो. तथापि, एका गोष्टीकडे लक्ष दिल्यावर दुसरी मागे राहते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

एकावर लक्ष दिल्यावर दुसरी गोष्ट मागे कशी जाते त्यामुळे ही गोष्ट कधीच लाईनवर येणार नाही. ज्यावर लक्ष देणार ते लाईनवरच असायला पाहिजे असे समितीने नमूद केले असता लक्ष देऊनच लाईनवरच काम करतो असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

समिती विचारत आहे त्याप्रमाणे पद्धतीशीरप्रमाणे सुधारणा करायला थोडा अवधी मिळाला तर स्ट्रीम लाईन करतो. दरवेळी नेक्स्ट नेक्स्ट होत असल्यामुळे आम्हाला अडचण होत आहे. लोकलेखा समितीच्या चार-पाच विषयांकडे लक्ष दिले त्यामध्ये काही बॅकलॉग ऑफ अकाऊंट याचा परिणाम दिसलेला आहे. अजून चार ते पाच मुद्दे आहेत. त्यांचे इम्पॅक्ट करू, टाईम बॉन्ड इश्यू करू त्याला दोन-तीन महिने लागतील हा विषय पूर्ण विभागाच्या हातामध्ये नाही याच्यामध्ये वित्त विभागाचा संबंध आहे. दोन्ही विभाग मिळून हा प्रश्न सोडवू असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

विभागाला एक प्लस पॉईंट आहे की, आपल्याकडे कॅफो असतो यावेळेस कॅफो व अकाऊंट ऑफिसर आहेत तर हे प्रॉब्लेम येता कामा नये. जिल्हा परिषदेमध्ये आपण कॅफोची स्पेशल सिस्टीम उभी केलेली आहे. त्यामध्ये त्यांचे कार्यालय, विभाग, अधिकारी आहेत त्यानंतर अशी स्थिती होता कामा नये. तरीसुद्धा आम्हाला या गोष्टीचा आनंद आहे की, १८ तारखेला त्वरेने कारवाई केली. आता या कारवाईचा निकाल आला पाहिजे अशी समितीची अपेक्षा राहणार असल्याने समितीने विभागास सांगितले.

सन १९८५ साली जिल्हा परिषदेतील खालच्या कर्मचाऱ्यांची जी.पी.एफ. च्या ज्या अमाऊंट असतील त्या-त्या ठिकाणी ठेवायच्या आहेत. त्यावरील व्याजाचे प्रदान राज्य शासन करणार अशी समितीची समज झाली आहे. आता यांना मागण्याची आवश्यकता का पडते? जी.पी.एफ.च्या

व्याजाची रक्कम ही गव्हर्मेंट ऑफ इंडिया डिक्लर करते की, किती व्याज देण्यात येणार आहे. कर्मचाऱ्यांच्या पगारातून थेट रक्कम वजा केली जाते. संगणकावर एक सिस्टीम टाकली जाते हे सर्व कॉम्प्युटराईज व ऑनलाईन केले तर मागण्याची आवश्यकता पडणार नाही. आता सध्या काय परिस्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता दिनांक १ जानेवारी २००४ नंतर वेगळी पद्धत आली आहे. कॉन्ट्रीब्युट्री प्रॉव्हीडेन्ट फंड सुरू झाला. जुन्या स्कीमला व्याज शासनाच्या निधीमधून मिळत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सन २०११-१२ चे व्याज देण्याची मागणी आणि सरकारने पाठविलेली रक्कम यामध्ये फरक असेल तर समितीची यासंदर्भात सूचना आहे की, आपले जेवढे रेव्हेन्यू सेक्शन आहेत त्यांच्या मिटींग घ्याव्यात व त्यामध्ये निर्णय घेऊन काम पूर्ण करावे. त्यांना जास्त वेळ थांबविण्याची आवश्यकता नाही. संपूर्ण राज्याचा आणि शासनाचा एकाच वेळी निर्णय घ्यायला बसाल तर जमणार नाही. सहा रीजनल रेव्हेन्यू सर्कल्स् प्रमाणे बसून ज्या ज्या जिल्ह्यात डिफरन्स असतील ते निकाल दीड ते दोन महिन्यांत पूर्ण होतील. तसेच सॅपचे सॉफ्टवेअर घेतले तर सर्व जिल्हा परिषदा मंत्रालयाशी कॉम्प्युटराईज लिंकअप होऊन जातील असे समितीने सूचित केले असता वित्त विभागाकडून सॉफ्टवेअर घेतलेले असून त्याप्रमाणे कार्यवाही विभाग करणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

### ३.५ परिच्छेद क्र. २.२.३.४ “ मुद्रांक शुल्क अनुदानाचे कमी/विलंबाने वाटप करणे ” :—

मुद्रांक शुल्काचे कमी /विलंबाने वाटप झाले आहे याबाबत समितीने विचारणा केली असता मुद्रांक महानिरीक्षक यांनी ११०५.४८ कोटी रुपयांचे अनुदान दिसून येत असल्याचे म्हटलेले असल्याचे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी नमूद केले. या अनुषंगाने विभागाने मुद्रांक शुल्क वाटपाच्या तपासणीचे काम पुन्हा सुरू केलेले असल्याचे मुद्रांक महानिरीक्षक यांनी समितीस सांगितले.

सन २००९ ते २०१४ मधील परिच्छेद आहे. आता विभागाने मुद्रांक शुल्क वाटपाच्या तपासणीचे काम पुन्हा सुरू केलेले असून ११०५ कोटी रुपयेंची आकडेवारी आपल्या विभागाची आहे. शासनाने ३१६ कोटी रुपये कमी डिसबर्स केले आहेत असे समितीने विभागास अवगत केले असता ७८९ कोटी रुपयांचे वाटप करायचे असा आक्षेपातील आकडा आहे. यानुसार ४ वर्षांतील मुद्रांक शुल्क वाटपाच्या तपासणीचे काम पुन्हा सुरू केलेले आहे असा खुलासा नोंदणी महानिरीक्षकांनी पुन्हा केला.

जिल्हावाईज किती बाकी आहे? यवतमाळ, रायगड, हिंगोली, पुणे या ठिकाणची किती बाकी आहे अशी विचारणा समितीने केली असता ११०५ कोटी रुपयांचा जिल्हावाईज आकडा आहे असा खुलासा नोंदणी महानिरीक्षकांनी केला.

११०५ कोटी रुपयांचा जो जिल्हावाईज आकडा काढलेला आहे त्याची प्रत समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात यावी. विभागाने ३१६ कोटी रुपये कमी दिले आहेत, असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. यामध्ये विलंबाची कारणे कोणती आहेत तसेच डिसबर्समेंट कोण करते? अशी विचारणा समितीने केली असता ग्रामविकास विभागाच्यामार्फत बजेट तरतूद केली जाते. बजेट तरतूद मागणीनुसार केली जाते. आयजीआरकडून एकत्रितपणे मागणी घेतली जाते यानुसार बजेट तरतूद केल्यानंतर अनुदान उपलब्ध करून दिले जाते अशी माहिती नोंदणी मुद्रांक निरीक्षक यांनी दिली.

अनुदान कमी दिले किंवा त्यांची मागणी कमी होती काय? ३१६ कोटी रुपये दिले नाहीत, असा मुद्दा असल्याचे समितीने नमूद केले तसेच ग्रामविकास विभागाला सन २००९ ते २०१४ पर्यंत किती रुपयांचा डेटा मिळाला? किती रुपये उपलब्ध करून दिले? शॉर्टफॉल कधीपर्यंत दिले जाणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता स्टॅम्प ड्युटी किती वसूल झालेली आहे, त्यासंदर्भातील डेटा उपलब्ध आहे. यानुसार पुढील बजेट केले जाते त्यानंतर आयजीआरला दिले जाते आणि त्यानंतर फिल्डमध्ये उपलब्ध करून दिले जाते. शॉर्टफॉलनुसार ३१६ कोटी रुपयेंची रक्कम येत असल्याचे ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले तसेच ३ प्रकारच्या दस्तांवर अतिरिक्त मुद्रांक शुल्क १ टक्क्यानुसार आकारले जाते अशी माहिती नोंदणी मुद्रांक निरीक्षक यांनी दिली.

मुद्रांक शुल्काच्या हेडमध्ये ११०५ कोटी रुपयांचा आकडा आहे. ११०५ कोटी रुपयांचा आकडा हा ४ जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे. मुद्रांक शुल्काचा व्यवहार झाल्यानंतर महिन्याला ताबडतोब पैसे दिले पाहिजे, अशा प्रकारची शिफारस समितीला करावी लागणार आहे. २५ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्काचा व्यवहार झालेला आहे. त्यातील ४ टक्के मुद्रांक शुल्क भरावे लागते असे समितीने विभागास अवगत केले असता सन १९६० नुसार अनेक प्रोसिजर्स आहेत ती कार्यप्रणाली सद्य:स्थितीत क्लिष्ट आहे. यामध्ये सुस्पष्टता किंवा सोपे करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीला उत्पन्न मिळवून देण्यासाठी एक कायमस्वरूपी अधिकारी नाही. मुख्य लेखा व वित्त अधिकारी आहे त्यांना अनेक कामे असतात. जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीला उत्पन्न मिळवून देण्यासाठी एक कायमस्वरूपी अधिकारी देण्याबाबत प्रयत्नशील आहोत. यासाठी वर्षाला ८ ते ९ लाखांपेक्षा जास्त खर्च येणार नाही. जर कायमस्वरूपी अधिकारी दिला तर जिल्हा परिषदेला ३ ते ४ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. सद्य:स्थितीत चोवीस तास काम पाहणारे एक युनिट हवे आहे अशी माहिती ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी समितीस दिली.

या कामासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याची गरज असल्याचे समितीने नमूद केले असता फॉलोअप घेणे, अकाऊंट करणे अशी कामे आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर तीन ते चार विभागांची जबाबदारी निश्चित केलेली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने अतिरिक्त यंत्रणा उभी केली तर आमचे समर्थन असणार आहे. निधीचा विनियोग वेळेवर होत नाही. जिल्हा परिषदेला मुद्रांक शुल्क वेळेवर मिळत नाही. ११०५ कोटी रुपयांचे कॅलक्युलेशन केलेले आहे काय? अशी पृच्छा समितीने केली असता ४ जिल्ह्यांमध्ये ७८९ कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे. ग्रामविकास विभागाला ११०५ कोटी रुपयांचा आकडा कळविला होता. सन २०११-२०१२ या वर्षासाठी ८० कोटी रुपयांची तफावत होती असे ग्रामविकास विभागाने सांगितले आहे. पुढील वर्षातील तपासणी करून समितीला आणि विभागाला अंतिम आकडा किती आहे ते कळविले जाईल असा खुलासा नोंदणी मुद्रांक निरीक्षक यांनी केला.

या संदर्भात जुन्या पद्धतीने कॅलक्युलेशन करीत आहात की त्यात काही सुधारणा करण्यात आली आहे? अशी विचारणा समितीने केली असता जुन्या पद्धतीने कॅलक्युलेशन करून जिल्हा परिषदांमार्फत ग्रामीण भागात एक टक्का कर घेतला जातो असा खुलासा नोंदणी मुद्रांक निरीक्षक यांनी केला.

जिल्हानिहाय मुद्रांक शुल्काच्या अनुदानाची किती रक्कम प्राप्त झाली याची शासनाकडे माहिती प्राप्त होत नाही का? मुंबईला हेड ऑफिस असल्याचे सांगतो हेड ऑफिसला प्राप्त होणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या अनुदानाची रक्कम जिल्हा परिषदांना ३ ते ४ वर्षे वाटप न होणे याचा अर्थ जिल्हा परिषदांना अडचणीत आणण्याकरिता सदर कार्यालय आहे का? हेड ऑफिसला वर्षाअखेर सदरहू माहिती प्राप्त होत नाही काय? मुद्रांक शुल्क अनुदानाच्या संदर्भात दरमहा आपल्या हेड ऑफिसला माहिती मिळत नाही काय? त्यांची यंत्रणा अद्ययावत नसल्यामुळे मॅन्युएली पद्धतीने काम करीत असून परिणामी सर्व जिल्हा परिषदा अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही असे मत समितीने व्यक्त केले. तसेच पुणे जिल्ह्यात ५८२ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्क प्राप्त झाल्याची माहिती समितीला देण्यात आली. सर्वात जास्त मुद्रांक शुल्क पुणे जिल्ह्यातून प्राप्त होत असावा असे मला वाटते. खेड तालुक्यात सर्वाधिक मुद्रांक शुल्क जमा होतो. त्यापैकी पुणे जिल्ह्याकरिता किती मुद्रांक शुल्क अनुदान वाटप करण्यात आले?

महालेखापाल यांच्या ऑडिट पॅरात ५ वर्षांच्या काळातील पुणे जिल्ह्याच्या मुद्रांक शुल्काच्या अनुदानाच्या फरकाची रक्कम संबंधी १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचे नमूद केले आहे. मुद्रांक शुल्काची रक्कम प्राप्त झाल्यानंतर मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम संबंधित जिल्ह्याला त्याच महिन्याच्या शेवटी ट्रान्सफर करण्यासाठी ग्रामविकास विभागाकडे वर्ग का केली जात नाही? हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे असे समितीने नमूद केले असता जिल्हानिहाय मुद्रांक शुल्काच्या अनुदानाची किती रक्कम प्राप्त झाली याची माहिती मिळण्यास अडचण येत नाही. सन २०१२ पूर्वी कार्यप्रणाली सेंट्रलाईज नव्हती. त्यानंतर कार्यप्रणाली सेंट्रलाईज झाली असून मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम कन्सोलिडेटेड फंडात जमा होते व त्याची आकडेवारी ग्रामविकास विभागाला कळविली जाते असा खुलासा नोंदणी मुद्रांक निरीक्षक यांनी केला.

मुद्रांक शुल्काच्या अनुदानाची आकडेवारी वेळेवर मिळत नाही. तसेच ५-५ वर्षे रिकन्सीलिएशन झालेले नाही. मार्च, २०१४ च्या संदर्भात समिती माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये चर्चा करीत आहोत. जिल्हा परिषदांनी ग्रामपंचायतींना वेळेवर ५० टक्के मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम वेळेवर पाठविणे आवश्यक आहे. परंतु ५-५ वर्षे रिकन्सीलिएशन न झाल्यामुळे वेळेवर रक्कम न पाठविल्यामुळे ग्रामपंचायती अडचणीत येतात. ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क अनुदानाचा पूर्ण हिस्सा दिला आहे का?

मुद्रांक शुल्क अनुदान रकमेची माहिती मिळाल्याशिवाय जिल्हा परिषदांच्या बजेटचे काम पूर्ण होऊ शकत नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता जिल्हा परिषदांनी मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम ग्रामपंचायतींकडे हस्तांतरीत करण्यासंबंधी मोहिम सुरू केली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

५४.४५ कोटी रुपयांच्या मुद्रांक शुल्काची रक्कम ग्रामपंचायतींना वितरण करण्यास विलंब झालेला आहे. ऑडिट पॅरामध्ये मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम वाटप करण्यासाठी १ ते १८ वर्षांचा विलंब झाल्याने नमूद केलेले असताना विभागाच्या लेखी स्पष्टीकरणाच्या उत्तरात ४ जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम वाटप करण्यास ४ ते ६ वर्षांचा विलंब झाल्याचे नमूद केले आहे. याचा अर्थ ऑडिट पॅरामधील आक्षेप चुकीचा आहे का? अशी पृच्छा समितीने केली. तसेच मुद्रांक शुल्क अनुदानाची वाटप करावयाची रक्कम ग्रामविकास विभागाच्या कोणत्या खात्यात जमा आहे? विभागाने लेखी स्पष्टीकरणात ४ जिल्ह्यांची माहिती दिली आहे. परंतु महालेखाकार कार्यालयाला सर्व जिल्ह्यांच्या संदर्भात मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम वाटप करण्यासाठी साधारणतः १ ते १८ वर्षांचा विलंब झाल्याचे आढळून आले आहे. यामुळे मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम वाटप करीत असताना सिस्टीममध्ये काही दुरुस्ती करण्यात येणार आहे काय? तसेच कोणत्या जिल्ह्यांना मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम वाटप करण्यासाठी १८ वर्षांचा विलंब झाला आहे? याबाबत समितीने विचारणा केली तसेच पेठ पंचायत समिती एप्रिल, १९९६ पासून आतापर्यंत, २००९ पासून पालघर पंचायत समिती, २०१२ पासून चांदवड पंचायत समिती, २००३ पासून नांदगाव पंचायत समिती, एप्रिल, २००४ पासून सुरगाणा व

येवला पंचायत समिती, २०१० पासून नाशिक पंचायत समिती आणि २००८ पासून त्र्यंबकेश्वर पंचायत समिती यांना मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम न मिळाल्याबाबत ए.जी. कार्यालयाने ऑडिट पॅरामध्ये आक्षेप घेतला आहे. या संदर्भात ज्यांनी विलंब लावला, त्यांच्याविरुद्ध कारवाई प्रस्तावित केली आहे का? तसेच या प्रक्रियेत सुधारणा होण्याकरिता काही प्लॅन तयार करण्यात येणार आहे का? अशी पृच्छा समितीने केली असता विभागाकडून जिल्हा परिषदांच्या स्तरावर सस्टेंड मोहिम करीत असल्याचे तसेच मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम वाटप करण्यास ज्यांच्याकडून विलंब करण्यात आला अशा संबंधितांना कारणे दाखवा नोटीस काढून त्यांच्याकडून खुलासा मागविला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या प्रकरणी फक्त कारणे दाखवा नोटीससंबंधी कारवाई मर्यादित न ठेवता संबंधितांविरूद्ध पुढील कारवाई करून केलेल्या कारवाईसह अहवाल समितीकडे एक महिन्याच्या आत सादर करावा. तसेच पुढील काळात या संबंधी कशा प्रकारे स्ट्रीम लाईन करणार आहात, वेळेवर मुद्रांक शुल्काच्या अनुदानाची रक्कम येणे व ती ग्रामपंचायतींना वेळेवर पोहचणे अत्यावश्यक आहे. यासंबंधी विभाग कोणती कार्यवाही करणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता समितीकडे सविस्तर माहिती पाठविण्यासाठी दोन महिन्यांची मुदत मिळावी अशी विनंती विभागीय सचिवांनी केली व समितीने ती मान्य केली. या अनुषंगाने विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम पाठविणे शिल्लक नसल्याबाबत कॅफोकडून तातडीने एनओसी घेतो, जेणेकरून काही अनुदानाची रक्कम प्रलंबित असल्यास ती तातडीने खालच्या स्तरावर पाठविण्याची कार्यवाही होऊ शकेल.

एनओसी दिलेली असो किंवा नसो, जिल्हा परिषदेकडे मुद्रांक शुल्काची रक्कम प्राप्त झाल्यानंतर ती ठराविक कालावधीत ग्रामपंचायतींकडे पोहचली पाहिजे, ही गोष्ट त्यांना बंधनकारक करावी.

वाटप करावयाची मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम ग्रामविकास विभागाच्या कोणत्या खात्यात जमा आहे? अशी विचारणा समितीने केली असता या संबंधीची रक्कम आयजीआरला उपलब्ध करून दिल्यानंतर, आयजीआरकडे जमा असलेल्या रकमेनुसार प्रत्येक जिल्हा परिषदेला रक्कम पाठविली जाते. यानंतर जिल्हा परिषद स्वतःकडे ५० टक्के रक्कम ठेवते व उर्वरित ५० टक्के रक्कम संबंधित ग्रामपंचायतींना वाटप करते. जिल्हा परिषद सेस फंडात सदर रक्कम जमा केली जाते अशी माहिती नोंदणी मुद्रांक निरीक्षकांनी दिली.

मुद्रांक शुल्क अनुदानाची ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतींना वाटप केली पाहिजे. परंतु ती वेळेवर वाटप केली जात नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, आयजीआरकडून जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अनुदानाची पूर्ण रक्कम दिली जात नाही. यामुळे सर्व विसंगती होत आहे. यामुळे समितीने संपूर्ण राज्यात जिल्हानिहाय मुद्रांक शुल्क अनुदानाची किती रक्कम देय आहे, त्यापैकी किती रक्कम अदा करण्यात आली व किती रक्कम प्रलंबित आहे, प्रलंबित असलेली रक्कम कधी वाटप करणार आहात? याबाबतची सर्व माहिती १५ दिवसांच्या आत समितीकडे सादर करावी असे विभागास सांगितले असता मुद्रांक शुल्क अनुदानाची ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतींना वाटप केली पाहिजे. भविष्यात पुढील ग्रँट देतेवेळी ही रक्कम ॲडजेस्ट केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

सदरहू परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २ मार्च २०१६ रोजी पुन्हा साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अधिक माहिती देताना नोंदणी महानिरीक्षकांनी असे विदित केले की, मागच्या १६ तारखेच्या साक्षीमध्ये समितीने सूचना दिली होती विभागाने त्यानुसार संपूर्ण राज्याची माहिती घेतली असून त्यामध्ये काही प्रमाणात डिफरन्स आढळून आले परंतु डिफरन्स कमी झालेला आहे. या चार जिल्ह्यांच्या सन २०१३-२०१४ बाबतच्या फरकासंदर्भात सांगणार आहात का? आपण समितीला चार्ट दिलेला आहे तो सन २०१४-१५ पर्यंतचा दिलेला आहे. आता चार जिल्ह्यांच्या सन २०१४-१५ पर्यंतची माहिती सांगावी अशी समितीने सांगितले असता चार जिल्ह्यांचा सन २०१४-१५ पर्यंतचा ७७ कोटी ४१ लाख रुपयांचा डिफरन्स असल्याचे मुद्रांक नोंदणी निरीक्षकांनी सांगितले.

संपूर्ण राज्याचा एकूण ७४ कोटी ८५ लाख रुपयांचा डिफरन्स आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता पूर्ण राज्याचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात आले आहे की, ३३ जिल्ह्यांपैकी १४ जिल्ह्यांमध्ये देय रकमेपेक्षा काही प्रमाणात जास्त रक्कम दिलेली आहे. १९ जिल्ह्यांमध्ये त्याच्या तुलनेत कमी रक्कम दिलेली आहे. त्यापैकी सर्वात रक्कम जास्त पुणेमध्ये दिलेली आहे. त्याचे ७० कोटी रुपयांचे देयक बाकी आहे. इतर किरकोळ रकमा आहेत. येत्या वित्तीय वर्षात मागणी करून पूर्ण देऊन टाकण्यात येईल असे मुद्रांक नोंदणी निरीक्षकांनी विदित केले.

जिथे विभागाने अतिरिक्त रक्कम देऊन टाकली त्याचे काय? काही जिल्ह्यांना अतिरिक्त दिले, काही जिल्ह्यांना कमी करून टाकले. एक्सेस कशामुळे झाले. त्याचे कारण काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता जेथे अतिरिक्त रक्कम दिली त्याचे समायोजन करून घेतो असे मुद्रांक नोंदणी निरीक्षकांनी सांगितले. तसेच यामध्ये पूर्वी मॅन्युअल अकाऊंट सिस्टीम होती. त्यामुळे आमच्या जिल्हा परिषदा व आमच्या विभागामध्ये कळविण्यात फरक होता. याबाबत पूर्ण सॉर्ट आऊट केलेले आहे. सन २०१४ पासून आपल्या सॉफ्टवेअरमध्ये तरतूद केलेली आहे. प्रत्येक सब रजिस्ट्रारला ग्रामपंचायतीने तीन डॉक्युमेंटमधून आम्ही १ टक्का घेतो. त्याची माहिती काढण्याबाबत सॉफ्टवेअरमध्ये तरतूद करून दिलेली आहे. लवकरच जिल्हास्तरावर व राज्यस्तरावर एकत्रित सॉफ्टवेअरमधून डेटा मिळेल अशी व्यवस्था करून घेतो यापुढे असा डिफरन्स येणार नाही. तीन महिन्यांत याबाबत व्यवस्था करण्यात येईल असे समितीस सांगितले.

उत्तरामध्ये दिलेले आहे की, १५ दिवसांच्या आत जिल्हा परिषदेला रक्कम वितरित करण्यात येईल. दर महिन्याला देणार की, एका वर्षामध्ये देणार? अशी पृच्छा समितीने केली असता विभागाकडे क्वॉर्टरली रक्कम येते चार क्वॉर्टरमध्ये शासनाकडून रक्कम येते. रक्कम आल्याबरोबर १५ दिवसांच्या आत त्यांना ती रक्कम देतो. प्रत्येक क्वॉर्टरमध्ये त्यांना रक्कम देतो असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

समितीची मागणी अशी आहे की, जिल्हा परिषदेने सुद्धा ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतीला द्यायची आहे. त्याला सुद्धा त्यांनी मॅन्डेट्री केले पाहिजे. त्यांनी सुद्धा पंधरा दिवसांच्या आत ग्रामपंचायतीला त्यांच्या अकाऊंटमध्ये रक्कम आली की दिलीच पाहिजे नाहीतर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. मार्च महिन्याच्या अखेर पैसे येतील आणि एकाच दिवसात सर्व पैसे संपवून टाकतील असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता यासंदर्भात सर्वांना नोटीस दिलेली असून त्यानंतर जबाबदारी निश्चित करावयास सांगितलेले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

जिल्हा परिषदेला व ग्रामपंचायतीला क्वॉर्टरवाईज रक्कम वितरित झाली पाहिजे. ज्या लोकांना रक्कम मिळाली नाही तुम्ही म्हणाल पुढच्या वर्षी करू कारण चार जिल्ह्यांमध्ये ७७ कोटी कमी आहेत, संपूर्ण राज्यामध्ये ७८ कोटी कमी आहेत. ७८ कोटी रुपयांबाबत लवकर मागणी केली पाहिजे असे समितीने विभागास सूचित केले असता ग्रामविकास विभागाकडून लगेच मागणी करण्यात येईल व पैसे आल्यानंतर लगेच वितरित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. ग्रामविकास विभागाकडे पैसे वर्ग केलेले आहेत काय? या प्रश्नाला शासनस्तरावरून आरडीडी आमच्याकडे पैसे वर्ग करते ते नॉन प्लानला ॲड करतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच स्टॅम्प ड्युटीचे पैसे आले तरी ते कन्सोलिडेटेड फंडामध्ये सबमिट करतो. ट्रेझरीला जातो व पुन्हा शासनाकडून ते घेतो अशी माहितीही विभागीय सचिवांनी दिली.

याबाबत सॉफ्टवेअर तयार करत असल्याबाबत अधिकाऱ्यांनी सांगितले. आपण सिस्टम केली त्यानुसार जिल्ह्यांचे पैसे जिल्ह्याच्या ठिकाणीच देता येतील. सन २०१५-२०१६ चे अकाऊंट दिनांक ३१ मार्च २०१६ पूर्वी रेग्युलराईज झाले पाहिजे, अशी समितीची अपेक्षा असल्याचे समितीने मत व्यक्त केले.

**३.६ परिच्छेद क्र. २.२.३.५ 'वन महसूल अनुदानाची कमी प्राप्ती' :**

१३ वने हेडचे अनुदान पूर्वीप्रमाणे मिळत आहे. गोंदिया जिल्ह्यात १३ वने हेडअंतर्गत मिळणारे अनुदान बंद झाल्यामुळे ७ आयुर्वेदिक व ३ ॲलोपॅथीक दवाखाने बंद करण्यात आले. या संबंधी वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती. १३ वने हेडच्या दायित्त्वामध्ये काही फेरबदल झाले आहेत का? अशी विचारणा समितीने केली असता महाराष्ट्र जिल्हा परिषदा ॲक्ट, १९६१ मधील कलम १८१(ए) नुसार दरवर्षी जमा होणाऱ्या वने महसूल रकमेच्या ७ टक्के रक्कम सदर जिल्ह्यांना दिली जाते. ज्यावर्षी महसुलाची रक्कम द्यावयाची असते, त्या मागील ३ वर्षी जो महसूल जमा झालेला असतो त्याची सरासरी काढून तेवढी डिमांड वन विभागामार्फत ग्रामविकास विभागाकडे केली जाते. ग्रामविकास विभागाकडून नॉन प्लॅनमध्ये बजेटची तरतूद करीत असते. त्यांच्यामार्फत हा निधी उपलब्ध होत असतो, तो सर्व जिल्हा परिषदांना दिला जातो. १३ वने योजना सुरू आहेत. जिल्हा परिषदेमध्ये जे विविध हेड आहेत, त्यात १३ वने हेड आहेत. जिल्हा परिषदेच्या १३ वने याच हेडमध्ये ७ टक्के रक्कम जात असते, त्यातून विविध कामे घेतली जातात. ग्रामविकास विभागाने दिनांक १२ नोव्हेंबर १९९३ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय कार्यरत आहे. सदर शासन निर्णयात ७ टक्के अनुदानातून १३ वने हेड खाली जिल्हा परिषदा कोणकोणती कामे घेऊ शकतात, या संबंधी यादी दिलेली आहे. सदरहू शासन निर्णयामध्ये वनीकरन करणे, सार्वजनिक मैदाने, बागा इत्यादी ठिकाणी झाडे लावणे, वन विभागातील रस्त्यांचे बांधकाम करणे, वैद्यकीय व रुग्णालयीन सेवा उपलब्ध करून देणे, पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, शाळांच्या इमारतीची व्यवस्था करणे इत्यादी २४ प्रकारची वेगवेगळी कामे नमूद करण्यात आलेली आहेत. दरवर्षी उक्त लेखाशीर्षांतर्गत वनोपजापासून मागील तीन आर्थिक वर्षांत प्राप्त होणाऱ्या एकूण वन महसुलाच्या ७ टक्के अनुदानानुसार साधारणतः १५ कोटी रुपयांच्या आसपास राज्यासाठी निधी उपलब्ध होत असतो. सन २०१०-११ मध्ये एकूण वन महसूल २४१ कोटी रुपये जमा झाला होता. प्रचलित पद्धतीनुसार अगोदरच्या तीन वर्षांची सरासरी काढून ७ टक्के अनुदान दिले जाते. काही जिल्हा परिषदांनी ७ टक्के अनुदानातून काही ठिकाणी दवाखाने सुरू केले आहेत. परंतु त्यांनी उक्त ७ टक्के अनुदानातून डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. गेली अनेक वर्षे या अनुदानातून डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचा पगार दिला जात होता. परंतु मागच्या काही वर्षांपासून पगारावरील खर्चाच्या बाबतीत ऑडिट ऑब्जेक्शन आले की, ७ टक्के अनुदान हे केवळ विकास कामांसाठी वापरावयाचे आहे. त्यामुळे सदरहू अनुदानातून पगार देता येणार नाही. त्यामुळे डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे पगार देण्यात गोंदिया जिल्हा परिषदेसह काही जिल्हा परिषदांना अडचणी आलेल्या आहेत. शासन निर्णयातील २४ बाबींमध्ये आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याची बाब सुद्धा समाविष्ट आहे. मुळात या अनुदानातून विकास कामे घेण्यासाठी कोणतीही अडचण नाही. आरोग्य विभागाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, उक्त शासन निर्णयानुसार औषधी खरेदी करणे, यंत्रसामुग्री खरेदी करणे यासारखी कामे करण्यात कोणत्याही अडचणी नाहीत. सदरहू शासन निर्णय हा ग्रामविकास विभागाचा आहे. त्यामुळे उक्त अनुदानातून पगार देता येतो की नाही या बाबतीत त्या विभागाला निर्णय घ्यावा लागेल असा खुलासा सचिव, वन विभाग यांनी केला.

अनेक वर्षांपासून त्या रुग्णालयांमध्ये कर्मचारी काम करीत आहेत. गोंदिया जिल्ह्यातील मजीदपूर आणि पांगरी हा जवळजवळ ९५-१०० टक्के आदिवासी भाग आहे. परंतु आता त्या ठिकाणी सुरू असलेले आयुर्वेद दवाखाने बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी वैद्यकीय सुविधेची

कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे गावांमध्ये पर्यायी वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देता आली तर पहावे. जर विभागाला या दोन्ही गावांतील दवाखाने सुरू करता येत नसतील तर त्या भागातील लोकांचे आरोग्यविषयक भवितव्य काय राहणार आहे? वास्तविक पाहता त्या भागात गेल्या २५-३० वर्षांपासून लेखाशीर्ष १३-वने अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून दवाखाने सुरू होते. परंतु आता शासन निर्णयामुळे ही दोन्ही रुग्णालये बंद झाली आहेत.

२५-३० वर्षांपासून अनेक ठिकाणी लेखाशीर्ष १३-वने या अंतर्गत अनेक भागांत दवाखाने सुरू होते. आता एनआरएचएम आणि इतर बऱ्याच कार्यक्रमाच्या माध्यमातून ठिकठिकाणी आरोग्य सेवा निर्माण झालेल्या आहेत. परंतु पूर्वीच्या कालखंडात ॲलोपॅथी आणि आयुर्वेदिक दवाखाने सुरू होते. त्यामुळे जुन्या दवाखान्यांना सदरहू शासन निर्णयातून सूट दिली पाहिजे. आता बहुतेक ठिकाणी आरोग्य उप केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू झालेली आहेत. परंतु काही गावांमध्ये अजूनही या सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यातीलच मजीदपूर आणि पांगरी ही दोन गावे आहेत. समितीला असे वाटते की, जुन्या दवाखान्यांसाठी नव्हे तर नवीन दवाखान्यांच्या बाबतीत ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय लागू करावा असे समितीने व्यक्त केले असता लेखाशीर्ष १३-वने अंतर्गत कोणकोणती कामे घेता येतात हे ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयात नमूद केले आहे. त्यामुळे या लेखाशीर्ष अंतर्गत घेण्यात आलेल्या कामामध्ये डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे पगार अदा करावयाचे की नाहीत, या बाबतीत ग्रामविकास विभागालाच निर्णय घ्यावा लागेल असे मत वन विभागाच्या सचिवांनी व्यक्त केले.

या अनुषंगाने ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी वन विभागाचे सचिव आणि ग्रामविकास विभागाचे सचिव एकत्रित बसून या अनुषंगाने काय करता येईल हे पाहतो असे समितीस सांगितले.

सध्या जवळजवळ ९० ठिकाणी आरोग्य सेवेचा प्रश्न मिटलेला आहे. परंतु ज्या ठिकाणी अन्य कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही तेथील दवाखाने शासन निर्णयानुसार बंद करण्यात आले आहेत. समितीची अपेक्षा आहे की, ज्या ठिकाणी आरोग्याच्या दृष्टीने पर्यायी व्यवस्था नाही त्या ठिकाणी रिलॅक्सेशन देण्याची आवश्यकता आहे. मजीदपूर आणि पांगरी येथे कोणतीही पर्यायी आरोग्य सेवा उभी न करता ते दवाखाने बंद केले आहेत अशी माहिती समितीने विभागास अवगत केली असता ज्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने चर्चा सुरू आहे तो २३ वर्षांपूर्वी निर्गमित करण्यात आलेला असल्याचा खुलासा ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी केला.

परंतु जे दवाखाने बंद करण्यात आलेले आहेत ते हा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वीचे असल्याचे समितीने विभागास अगवत केले तसेच शासन निर्णयानुसार ३ वर्षांपूर्वी गोंदिया जिल्ह्यातील उक्त दोन्ही दवाखाने बंद करण्यात आलेले आहेत. त्या ठिकाणी अन्य कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीत त्या भागातील लोकांनी उपचार करून घेण्यासाठी काय करायचे असा प्रश्न समितीने विभागास केला असता सदरहू लेखाशीर्षाच्या अनुदानातून डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे पगार अदा करावयास लागलो तर शासन निर्णयामध्ये जी २४ विकासविषयक कामे नमूद करण्यात आलेली आहेत त्यावर परिणाम होऊ शकेल. १३-वने या लेखाशीर्षाच्या अनुदानातून पगारावर खर्च करावयास लागलो तर जिल्हा परिषदेच्या आरोग्यविषयक किंवा इतर विकास कामांवर विपरित परिणाम होईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

७ टक्के अनुदानातून ५ जिल्ह्यांना ४१ लाख रुपये जास्त आणि उर्वरित ३ जिल्ह्यांना ६ कोटी ७३ लाख रुपये कमी वितरित करण्यात आले या बाबतीत विभागीय सचिवांचे काय म्हणणे आहे? अशी विचारणा केली असता या आक्षेपाच्या अनुषंगाने वर्षनिहाय माहिती उपलब्ध आहे. लेखा परिच्छेदामध्ये नमूद केले आहे की, ८ पैकी ५ जिल्ह्यांना ४१ लाख रुपये जास्त वितरित केले आहेत. तसेच उर्वरित ३ जिल्हांना ६ कोटी ७३ लाख रुपये कमी वितरित केले आहेत. वन विभागाने वर्षनिहाय व जिल्हा परिषदनिहाय संपूर्ण आकडेवारी तपासली. त्यानुसार अनुदानाची एकूण ४१ लाख रुपये नव्हे तर ५ लाख ५४ हजार रुपये जास्त वितरित करण्यात आले आहेत. तसेच ६ कोटी ७३ लाख रुपये कमी नव्हे तर ७७ लाख ९४ हजार रुपये कमी दिलेले आहेत. काही जिल्ह्यांना जास्त अनुदान का दिले याबाबतचा विभागाने अभ्यास केला. सन २०१०-११ मध्ये रेग्युलर ग्रँटशिवाय पूरक मागणीद्वारे ५१ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद केली होती ती सुद्धा जिल्हा परिषदांना वाटप करण्यात आली. ही रक्कम २००५-०६ ते २०१०-११ या कालावधीची आहे कारण राज्य सरकार प्रत्येक वर्षी संपूर्ण रक्कम देऊ शकत नाही. २००९-१० मध्ये एकूण ३६ लाख ५४ हजार रुपये मिळावयाचे होते. परंतु शासनाकडून केवळ २२ लाख ३५ हजार रुपये उपलब्ध झाले. २०१०-११ मध्ये ४३ लाख रुपयांच्या अगेन्स्ट १५ लाख ६४ हजार प्राप्त झाले. अशाप्रकारे प्रत्येक वर्षीच्या रकमेत गॅप पडलेला आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षाची गॅप भरून काढण्यासाठी गेली काही वर्षे पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून अनुदानाची मागणी केली जाते. २०१०-११ मध्ये ५१ लाख रुपये पुरवणी मागणीमध्ये मागणी केली होती. ती रक्कम पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून उपलब्ध झाल्यामुळेच अतिरिक्त रक्कम दिल्याचे दिसते असा खुलासा वन विभागाच्या सचिवांनी केला.

काही जिल्ह्यांना अनुदानापोटी ५ लाख रुपये जास्त वितरित केले होते त्याचे पुढील वर्षात समायोजन केले काय? तसेच विभागाने सांगितले की, उर्वरित ३ जिल्ह्यांना ६ कोटी ७३ लाख रुपये अनुदान कमी वितरित झाले नसून ७७ लाख ९४ हजार कमी वितरित झाले आहे याबाबत वन विभागाचे म्हणणे काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता जिल्हा परिषदांना वितरित करण्यात आलेले ५ लाख ५४ हजार रुपयांचे अतिरिक्त अनुदान चालू आर्थिक वर्षात वळते करून घेण्यात येईल व काही जिल्ह्यांना अनुदानापोटीची ७७ लाख ९४ हजार इतकी कमी रक्कम दिली आहे ती यावेळी पुरवणी मागण्यांमध्ये प्रस्तावित करीत आहोत असा खुलासा सचिव, वन विभाग यांनी केला.

हा ८ जिल्हा परिषदांचा विषय आहे संपूर्ण राज्याची काय परिस्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता राज्यामध्ये एकूण ३४ जिल्हा परिषदा आहेत. या ३४ जिल्ह्यांमध्ये सदरहू अनुदान दरवर्षी वितरित करण्यात आले आहे. सन २०१०-११ मध्ये १५ कोटी ८६ लाख १७ हजार रुपये, २०११-१२ मध्ये १५ कोटी ३८ लाख ४७ हजार रुपये, २०१२-१३ मध्ये १६ कोटी ११ लाख ४३ हजार रुपये, २०१३-१४ मध्ये १४ कोटी ५० लाख २९ हजार रुपये, २०१४-१५ मध्ये १६ कोटी ११ लाख ४३ हजार रुपये आणि २०१५-१६ मध्ये १४ कोटी ५० लाख २८ हजार ७०० रुपये वाटप केले असल्याचा खुलासा सचिव, वन विभाग यांनी केला.

समितीकडे २०१४ पर्यंतची माहिती आहे यापुढे अनुदानाचे वाटप कमी-जास्त प्रमाणात होणार नाही या दृष्टीने विभागाने काय नियोजन केले आहे? याबाबत माहिती देताना सचिव, वन विभाग यांनी असा खुलासा केला की, जादा अनुदान कधीच दिलेले नाही उलट नेहमी जेवढी मागणी असते त्यापेक्षा शासनाकडून कमीच अनुदान प्राप्त होते. सर्वसाधारणतः पुरवणी मागणीची रक्कम मूळ अनुदानामध्ये समाविष्ट केली तर अतिरिक्त अनुदान दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे रिकन्सीलेशन केल्यानंतर विभागाकडून या बाबतची माहिती सादर करण्यात येईल.

वन महसूल अंतर्गत कोणकोणत्या महसुलाचा समावेश होतो किंवा वन महसुलाच्या उत्पनाचे स्त्रोत कोणते आहेत? अशी पृच्छा समितीने केली असता वन महसुलामध्ये मुख्य उत्पनाचे स्त्रोत म्हणजे इमारती लाकूड आहे. जंगलात मॅच्युअर्ड झालेल्या झाडांना आयडेंटीफाय करण्यात येते आणि वर्कींग प्लाननुसार टप्प्याटप्प्याने ती झाडे कापण्यात येतात. तद्नंतर त्यांचे ऑक्शन करण्यात येते. त्यातून मिळणारा महसूल इमारती लाकूड म्हणून मिळतो. याशिवाय जळाऊ लाकडांचा लिलाव करण्यात येतो. त्यातून सुद्धा महसुली उत्पन्न प्राप्त होते. या बरोबरच बांबू, गवत, गौण वनोपज इत्यादींचे सुद्धा ऑक्शन करून त्यातून मिळणारे उत्पन्न हे महसुली उत्पन्न असते. तसेच इमारती लाकूड, बांबू इत्यादींची विक्री केल्यानंतर त्या अंतर्गत वन विकास कराच्या माध्यमातून १२ टक्के कर मिळतो. ते सुद्धा महसुली उत्पन्न आहे. वन गुन्ह्यांमध्ये जो दंड वसूल केला जातो ते सुद्धा महसुली उत्पन्न असते. अशाप्रकारे महसुली उत्पनापोटी सन २०१०-११ मध्ये २४१ कोटी ५४ लाख रुपये, २०११-१२ मध्ये २६३ कोटी ३३ लाख रुपये, २०१२-१३ मध्ये २५२ कोटी ७७ लाख रुपये, २०१३-१४ मध्ये १८५ कोटी ६० लाख रुपये, २०१४-१५ मध्ये २११ कोटी ९९ लाख रुपये आणि सप्टेंबर, २०१५-१६ पर्यंत ११५ कोटी ५७ लाख रुपये मिळालेले आहेत. महसुली उत्पन्न हे काही कारणांमुळे दरवर्षी कमीकमी होत चालले आहे. कारण पूर्वी तेंदू पत्त्यापासून महसूल मिळत होता. परंतु आता शासनाने निर्णय घेतला आहे की, तेंदू पत्त्याच्या उत्पनाची संपूर्ण रक्कम तो व्यवसाय करणाऱ्या मजुरांना बोनस स्वरूपात द्यावी. त्यामुळे तेंदू पत्त्यापासून मिळणारा महसूल बंद झाला आहे. शिवाय राज्यात पेसा कायद्याची अंमलबजावणी होण्यास सुरूवात झाली आहे. त्यानुसार पेसा क्षेत्रात मिळणारा वनोपजाचा महसूल त्या ग्रामपंचायती वा ग्रामसभेला मिळणार आहे. तसेच बांबूपासून मिळणारे उत्पन्न सुद्धा पेसा क्षेत्रात त्या त्या ग्रामपंचायती वा ग्रामसभेला मिळणार आहे. मागच्या वर्षी या बाबींची अंमलबजावणी करण्यास सुरूवात झाली आहे त्यामुळे ही रक्कम कमीकमी होत जाणार आहे. हा निधी राज्यस्तरावर येण्याऐवजी स्थानिक स्तरावरच त्या त्या ग्रामपंचायतींना मिळणार आहे अशी माहिती सचिव, वन विभाग यांनी दिली.

जळगाव जिल्ह्यामध्ये महसुली उत्पनापेक्षा मोठ्या प्रमाणावर चोरी होते. जळगाव जिल्ह्यातील यावल, रावेर, चोपडा हा सातपुडा पर्वताचा भाग आहे. परंतु त्या भागातून महसुली उत्पन्न मिळत नाही. त्या भागात वन संपत्तीची चोरी सोडली जाते म्हणून उत्पन्न कमी झाले की अन्य कोणत्या कारणांमुळे कमी झाले, हे माहीत नाही. जर त्या भागात ५० कोटी रुपयांची चोरी होत असेल आणि शासनाला १० कोटी रुपये महसुली उत्पन्न मिळत असेल तर याकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे समितीला वाटते. नाहीतर राज्य सरकारला एवढ्या मोठ्या प्रमाणावरील महसुलाला मुकावे लागेल. कारण दिवसेंदिवस राज्य सरकारचे महसुली उत्पन्न कमीकमी होत चालले आहे. वन हक्क कायद्यानुसार एखाद्याची जमीन गेल्यानंतर त्यातील जी झाडे तोडली जातात ती कोणाच्या मालकीची असतात, ती झाडे शासनाची असतात की जमीन मालकाची असतात? अशी विचारणा समितीने केली असता वन हक्क कायद्यामध्ये दोन प्रकार आहेत. पहिला भाग हा वैयक्तिक हक्क होय. यानुसार आदिवासी किंवा बिगर आदिवासी व्यक्ती मागील तीन पिढ्यांपासून त्या जागेवर राहून शेती करीत असतील तर त्यांना शेती करण्यासाठी वन पट्टे दिले जातात. तसेच दुसरा प्रकार हा कम्युनिटी फॉरेस्ट राईटसचा होय. यामध्ये टिंबर सोडून वनोपजापासून मिळणारे उत्पन्न हे त्या कम्युनिटीला मिळते. त्यामुळे या संदर्भातील अधिकार हे त्या कम्युनिटीला निश्चित राहतील असा खुलासा सचिव, वन विभाग यांनी केला.

पूर्वी वन विभागाच्या माध्यमातून २४१ कोटी रुपयांचे महसुली उत्पन्न मिळत होते. परंतु ते २०१३-१४ या वर्षात १८५ कोटी रुपयांवर आले आहे. ज्या धोरणाबाबत सांगत आहात त्यानुसार अंमलबजावणी करण्यास पूर्णतः सुरूवात झालेली नसताना सुद्धा हा महसूल इतक्या मोठ्या प्रमाणावर कमी होण्याची कारणे काय आहेत? याबाबत माहिती देताना सचिव, वन विभाग यांनी असे विदित केले की, काही क्षेत्रात उदाहरणार्थ गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात एकूण क्षेत्रफळाच्या ७५ टक्के वन आहे. त्या ठिकाणी नक्षलवादी कारवायांमुळे महसुली उत्पन्न बऱ्याच वेळा मिळत नाही. त्यामुळे महसुली उत्पन्न कमी जास्त होते. महसुली उत्पन्न कमी होण्याची कारणे म्हणजे त्या वर्षामध्ये वन संपत्तीचे लिलाव होऊ शकले नाहीत.

महसुली उत्पनाची चोरी थांबविली तर राज्याच्या महसुली उत्पन्नात वाढ होऊ शकेल. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या जिह्यात वनसंपत्ती जास्त आहे. या जिल्ह्यांबरोबरच संपूर्ण राज्यात महसुली उत्पनाची होत असलेली चोरी याकडे या बाबतीत लक्ष देण्याची गरज आहे. जेणेकरून महसुली उत्पनातून लोकोपयोगी योजनांवर खर्च होऊ शकेल. समितीचा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, वन संपत्तीच्या वाढत्या चोरीवर आळा घातला तर राज्याचे महसुली उत्पन्न वाढेल असे मत समितीने व्यक्त केले असता सचिव, वन विभाग यांनी यासाठी विभागाने बऱ्याच उपाययोजना करण्यास सुरूवात केली आहे. आम्ही फॉरेस्ट प्रोटेक्शन्सवर अधिक भर देत आहोत. पूर्वी राज्यातील आरएफओ यांना वाहन उपलब्ध नव्हते. परंतु आता त्यांना वनाच्या प्रोटेक्शन्ससाठी वाहने उपलब्ध करून दिलेली असल्याचा खुलासा केला.

वनसंपत्तीवर सुद्धा सॅटेलाईटच्या माध्यमातून लक्ष ठेवावयास पाहिजे. जेणेकरून कोणत्या ठिकाणी चोरी होते हे समजू शकेल आणि संबंधितांवर जबाबदारी निश्चित करता येईल. जेणेकरून वन क्षेत्रामध्ये काय प्रकार सुरू आहे हे समजून येईल. किंबहुना ज्या प्रकारांमुळे राज्याचे महसुली उत्पन्न कमी होत आहे त्याला कुठे तरी बंधन आणता येईल असे समितीने विभागास अवगत केले असता सन २०१३-१४ मध्ये महसुली उत्पन्न १८५ कोटी रुपयांपर्यंत खाली आले होते. परंतु तद्नंतर २०१४-१५ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन ते २११ कोटी रुपयांपर्यंत गेले आहे. पेसा, कम्युनिटी फॉरेस्ट राईटस्, एफआरए, तेंदू पत्त्यापोटी मजुरांना बोनस, इत्यादी कारणांमुळे जरी वन महसूल कमी झाला असला तरी त्याच क्षेत्रातून आम्ही १८५ कोटी रुपयांवरून २११ कोटी रुपयांपर्यंत महसुली उत्पन्न वाढविले आहे. तरी सुद्धा समितीची सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. वन संपत्तीच्या होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी विभागाच्या माध्यमातून निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन सचिव, वन विभाग यांनी समितीस केले.

**३.७ परिच्छेद क्र. २.२.३.६, इतर अनुदाने कमी न करणे :**

सहा जिल्हा परिषदेमध्ये जमीन महसुल वाढीव उपकरासाठी रु. २५.६२ कोटी रुपये वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे अशी विभागाने लेखी माहिती दिली आहे. त्याच बरोबर जमीन महसुल उपकरासाठी ८१ कोटी २५ लाख,७५ हजार ९९९ रुपये अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही सुरू आहे त्यामुळे एकंदर पूर्ण राज्याचे अनुदान किती आहे? अशी पृच्छा समितीने केली असता एकंदर नेमका बॅकलॉग किती आहे यासाठी सन २०१२ मध्ये मोहिम सुरू केली होती त्यावेळी १२५३.७७ कोटी रुपये थकीत होते. आता यासंदर्भात प्रयत्न करून विभागाने ११०६ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहे. अजून ८१ कोटी रुपये जिल्हा परिषदेस व जिल्हा परिषदेला ६६ कोटी रुपयांच गौण खनिजाचा पैसा आहे तो वितरण करणे बाकी आहे. हा निधी नॉनप्लॅनमध्ये टाकण्यासाठी प्रयत्न करीत असून ही माहिती सन २०१४-२०१५ पर्यंतची आहे असा खुलासा सचिव, ग्रामविकास विभाग यांनी केला.

या वर्षापर्यंत विभागाकडून १४७ कोटी रुपये वितरित करणार आहात काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडून निधीची मागणी करीत असतो.

जिल्हा परिषदेला इन्कम मॅनेजमेंट आहे. जिल्हा परिषद पातळीवर इन्कम युनीट नाही. याच सेक्शनला एक युनीट असून त्याचे मॅनेजमेंट करणे आणि बाकी ठिकाणी जिल्हा परिषदेला २४ तास करणे आवश्यक आहे. असे झाले तर कामामध्ये आपोआप सुधारणा होईल निधीच्या व्यवस्थापनामध्ये लक्ष दिले तर कामामध्ये सुधारणा होईल असा खुलासा ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी केला.

**३.८ परिच्छेद क्र. २.२.३.७, अभिकरण शुल्काची कमी प्राप्ती :**

जिल्हा परिषदेच्या १२३ खाली एजन्सी चार्जेस म्हणून काही कामासाठी म्हणजे आयसीएस, बायोगॅस इत्यादी योजनेसाठी निधी प्राप्त होत असतो. त्यांचे ५ टक्के इटीपी चार्जेस असतात व ते सुद्धा कमी प्राप्त झालेले आहेत असे महालेखापालांचे म्हणणे आहे. यासंदर्भात ग्रामविकास विभागातर्फे सर्व विभागाशी पाठपुरावा करतो. सामाजिक न्याय विभाग, महिला बाल कल्याण, कृषी या विभागांचा सतत पाठपुरावा करीत असतो असे ग्रामविकास विभागाने समितीस अवगत केले.

सन १९९२ ते सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रायगड जिल्हा परिषदेस रु. ४६,६७,१५० इतकी अभिकरण शुल्काची रक्कम कमी प्राप्त झाली आहे, त्याच प्रमाणे नाशिकचे २.५८ कोटी रुपये बाकी आहे, रत्नागिरीचे १.४२ कोटी रुपये बाकी आहे. हिंगोली जिल्ह्याचे ३० लाख व पुणे जिल्ह्याचे ४२ लाख रुपये व ठाणे जिल्ह्याचे २,४७,५७,०७७ इतके बाकी आहे. त्यामुळे या जिल्ह्यांना इटीपी चार्जेसचे पैसे कधी उपलब्ध करून दिले जाणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता आता नवीन योजनेमध्ये केले जात नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

जुन्या योजनेचे जी रक्कम बाकी होती ती रक्कम त्या त्या विभागांना दिली पाहिजे. त्यामुळे यासंदर्भात ग्रामविकास विभागाने कोणत्या विभागांकडे पाठपुरावा केला आहे याची संपूर्ण माहिती समितीला देण्यात यावी. तसेच सर्व विभागाकडून अभिकरण शुल्काचे एकंदर किती रुपये येणे बाकी आहे? अशी विचारणा समितीने केली असता अभिकरण शुल्कासाठी कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा, महिला व बालकल्याण, सामाजिक न्याय, पशुसंवर्धन विभाग, जलसंधारण विभागाला अशा सर्व विभागांकडे पाठपुरावा केलेला असून अभिकरण शुल्काचे एकंदर ३२ कोटी रुपये बाकी असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

### ३.९ परिच्छेद क्र. २.२.३.८, विद्युत शुल्क अनुदानाची प्राप्ती न होणे :

पाणीपुरवठ्याच्या संदर्भात नेमकी कोणती योजना आहे याची थोडक्यात माहिती द्यावी. पाणीपुरवठ्याच्या योजनेमध्ये पाणीपुरवठा विभागाने वीज बिलाचे ५० टक्के पैसे दिले पाहिजे अशा प्रकारचा परिच्छेद आहे. हे पैसे ते देत असतात हे समितीला आतापर्यंत माहीतच नव्हते हजारो कोटी रुपयांच्या पाणीपुरवठ्याच्या योजना बंद पडलेल्या असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता चौदाव्या वित्त आयोगाकडून थोडी प्रतीपुर्ती करता येईल म्हणून त्यांना थोडी संधी दिली असल्याचा खुलासा ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी केला.

चौदाव्या वित्त आयोगाकडून ग्रामपंचायतींना लाखो रुपये मिळत आहेत. आता विभागाने कट शॉट केला आहे. तुम्ही जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांना बाजूला ठेवल्यामुळे ते लोक आता निवडणूक सुद्धा लढणार नाहीत अशी परिस्थिती झालेली आहे. चौदाव्या वित्त आयोगातून पाणीपुरवठ्याची देयके प्रथम भरावीत असा निर्णय झालेला असल्याचे समितीने नमूद केले असता ग्रामविकास विभागाने तसेच केलेले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

प्रथम पाणीपुरवठयाची बिले भरा व नंतर दुसरे नियोजन करावे अशी समितीची सूचना राहणार आहे. आता चौदाव्या वित्त आयोगाचा मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायतीला निधी मिळू लागलेला असल्यामुळे ते रस्ते आणि इतर कामावर खर्च करीत आहे. यासंदर्भात कमिटी असून विभागाचा खूप चेक आहे. तसेच यासंदर्भात एक चांगला शासन निर्णय निघालेला असल्याचे समितीने नमूद केले. तसेच चौदाव्या आयोगाचे पैसे थेट ग्रामपंचायतींना देत आहात त्यामुळे त्या निधीतून विभागाच्या बिलाच्या डायरेक्ट रक्कमा कापून घेऊ शकता काय? अशी विचारणा समितीने केली असता नाही यामध्ये तांत्रिक आणि लिगल इश्यु आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाच्या पाहण्यात आले असेल की, काही ग्रामपंचायती बिले भरत नाहीत. विभागाने अनुमती दिली आहे परंतु त्यांना विभागाने पाणीपुरवठ्याच्या योजनेचे बिल भरलेच पाहिजे अशी सक्ती केली पाहिजे. यासंदर्भात जीआर काढला तर हे पैसे खर्च होऊ शकतात. ग्रामपंचायतीला माती, मुरुम आणि रस्ते करण्यामध्ये जास्त रस आहे. परंतु हे लोक पाणीपुरवठयाच्या योजनेकडे लक्ष देत नाही या योजना १-१,२-२ कोटीच्या आहेत.

पाणीपुरवठा बंद झाला की, हे लोक लोकप्रतिनिधींकडे येतात आणि ही योजना सुरू करावी असे लोकप्रतिनिधी विभागाला सांगत असतो. असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात नोंद घेतलेली असल्याचा खुलासा केला.

सदरहू परिच्छेदात अनुदानाच्या संदर्भात जो विषय होता त्यासंदर्भात विभागाचे काय म्हणणे आहे? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात ५० टक्क्याच्या संदर्भात सन २००९ चा शासन निर्णय असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

पाणीपुरवठा विभागाने विजेच्या बिलाची ५० टक्के रक्कम देणे आवश्यक असताना त्यांनी ती दिलेली नसल्यामुळे पाणीपुरवठ्याच्या योजना बंद पडलेल्या असल्याचे समितीने विभागास अवगत केले.

समितीने सदरहू परिच्छेदाबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक २ मार्च २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता विद्युत शुल्क अनुदानाची प्राप्ती न होणे यासंदर्भात प्रधान सचिवांनी थोडक्यात पार्श्वभूमी विशद करावी असे समितीने सांगितले असता पाणीपुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती आणि त्या माध्यमातून विद्युत शुल्क देणे याच्या गाईडलाईन्स पाणीपुरवठा विभागाने निर्गमित केलेल्या आहेत. ही योजना किंवा अनुदान नसून पाणीपुरवठ्यासाठी राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमामध्ये त्या त्या वर्षात जो काही निधी प्राप्त होईल त्याच्या १५ टक्के रक्कम जिल्हा परिषदांनी त्यांच्या देखभाल व दुरुस्ती निधी त्यांच्या स्तरावर तयार करून त्यांनी जमा करावा. त्यातून त्या जिल्ह्यामध्ये सुरू असणाऱ्या योजनांकरिता देखभाल व दुरुस्तीसाठी त्यांनी त्यांच्या स्तरावर योजना करून रक्कम द्यावी. त्यातील ५० टक्के रक्कम शक्यतो त्यानी योजनेच्या विद्युत देयकासाठीच वापरावी, अशी एक सूचना पाणीपुरवठा विभागाने दिलेली होती. गेल्या वर्षी आणि त्याच्या मागील वर्षी केंद्र सरकारकडून आम्ही जेवढा निधी अपेक्षित केला होता त्यापेक्षा फार कमी प्रमाणात निधी आला. जो उपलब्ध निधी होता तो ऑनगोईंग स्कीम पूर्ण करण्यासाठी किंवा अन्य योजनांसाठी सुद्धा कमी पडत होता. त्यामुळे काही ठिकाणी ही १५ टक्के रक्कम सुद्धा ठेवण्यात आली नाही. या ठिकाणी नमूद केल्याप्रमाणे हिंगोली, परभणी, नाशिक जिल्ह्यांनी परिपूर्ती केलेली आहे. काही ठिकाणी असे झाले की, त्या त्या ग्रामपंचायतींनी मागणीही केलेली नाही. शेवटी ही जबाबदारी त्या ग्रामपंचायतीची किंवा त्या संस्थेची आहे, त्यांनी पाणीपट्टी वसूल करून योजना चालविली पाहिजे. अनेक ठिकाणच्या ग्रामपंचायती स्वयंपूर्ण असतील तर त्या निधीची मागणी सुद्धा करीत नाहीत. अशा प्रकारे विद्युत शुल्क हे स्पेसिफिक असे अनुदान नसून देखभाल व दुरुस्तीसाठी तयार केलेली एक व्यवस्था असल्याचे विभागीय सचिवांनी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी विदित केले. तसेच हा निधी देणे शासनाला बंधनकारक नाही. जो काही उपलब्ध निधी असेल त्यातील १५ टक्के निधीमधून हा खर्च करता येईल असे मतही विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

पाणीपट्टी वसूल करून त्यामधून योजना चालविणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. ग्रामपंचायती पाणीपट्टी वसूल करीत नाहीत सिस्टीम कागदोपत्री राहून चालणार नाही ती पाळली गेली पाहिजे. ज्या ग्रामपंचायती अशा प्रकारचे काम करीत नाहीत त्याबद्दल आपले काय धोरण आहे हे

ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिवांनी सांगावे असे समितीने सांगितले असता ग्रामपंचायतीच्या पाणीपट्टी वसूलीबद्दल अनेकदा आढावा घेतो पाठपुरावा करतो. ज्या ग्रामपंचायती चांगल्याप्रकारे वसूली करतात त्यांना पारितोषिक देण्याची योजना सुद्धा ग्रामविकास विभागाने सुरू केलेली असून आम्ही सतत आढावा घेत असतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभाग १४ व्या वित्त आयोगाचा निधी देतो, वेगवेगळ्या प्रकारचे अनुदान पाठवितो, अमुक इतके टक्के वसूली केली तरच तुम्हाला इतके अनुदान देऊ अशी योजना करावी. जी ग्रामपंचायत प्रामाणिकपणे वसूली करते तीच करते, जो माणूस टॅक्स भरतो तोच भरतो. जो भरणा करीत नाही त्याचे काहीच होत नाही. एखाद्या गावाची पाणीपुरवठा योजना मंजूर करायची असेल तर अमुक इतके टक्के तरी पाणीपट्टी वसूल झाली पाहिजे याची लोकांना सवय पडली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता १४ व्या वित्त आयोगाचा पाच वर्षांचा असेस त्यांनी आणला आहे. पहिल्या वर्षी ग्रामविकास विभाग ग्रँट देते. दुसऱ्या वर्षापासून परफॉर्मन्स ग्रँट असा एक भाग आहे. परफॉर्मन्स ग्रँटकरिता दोन अटी घालण्यात आल्या आहेत. ऑडिट वर्षानुवर्षे होत आहे हा एक मुद्दा असून मागील वर्षी जेवढी वसूली झाली त्यात १० टक्के वाढ असावी हा दुसरा मुद्दा आहे अशी एक लिंक करून दिली असल्याचे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सांगितले. तसेच ग्रामसेवकांबरोबर सतत आढावा घेतो व गटविकास अधिकाऱ्यांना त्याचे पॉईंट्स देतो तसेच मूल्यमापन करतो वसूलीबाबत सतत आढावा होत असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीला असे एक तरी उदाहरण द्यावे की, १० ग्रामपंचायतींनी काटेकोर अंमलबजावणी केली नाही म्हणून त्यांच्यावर कारवाई केली. सिस्टीम पाळली गेली पाहिजे नगरपालिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर हेच चालू आहे. जो टॅक्स भरतो तो भरतो जो भरत नाही त्याचे काहीच होत नाही. याबाबत कडक धोरण आखण्यात येणार आहे काय? जे संबंधित कर्मचारी आहेत त्यांचे वर्क ऑडिट करावे असे समितीने सूचित केले. तसेच राष्ट्रीय पेयजल योजना लोकाभिमुख व्हावी म्हणून वर्गणी वगैरे लिंकअप करण्याचा केंद्र शासनाचा निर्णय आहे. हे सगळे ऐकायला खूप बरे वाटते. जर ग्राऊंड रिॲलिटी बघितली तर ७० ते ८० टक्के योजनांबाबत आपण फेल्युअर आहात हेच लक्षात येईल. योजना करताना विभागाचे मॉनिटरिंग फार कमी पडते. काही लाखो रुपयांच्या, कोटी रुपयांच्या योजना आहेत. परंतु कुठे विहीर घ्यायची, खरेच पाणी आहे की नाही? सरपंच बऱ्याच ठिकाणी डायरेक्ट आपल्या शेतात विहीर घेतो, त्याच्याप्रमाणे डिझायनिंग करतो. विहीर करणे, त्यानंतर त्याची क्वालिटी ऑफ वर्कमॅनशीप इतकी प्युअर आहे, किती किलोचा पर स्वेअर सेंटीमीटरचा पाईप वापरला, त्याचे काम कसे केले याकडे कोणाचेही लक्ष नसते. किती खोली असली पाहिजे, ३ फूट वरच असते, त्यामुळे योजनेची लाईफ कमी होत आहे आणि मेन्टेनन्स लगेच येतो. विभागाने सांगितले की, १५ टक्के निधी रिझर्व्ह करू शकता परंतु वसूली नाही त्यामुळे काहीच होत नाही. सगळीकडे मोठ्या प्रमाणात ही परिस्थिती दिसते मराठवाड्यात तर प्रचंड फेल्युअर आहे. याबाबत काहीतरी सिस्टीम करणे अपेक्षित आहेच. विभागाने खरोखर लक्ष घालून कशा प्रकारे करायचे हे पहावे. छोट्या छोट्या गोष्टीसाठी पाणीपुरवठा योजना सुरू रहात नाहीत लोकांना पाणी मिळत नाही सध्या पाणी टंचाई आहे. टंचाईमध्ये पाणीपुरवठा योजनेची दुरुस्ती या नावाखाली काही योजना सुचवितो, पण त्या योजनांना सुद्धा पैसे मिळत नाहीत, चांगल्या पद्धतीने काम होत नाही. वसूलीचा विषय आहे, त्यासोबत क्वालिटी मॉनिटरिंग आणि काम व्यवस्थित कसे होईल हे बघणे आवश्यक आहे. विभागाकडे कर्मचारी नाहीत. आज तीव्र पाणी टंचाई असताना जालना जिल्ह्यात जीएसडीएकडे आठ तालुक्यांसाठी एकच वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यरत आहे. How can he sign on प्रपत्र ब, त्याशिवाय कोणत्याही पाणी टंचाई योजनेचे काम मंजूर करता येत नाही त्यांच्याकडे कर्मचारी नाही जीएसडीएचे लोक नसल्याने मॉनिटरिंग होत नाही करोडो रुपये खर्च केले जातात त्याबाबत मॉनिटरिंग नसेल तर क्वालिटी आणि रिझल्ट मिळणार नाहीत. म्हणून सगळ्यांची व्यथा आहे की, परफॉर्मन्स ऑडिट होणार की नाही? अशी विचारणा समितीने केली असता १५ टक्के रक्कम विभागाकडून देत होतो यावर्षी विभागाने प्रत्येक जिल्हापरिषदेला मार्गदर्शक सूचना दिली आहे असा खुलासा सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी केला.

यावर्षी तर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेचा पैसा आलेला नाही? याकरिता विभागाची जी मॅन्डेटरी भूमिका आहे त्याबाबत २०१५-१६ मध्ये पैसे कसे उपलब्ध होणार आहेत? अशी विचारणा समितीने केली असता यापुढे १५ टक्के निधी जो ग्रामपंचायतीला द्यायचा आहे तो वसूलीशी निगडित करा अशा सूचना दिलेल्या असून ज्यांची वसूली ८० ते ९० टक्क्यापेक्षा जास्त असेल त्यांनाच ही १५ टक्के रक्कम द्यावी. एक तर हा निधी फार कमी असल्यामुळे देताना त्याच ग्रामपंचायतींना द्या, ज्यांची वसूली चांगली असेल. जेणेकरून वसूलीसाठी एक प्रोत्साहनात्मक चालना मिळेल. ग्रामपंचायतीमध्ये योजना बंद पडण्यामध्ये, क्वालीटी किंवा अंमलबजावणीबाबत अनेक कारणे आहेत. या योजनेच्या एक्झीक्युशनचे काम आपण डिसेंट्रलाईज करून खालच्या स्तरावरील समितीपर्यंत दिलेले आहे त्या प्रमाणात तेथे अजून कॅपॅसिटी नाही. ज्याप्रकारचे ट्रेण्ड किंवा एक्स्पर्ट लोक पाहिजे होते ते ग्रामपंचायत पातळीवर नाही. पूर्वी ५ कोटी रुपयांपर्यंतच्या योजनेची अंमलबजावणी करण्याचे अधिकार त्यांना होते ते आता खाली आणलेले आहे. नवीन राज्याची योजना आम्ही सुचवित आहोत त्यामध्ये अंमलबजावणीसाठी जिल्हापरिषद आणि एमजेपी हे दोनच स्तर ठेवले आहेत. सध्या तरी ग्रामपंचायत पातळीवर अंमलबजावणीचे काम देण्यासाठी तेथे कॅपॅसिटी नसल्यामुळे आम्ही त्यांना डिस्करेज करीत आहोत, हे एक कारण होते.

विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये पाणीपुरवठयाचे जे सोर्सेस आहेत, त्या ग्राऊंड वॉटर सोर्सेसवरच पूर्वी ७० ते ८० टक्के योजना राबविल्या गेल्या आहेत. एक तर आता भूगर्भात पाण्याची पातळी खूप खाली गेली आहे. आता जास्तीत जास्त डिमांड हे सरफेस वॉटरवरून येत आहे. एखादा डॅम असेल, सरफेस वॉटर असेल ते निश्चितपणे दूर असल्यामुळे योजना कॉस्टली होत आहे. त्यातून पुढील काळात देखभाल आणि दुरुस्तीसाठी निश्चितपणे खर्च वाढणार आहे.

पाणीपुरवठयाबाबत आपले राज्य असे आहे की, येथे औद्योगिक पाणीपुरवठा, शहरी पाणीपुरवठा आणि ग्रामीण पाणीपुरवठा या तीन भागासाठी तीन एजन्सीज आहेत. तीन प्रकारचे काम वेगवेगळ्या तीन एजन्सीज करीत आहेत. याचा अर्थ ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी ग्राहक मिळणे आवश्यक आहे. जी पाईप लाईन जात असेल त्याच्या शेजारी औद्योगिक ग्राहक असेल, काही शहरी ग्राहक असतील त्यांनाही जोडता आले असते तर त्या माध्यमातून वसूली करून कोणतीही योजना देखभाल व दुरुस्ती करून आम्ही चांगली चालविली असती. परंतु १०० टक्के ग्राहक आहेत त्यांना पाणीपट्टी भरण्यामध्ये अडचणी आहेत. औद्योगिक पाणीपुरवठा योजनेचा विचार केला तर एमआयडीसी सारखी संस्था प्लसमध्ये आहे. ते महामंडळ औद्योगिक पाणीपुरवठा करीत असले तरी ५० ते ५५ टक्के ते डोमेस्टिक सप्लाय करतात. औद्योगिक पाणीपुरवठ्यापेक्षा एकूण जो पाणीपुरवठा ते करतात त्यामध्ये त्यांनी काही गावे किंवा प्रादेशिक योजना चालविली तरी निश्चित दोघांच्या कॉम्बिनेशनमधून ही योजना सेल्फ सस्टेन होऊ शकते. आम्ही बैठकीमध्ये त्यांना तसे सुचवित असतो. काही ठिकाणी विभाग सबसिडाईज्ड करू शकतो आणि काही ठिकाणी वसूली करून आहे त्या खर्चामध्ये योजना चालवू शकतो असा खुलासा सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी केला.

त्यांनी स्टाफची अडचण सांगितली असून जीएसडीएममध्ये लोक कमी आहेत? विभागाकडून भरती का करण्यात येत नाही? अशी विचारणा समितीने केली असता भरती करण्यास बंदी असल्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांनी विदित केले.

पाणीपुरवठ्यासारखा महत्त्वाचा विषय असून त्याकरिता भरती करण्यास बंदी का केली जाते. तसेच भरती करण्यास बंदी आहे, पण खर्च तर होत आहे. राष्ट्रीय पेयजल योजनेचा खर्च चालू आहे. त्यावर मॉनिटरिंग नसेल तर it will be totally failure, waste of money. पाणीपुरवठा योजनेबाबत पदे भरण्यास बंदी असू नये असे मत समितीने व्यक्त केले असता सध्या विभागाने बॅलेन्स करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुन्हा आढावा घेऊन टंचाईचे जे जिल्हे आहेत तेथे लगेच लोक मिळतील हे पाहू असा खुलासा सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी केला.

यापूर्वी समितीच्या बैठकीत अशी माहिती देण्यात आली होती की, महाराष्ट्रात वेगवेगळ्या माध्यमातून ४० हजार योजना झालेल्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पाहिले तर संपूर्ण तालुक्यामध्ये हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्या सुद्धा योजना सुरू नाहीत. मूळात एस्टीमेट जे असते तेच फॉल्टी असते. डिझाईन करीत असताना जेथे पाणी लागत नाही तेथे विहिरी खोदायच्या, तीन-चार लाख रुपये खर्च करायचे, नंतर विचारणा झाली तर पाणीपुरवठा विभाग म्हणतो की आम्हाला जीएसडीएने दाखला दिला आम्ही त्यांच्याकडे विचारणा करायची अशा प्रकारे असंख्य योजना बंद आहेत मूळात एस्टीमेट फॉल्टी आहेत. एस्टीमेट तयार करीत असताना गाव केवढे आहे, वाडी केवढी आहे, त्यांना किती खर्च पेलू शकतो याचा ताळमेळ घातला जात नाही. पर कॅपिटा कॉस्ट जादा गेली की मंत्र्यांकडे येतात, वाढवून घेतात आणि नंतर ते काम सुरू झाले की निव्वळ पाणीपट्टीची जी रक्कम असते त्यातून आपण योजनेचे पैसे भरू शकत नाही ही वस्तुस्थिती सगळ्यांना मान्य होईल. जे विद्युत देयक असते ती प्रत्येक घरामधून होणाऱ्या पाणीपट्टी वसूलीतून भरता येत नाही हा एक फॅक्टर आहे. योजना डिझाईन करीत असताना पाणीपट्टी किती वसूल होईल, गावाची लोकसंख्या किती आहे, मेन्टेनन्स कसा परवडेल यासाठी काही यंत्रणा विकसित करणार आहात का? जेणेकरून ती योजना पुढे कायमस्वरुपी सुरू रहावी अशी विचारणा समितीने केली असता पाणीपट्टी वसूली व लोकसंख्या याला एक सूत्र असे आहे की, ज्यावेळी आम्ही स्कीम तयार करतो, आपल्या सगळ्यांचा अनुभव आहे की स्कीम पाहिजे आणि ती बसली पाहिजे म्हणून २०३५, २०४० ची लोकसंख्या गृहित धरु?न स्कीम तयार करतो. किमान २० वर्षे लाईफ विचारात घेऊन त्यावेळचे पॉप्युलेशन विचारात घेऊन आज आपण स्कीम तयार करतो. पाणीपट्टी भरणारे लोक आज तेवढेच आहेत. २० वर्षानंतरची पॉप्युलेशन ग्रोथ गृहित धरून आपण देखभाल व दुरुस्तीचा खर्च काढत असतो. त्यामध्ये आता आम्ही सुधारणा करीत असून एवढ्या दूर काळातील लोकसंख्या विचारात घेण्याची आवश्यकता नाही असा खुलासा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांनी केला.

ज्या योजना फिजिबलच नाहीत त्या तुम्ही मंजूर का करता? अशा योजना मंजूर केल्या तर त्या उद्या चालत नाहीत लोकांना पाणी मिळत नाही. एखाद्या लोकप्रतिनिधीला, जिल्हा परिषद सदस्याला किंवा सरपंचाला खूष करण्यासाठी विभागाने योजना मंजूर करू नये एवढेच समितीचे म्हणणे आहे. ज्या योजना पुढे चालू शकत नाहीत त्याचा रिपोर्ट पुढे पाठवून द्या असे मत समितीने व्यक्त केले.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने ऊर्जा विभागाला विनंती केली आहे, योजनेचा रेट कमी करून मिळावा. रेट जादा असल्यामुळे काही ग्रामपंचायती बिल भरू शकत नाही त्या बाबतीत काही निर्णय झाला आहे का? अशी पृच्छा समितीने केली असता पाणीपुरवठा विभागाचा प्रस्ताव ऑलरेडी दिलेला आहे. पण रेटबद्दल कोणताही निर्णय झाला नाही. मात्र त्यांनी एक संजीवनी म्हणून स्कीम काढलेली असल्याची माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांनी दिली.

सदर परिच्छेदात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने प्रतिपुर्ती केली नाही? ए.जी. ने ऑबजेक्शन काढले की, २५ ग्रामपंचायतींना दिले, चार ग्रामपंचायतींना दिले नाही. ज्या प्रकारे आपण सांगितलेले आहे की हे मेंडेट्री नाही. जिल्हा परिषदेला निर्णय घ्यायचा आहे. आम्ही जो निधी देतो तो १५ टक्के त्यांच्याकडे अव्हेलेबल असेल तर ते खर्च करू शकतात. त्यांनी कोणत्या गोष्टीवर खर्च करायचा उदाहरणार्थ विजेच्या बिलावर किंवा दुरुस्तीवर खर्च करायचा हे विभाग सांगत नाही असे समितीचे म्हणणे आहे. महालेखाकारांनी कशा प्रकारे परिच्छेद काढला आहे ते त्यांनी सांगावे. त्यांचा मुद्दा असा आहे की, It is not mandatory to make the payment असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागाने योजना काढली होती त्याप्रमाणे महालेखाकारांनी परिच्छेद घेतला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१५ टक्यांमधून कधी कधी त्या जिल्हा परिषदेला आऊट गोईंग स्कीमला देखील पैसे पुरत नाहीत. देखभाल दुरुस्तीला पैसे देत नाहीत, वीजेच्या बिलाला पैसे देत नाहीत. ज्या योजना रेग्युलर आहेत त्यांना देखील पैसे देत नाहीत, कारण त्यांचा प्रस्ताव आला नाही असे म्हणतात. त्यामुळे ह्या जी.आर.मध्ये काही तरी मेंडेट्री दुरुस्ती केली पाहिजे. विभागाकडे ५ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे त्यांनी सांगितले. वस्तुतः विभागाने त्यांचे पैसे देणे नाही असे सांगता. त्यांचा निर्णय जिल्हा परिषदेने केला आहे. ह्यामध्ये तुम्ही मेंडेट्री असे केले पाहिजे की, जे काही पैसे येतील त्यामधून १५ टक्के बाजूला ठेवले पाहिजेत अशा प्रकारचा नियम केला पाहिजे. इतर कामांसाठी आवश्यकता लागेल, दुरुस्ती असेल वीजेचे बील असेल, वीजेचे बिल कोणाचे भरायचे त्याचे काही नॉर्म्स ठरवून द्या. जी १०० टक्के वसूली असेल, रिझनल वॉटर सप्लाय स्कीम असेल त्याला प्राधान्य द्यावे असे काही तरी करावे. तसेच शासन निर्णयाच्या आधारावर पालन झालेले नाही असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. ही वस्तुस्थिती समोर आलेली आहे असे समितीने विभागास अवगत केले असता हा शासन निर्णय सन २००९ चा असून त्याच्यावर महालेखाकारांनी परिच्छेद काढलेला आहे. सन २०१४ मध्ये पुन्हा सूचना काढली त्याच्यामध्ये आम्ही स्पष्ट म्हटलेले आहे की, ही एक मार्गदर्शक सूचना आहे, बंधनकारक नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच वित्त विभागाने पैसे उपलब्ध करून दिले तर या सर्वाची निश्चितपणे प्रतिपुर्ती करू असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

याबाबत मागणी केली आहे का? तसेच विभाग मागणी करीत नाही. १५ टक्यांच्यावर जिल्हा परिषदेला वाऱ्यावर सोडून दिले असल्याचे समितीने नमूद केले असता मागणी दरवर्षी असते. मागणी म्हणजे एन.आर.डी.डब्ल्यू.पी.चे आम्हाला जेवढे पैसे पाहिजेत तेवढे आपण दिलेले आहेत. जे पैसे कमी पडत आहेत ते मिळाले की देऊ असे विभागीय सचिवांनी विदित केले.

समितीची सूचना आहे की, १५ टक्के रिझर्व करा यावर विभागीय सचिवांनी ठीक आहे असे समितीस सांगितले. सिलेक्शनमध्ये कोणत्या योजनेला किती पैसे द्यायचे आहेत, दुरुस्तीसाठी, किती पैसे द्यायचे याबाबत विभागाकडून गाईड लाईन्स काढू असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

या सन २००९ च्या जी.आर.चे पालन करायचे असेल तर विभागाला हे सर्व करावे लागेल. सन २०१४ पर्यंत लोकांची जी काही थकबाकी असेल ती वित्त विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले. या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे विदित केले की, आपके रिप्लाय मै लिखा है की, The G.Ps did not fulfill the criteria. When we have gone through the criterias, there are three simple criterias i.e. Whether the water supply scheme was supplying water regularly during the year? Photocopies of the payment of the bills to the power supplying companies? The third is, the certificate from the Executive Engineeer stating that the water was supplied regularly. These are the only three criteria that has to be followed by the concerned authority. You have said in your reply that we have not done it because the criterias were not fulfilled.

महालेखाकारांच्या उपरोक्त मतानुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, The Grampanchyats who had asked for money from Zillha Parishad may not fulfilled these criterias. The Hon'ble Members are also saying that the system needs to be strengthen.

सर्क्युलर दुरुस्त करून नवीन प्रमाणे ठरवून देतात त्या दृष्टीने जे योग्य असेल त्यांना मिळेल. सन २०१४ ची जी थकबाकी आहे त्यांना सुद्धा निधी उपलब्ध करून द्यावा असे समितीने विभागास सांगितले.

In your reply, you have also stated that we have recovered some amount and we have reimbursesd some amount. However, you have not said anything about the system followed by the department or the system you are going to strengthen. We had done only test checkup to indicate that these are the difficulties in the scheme. We also expect that the department

should check this scheme in other Zillha Parishads of the State असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले. यावर The system is the core cause for failure of the scheme. असे मत समितीने व्यक्त केले.

**३.१० परिच्छेद क्र. २.२.३.९, अ-प्राधिकृत नगरपालिकेकडून प्राथमिक शिक्षण अंशदानाची प्राप्ती न होणे :**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, जुन्या पद्धती प्रमाणे काही ठिकाणी नगरपालिकेच्या क्षेत्रात जिल्हा परिषदेच्या शाळा असतील तर त्यांच्या मालमत्ता कराला ५ टक्के जिल्हा परिषदांना देण्यात यावे. परंतु यामध्ये काही महानगरपालिका बसतात. परंतु आता सन २०१३ च्या अमेंडमेंडमुळे ही बाब आता कालबाह्य झालेली आहे. त्यामुळे सन २०१३ नंतर ही देणी क्रमप्राप्त राहिलेली नाही.

सन २०१३ च्या अगोदर ५ टक्के देणे आवश्यक होते आता ही पद्धत विभागाने बंद केली आहे काय? तसेच या विषयाच्यासंदर्भात नंतर कोणता निर्णय घेतलेला आहे? अशी विचारणा समितीने केली असता हा ॲक्टच आता चेंज झालेला असून बॉम्बे प्रायमरी एज्यूकेशन ॲक्टमध्ये चेंज करण्यात आलेला आहे. त्यामुळे ग्रामीण आणि शहर असे वेगवेगळे केलेले आहे. जुनी रक्कम वसूल करण्यासंदर्भात पाठपुरावा करून ती रक्कम नगरपालिकेकडून वसूल करीत असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१३ च्या शासन निर्णयामध्ये नेमका कोणता उल्लेख आहे? २०१३ च्या शासन निर्णया नुसार सर्व देणी बंद करण्यात आली आहे काय? तसेच नगरपालिकेच्या क्षेत्रात जिल्हा परिषदेची शाळा असू नये काय? त्यामुळे यासंदर्भात विभागाने कोणते धोरण ठरविले आहे? अशी समितीने विचारणा केली असता निधी वसूल करणे आवश्यक आहे तोपर्यंत जिल्हा परिषदेच्या शाळा ग्रामविकास विभागाच्या आहेत. पाठपुरावा करून ही रक्कम वसूल करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

ग्रामविकास विभागाकडे ८ जिल्हा परिषदांचा आढावा आलेला आहे. पूर्ण या राज्यात यासंदर्भातील वसूली झाली आहे की, नाही? या विषयाच्या संदर्भात नगरविकास विभागाकडून कोणकोणती कार्यवाही झालेली आहे वा करणार आहे यासंदर्भातील सखोल माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात यावी. असे समितीने विभागास सांगितले असता यासंदर्भातील संपूर्ण माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

ग्रामविकास विभागाकडून नगरविकास विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सन १९७३-७४ पासून सन २०१४ पर्यंत माहिती आलेली नाही. या विषयाच्या संदर्भात अधिकारीस्तरावर चर्चा करून यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली त्याची माहिती समितीला पुढील बैठकीत उपलब्ध करून देण्यात यावी असे निदेशही समितीने विभागास दिले.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक २ मार्च २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सदरहू परिच्छेदामध्ये विभाग वसूली करू शकला नाही, यांनी पैसे दिले नाहीत अशी परिस्थिती आहे. अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती थोडक्यात सांगावी असे समितीने सांगितले असता मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ खाली १४ जिल्हे आहेत. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, पुणे, नाशिक या जिल्ह्यात तो लागू आहे. तेथे काही अप्राधिकृत नगरपालिका आहेत म्हणजे तेथे त्यांना शाळा नाही तर जिल्हापरिषद चालवायच्या आहेत. त्यांच्या उत्पनातून काही जिल्हापरिषदांना द्यायचे आहे. यात शॉर्टफॉल आहे असे ऑडिटचे म्हणणे आहे. चौथ्या जिल्ह्याची देय रक्कम ६२ कोटी ८३ लक्ष रुपये आहे. त्यापैकी ५ कोटी १० लक्ष रुपये मिळालेले आहेत. अंदाजे ५७ कोटी रुपये बाकी आहेत. नगरपालिकांना दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी याबाबत पुन्हा रिक्वेस्ट केलेली आहे. चिपळूण, खेड, देवळाली, पाचोरा अशा सर्व लहान नगरपालिका आहेत अशी माहिती शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी दिली असता नगरविकास विभागाच्या सचिवांनी समितीस असे अवगत केले की, मुंबई प्राथमिक शिक्षण कायद्यात ऑथॉराईज म्युनिसिपालीटी व नॉनऑथॉरॉईज म्युनिसिपालीटी असा एक मूलभूत फरक केलेला आहे. ऑथॉराईज म्युनिसिपालीटींचे त्यांच्या क्षेत्रातील शाळांवर नियंत्रण आहे. नॉनऑथॉरॉईज म्युनिसिपालीटी म्हणजे ज्या ऑथॉराईज नाहीत अशा सर्व म्युनिसिपालीटी नॉनऑथॉरॉईज असे कायद्यात म्हटलेले आहे. मुंबई प्राथमिक शिक्षण कायद्यातील कलम २ (६) मध्ये ऑथॉराईज म्युनिसिपालीटींची परिभाषा दिलेली आहे. त्यानुसार ज्या नगरपालिकेच्या क्षेत्रात शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनाच प्राधिकृत केलेले आहे, अशी नगरपरिषद म्हणजे ऑथॉराईज नगरपरिषद म्हणजे ज्या स्वतःच त्यांच्या क्षेत्रातील शाळांवर नियंत्रण ठेवतात. ज्या ऑथॉराईज नाहीत त्या इतर सर्व नॉन ऑथॉराईज असे कलम २ (१२) मध्ये नमूद केले असल्याचेही विभागीय सचिवांनी नमूद केले.

याचा अर्थ डायरेक्ट नगरपालिकांनाच ऑथॉरॉईज किंवा नॉनऑथॉराईज ठरविले आहे काय? ज्या नगरपालिकांचे त्यांच्या क्षेत्रातील शाळांवर नियंत्रण आहे, त्या ऑथॉराईज नगरपालिका व ज्यांचे नियंत्रण नाही त्या नॉनऑथॉराईज नगरपालिका आहेत. शाळा ऑथॉराईज वगैरे ठीक आहे परंतु, नगरपालिका ऑथॉराईज व नॉनऑथॉराईज? यासंदर्भात समितीने विचारणा केली असता कायद्यामध्ये परिभाषाबाबतच्या सेक्शन २ नुसार ऑथॉराईज म्युनिसिपालीटी व नॉनऑथॉराईज म्युनिसिपालीटीबाबतची परिभाषा नमूद केलेली असून हा बिट्रिशकालीन कायदा असल्याचे सचिव, नगरविकास विभाग यांनी सांगितले.

एखाद्या नगरपालिकेमध्ये जिल्हा परिषदेची शाळा असेल तर, त्यावर जिल्हा परिषदेचेच नियंत्रण असते. तेथे नगरपालिकेचे नियंत्रण नसते, असे समितीला वाटते. नगरपालिकेची स्वतःच्या मालकीची शाळा असेल तर ठीक आहे. जिल्हा परिषद नियंत्रित शाळा नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असेल अशावेळेस काय करणार? अशी पृच्छा समितीने केली असता या कायद्यातील तरतुदी पाहिल्या तर असे दिसून येते की, काही नगरपरिषदांचे त्यांच्या कोणत्याही शाळेवर नियंत्रण नाही, त्या नॉन ऑथॉराईज आहेत असा खुलासा सचिव, नगरविकास विभाग यांनी केला. जिल्हापरिषदेच्या शाळेवर जिल्हापरिषदेचे नियंत्रण राहते आणि बाकीच्या नगरपालिकेच्या शाळेवर नगरपालिकेचे नियंत्रण राहते असेही समितीस अवगत केले.

अनुदानीत शाळांवर मॅनेजमेंट असते अशी सिस्टम आहे. त्याला आपण ऑथॉराईज का म्हणणार नाही, त्यांना ऑथॉराईज म्हणावे लागेल? जिल्हा परिषदेच्या ज्या ज्या गावांमध्ये, ज्या ज्या नगरपरिषदांच्या हद्दीमध्ये शाळा आहेत त्यांचे अनुदान त्यांनी दिले पाहिजे त्यांचे ५७ कोटी रुपये थकित आहेत, असे ग्रामविकास विभागाचे म्हणणे असल्याचे समितीने मत व्यक्त केले असता महालेखापालांचा परिच्छेद ऑथॉराईज म्युनिसिपालीटीबाबत नाही. तो फक्त नॉन ऑथॉराईज म्युनिसिपालीटीबाबत आहे. याबाबत कायद्याच्या तरतुदीची पार्श्वभूमी अशी आहे की, ज्या नगरपरिषद नॉन ऑथॉराईज्ड आहेत, त्यांच्या शाळेवर जिल्हा परिषद देखरेख ठेवते आणि त्यामुळे त्यांनी जिल्हा परिषदेला त्यांच्या एकूण रेटेबल मुल्याच्या वार्षिक ५ टक्के इतकी वसूली देणे अभिप्रेत आहे. हा परिच्छेद फक्त नॉन ऑथॉराईज्ड म्युनिसिपालीटीकरिता आहे. जिल्हा परिषदेला त्यांनी रेटेबल व्हॅल्युच्या ५ टक्के देणे अपेक्षित आहे. कायद्यात असे म्हटले आहे की, "As will be decided from time to time." शासनाचा १९७६ च्या जी.आर. मध्ये असे नमूद केले आहे की, रेटेबल व्हॅल्युच्या ५ टक्के जिल्हा परिषदेला द्यावे. याच जी.आर. मध्ये पुढे असे नमूद केले आहे की, सदरचा शासन निर्णय हा फक्त पश्चिम महाराष्ट्रातील अप्राधिकृत नगरपरिषदांना लागू आहे. नगरपरिषदांचे हे जे दायित्व आहे ते फक्त पश्चिम महाराष्ट्रातील अप्राधिकृत नगरपरिषदांचे असल्याची माहिती सचिव, नगरविकास विभाग यांनी दिली.

ओरिजनल ॲक्ट नुसार मुंबई वगळता १४ जिल्ह्यांना ॲप्लिकेबल आहे. आता त्यांनी एक सर्क्युलर काढून पश्चिम महाराष्ट्र सांगितले तर मराठवाडा कसा सुटणार? मराठवाडा एक्सक्लुड का केला? ॲक्टलाच प्राधान्य असेल जी.आर. काढला की, ते फक्त पश्चिम महाराष्ट्राला ॲप्लिकेबल असेल ते १४ जिल्ह्यांना लागू राहणार ॲक्ट हा इम्पॉर्टंट आहे. बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट, १९४७ मध्ये ही प्रोव्हीजन आहे काय? असे समितीने विचारले असता हा शिक्षण विभागाचा कायदा असून हा कायदा मुंबई, मराठवाडा व विदर्भ वगळून आहे असा खुलासा सचिव, नगरविकास विभाग यांनी केला.

ॲक्टच्या अनुषंगाने तो १४ जिल्ह्यांना लागू आहे. ॲक्टला कोणतेही सर्क्युलर सुपरसीड करू शकत नाही. हिंगोली, परभणीचे आम्हाला मान्य आहे ते फक्त १४ जिल्ह्यांना लागू आहे. १४ जिल्ह्यांच्या थकबाकीच्या वसूलीबाबत आपले काय म्हणणे आहे? अशी पृच्छा समितीने केली असता कायद्यातील तरतूद व १९७६ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार नगरपरिषदांचे दायित्व नगरपरिषदांना देणे क्रमप्राप्त आहे. एखाद्या नगरपरिषदेने जिल्हापरिषदेला त्यांच्या देय दायित्वाचा भरणा केला नसेल तर त्यांनी त्याचा तत्काळ भरणा करावा, अशा सूचना सर्वच नगरपरिषदांना देण्यात येत आहेत. त्याच प्रमाणे डीएमएच्या माध्यमातून जे विविध अनुदान नगरपरिषदांना वितरित होते, त्या अनुदानातूनही जिल्हापरिषदेचे दायित्व रिकन्सिलेशन करण्यात यावे, अशा सूचना डीएमएला आजच्या साक्षीच्या अनुषंगाने देण्यात येतील असा खुलासा सचिव, नगरविकास विभाग यांनी केला.

समितीने पुढे ग्रामविकास विभागाला अशी विचारणा केली की, अनऑथॉराईज नगरपरिषदेचे पैसे ग्रामविकास विभागाला मिळणार आहेत. त्या दृष्टीने ६२ कोटी रुपयांची अमाऊंट बरोबर आहे काय? सचिव, नगरविकास विभाग यांनी असे म्हटले आहे की, जे देय असेल ते देऊ. त्या अनुषंगाने ६२ कोटी रुपयांची देयके एजींनी काढलेली आहेत. ऑथॉराईज आणि अनऑथॉराईजच्या क्लासिफिकेशनमध्ये अनऑथॉराईज नगरपरिषदांचे पैसे आपल्याला मिळणार आहेत. अनऑथॉराईज नगरपरिषदांचे ६२ कोटी रुपये आहेत याची तपासणी केली आहे काय, नसल्यास नगरविकास विभागाबरोबर चर्चा करून, तपासणी करून ती रक्कम ठरवून घ्यावी ते पैसे आपण पे करावे. कारण सन २०१३ पासून नवीन शासन निर्णय आलेला आहे त्याने आता हे सर्व सुपरसीड झालेले आहे. परंतु, सन २०१३ पर्यंत आपल्याला द्यावे लागेल. सन २०१३ पर्यंत ग्रामविकास विभागाला नगरविकास विभागाकडून जे घ्यायचे आहे ते नगरविकास विभागाने त्यांच्या मिळणाऱ्या अनुदानातून कापून ग्रामविकास विभागाला द्यावे, असा समितीचा सल्ला आहे. या विषयी सर्व कार्यवाही करून एक महिन्याच्या आत समितीला कळवावे जेणेकरून आमचा अहवाल तयार होण्यापूर्वी त्या जिल्हा परिषदेला पैसे मिळाले पाहिजेत असे समितीने नमूद केले तसेच काही ठिकाणी जेथे स्थानिक नगरपालिकांना जिल्हा परिषदेकडून टॅक्स येणे आहे तेथेही चर्चा करून निर्णय केला, तर तोही प्रश्न मिटेल असेही समितीने मत व्यक्त केले.

कित्येक जागेवर जिल्हा परिषदेकडून नगरपालिकांना टॅक्स फार मोठ्या प्रमाणावर येणे आहे. वाशिमचे उदाहरण आहे तेथे ७० लाख रुपये नगरपालिकांना जिल्हा परिषदेकडून टॅक्सचे येणे आहे. जिल्हा परिषदेने नगरपालिकांना द्यावे व नगरपालिकांनी जिल्हापरिषदांना द्यावे अशाप्रकारे ते तिथल्या तिथे ॲडजस्ट होत असतील तर पहाता येईल असेही विभागास अवगत केले असता नगरपरिषदेकडून जिल्हा परिषदेला येणारे देयक आणि जिल्हापरिषदेकडून नगरपरिषदेचे देयक याचे थोडे रिकन्सीलेशन करून हे दायित्व पूर्ण करावे असे नगरविकास विभागाच्या सचिवांनी नमूद केले.

### ३.११ परिच्छेद क्र. २.२.४.१, महसुलाची निर्धारणा, आकारणी आणि संकलन कराची थकबाकी :

उपरोक्त परिच्छेदामध्ये ग्रामपंचायतीने पुरेशा प्रमाणात कर वसूल केलेला नाही अशा प्रकारचा आक्षेप असून कर डिमांडपेक्षा कमी मिळालेला आहे असा आक्षेप असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

काही ठिकाणी १०० टक्के, काही ठिकाणी ८० टक्के व काही ठिकाणी १० टक्के कर मिळालेला आहे अशी लेखी माहिती आहे परंतु एकंदर राज्याची यासंदर्भात काय परिस्थिती आहे अशी पृच्छा समितीने केली असता सर्वसाधारणपणे डिव्हीजन वाईज फरक असतो. टॉपमध्ये पश्चिम महाराष्ट्र, कोकण आहे व खालच्या पातळीवर अमरावती, मराठवाडा आहे. नागपूर आणि नाशिक सारख्या प्रमाणात आहे. अमरावती आणि मराठवाडयामध्ये कल्चर ऑफ फूल रिकव्हरीज नाही. इन्सेंटिवाईसेशन साठी बीडीओ, विस्तार अधिकारी आणि ग्रामसेवक यासंदर्भात आढावा घेत असतात. चौदाव्या वित्त आयोगानुसार पुढील वर्षापासून १० टक्के वसूली वाढल्याशिवाय त्यांना प्रोत्साहनपर ग्रँट मिळणार नाही तसेच यासंदर्भात ऑडीट केले पाहिजे अशा काही अटी टाकण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता प्रत्येक ग्रामपंचायत यासंदर्भात काळजी घेईल अशी अपेक्षा असल्याचे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस सांगितले तसेच २५ जिल्ह्याची संपूर्ण माहिती उपलब्ध असून मालमत्ताकराच्या ८५ टक्के रिकव्हरीज झालेली आहे. १० जिल्ह्यांच्या संदर्भातील माहितीची विभागाने मागणी केलेली असल्याचे ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी स्पष्ट केले.

### ३.१२ परिच्छेद क्र. २.२.४.२, भ्रमणध्वनी मनोऱ्यावरील कराची आकारणी न करणे :

मोबाईल टॉवरच्या संदर्भात कोठेही पुरेशी वसूली झालेली नाही. बहुतेक ठिकाणी वसूली करण्यामध्ये दिरंगाई दिसून येत आहे त्यामुळे यासंदर्भात आपण नेमकी कोणती कारवाई केलेली आहे? अशी पृच्छा समितीने केली असता वसूलीच्या संदर्भात संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत परंतु आता पुन्हा वसूलीच्या संदर्भात सूचना देण्यात येतील. त्यांच्या क्षेत्रापुरती त्यांनी वसूली केली पाहिजे एक लक्षात आले आहे की, गव्हर्नमेंट लेव्हलला आम्ही रिलीज करतो इन्कम एरिया दुर्लक्षित झाले आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीने वसूलीच्या संदर्भात पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदरहू विषयाचा परिच्छेद आल्यानंतर सुद्धा कोणतीही कार्यवाही केली जात नाही. पूर्ण राज्याचा विचार केला तर पूर्ण राज्याची खूप शिल्लक राहिलेली असेल. जवाहरमध्ये ४.४५ कोटी रुपयांपैकी केवळ १८ हजार रुपयांची वसूली झालेली आहे. पांढरकवडा या ठिकाणी सुद्धा अशीच परिस्थिती आहे. पॅरा आल्यानंतरही ग्रामपंचायती पैसे वसूल करू शकत नसेल तर आपण सूचना देऊन त्याचा काही उपयोग होणार आहे काय?ठरावीक ग्रामपंचायतीचांच या पॅरामध्ये उल्लेख असून त्यांचीही वसूली अत्यंत नगण्य आहे. वसूली बरोबर झाली तर १० टक्के इन्सेंटिव्ह देणार आहात. त्यामुळे मोबाईल टॉवरची बाब सुद्धा आपण चौदाव्या वित्त आयोगाच्या निकषामध्ये टाकावी असे समितीला वाटते असे मत समितीने व्यक्त केले. या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे विदित केले की, जो फिगर्स है उसके बारे में भी रिकन्साईल करना पडेगा. जिंतूर के मोबाईल टॉवर्स की संख्या आप २९ बता रहे है. हमारे हिसाब से यह संख्या ३९ होती है. यह जानकारी हमें तहसीलदार से प्राप्त हुई है और इसके बारे में हमारे पास डॉक्यूमेंट्स है. मोबाईल टॉवर की संख्या चेक करनी पडेगी.

महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या मतानुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, मोबाईल टॉवरच्या संदर्भात तहसीलदारांकडून खात्री करून घेण्यात आली आहे. या मुद्याच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, परभणी यांच्याकडून दिनांक १२ फेब्रुवारी २०१६ च्या पत्रानुसार माहिती प्राप्त झाली असून त्यानुसार जिंतूर पंचायत समिती मधील मोबाईल टॉवरची संख्या व तहसील कार्यालय, जिंतूर यांच्या कडील मोबाईल टॉवरची संख्या यामध्ये तफावत आढळून येत नसल्यामुळे जिल्हा परिषद, परभणी यांनी कळविले आहे. तसेच ग्रामपंचायत क्षेत्रात मोबाईल टॉवर्सची संख्या २९ असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

मोबाईल टॉवरची एकूण संख्या ३९ आहे असे महालेखाकार यांचे म्हणणे असून सचिवांच्या माहितीनुसार ती संख्या २९ एवढी असल्याचे समितीने नमूद केले. यावर जो अमाऊंट बतायी गई है उसमें में फरक है. आप सात लाख रुपये का आँकडा बता रहे है, हमारे हिसाब से यह अकाऊंट १७ लाख रुपये का है असे महालेखाकारांनी विभागास अवगत केले.

कोणकोणत्या कंपनीचे किती टॉवर्स आहेत याची नावानुसार समितीकडे माहिती आहे. सन २००५ ते २०१० या कालखंडात हे सर्व मोबाईल टॉवर्स स्थापित करण्यात आलेले आहेत. समितीकडे ग्राऊंड लेव्हलवरून माहिती आलेली आहे. महालेखापाल यांच्या म्हणण्यानुसार १७.७९ लक्ष रुपये व सचिवांच्या माहितीनुसार ७.७९ लक्ष रक्कम असा दोघांच्या माहितीमध्ये फरक आहे. दोघांच्या माहितीमध्ये एकंदर १० लक्ष रुपयांचा फरक आहे. ही जिंतूरची माहिती असून त्याची वसूलीही झालेली नाही. राज्यातील ग्रामीण क्षेत्राच्या टावर्सकडून सक्तीने रक्कम वसूल केली गेली पाहिजे यासंदर्भात सचिवांनी मार्गदर्शक सूचना करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने नमूद केले. तसेच जिंतूरच्या प्रकरणाची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी. तसेच समितीला ज्यांनी मोबाईल टॉवर्सच्या संदर्भात असत्य माहिती दिली त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी आणि शासन निर्णयानुसार कर आकारणी न करता कमी दराने कर आकारणी केली आहे. ही कर आकारणी शासन निर्णयाप्रमाणे केली पाहिजे अशी सचिवांनी सूचना केलेली आहे. कमी दराने कर आकारणी करणे हे चुकीचे असून यासंदर्भातही संबंधिताला जबाबदार धरले गेले पाहिजे. परंतु यामध्ये केवळ

दुरुस्ती करून चालणार नाही. कारण असे केल्याने सिस्टीम दुरुस्त होणार नाही. त्यामुळे या गोष्टींना जे कारणीभूत आहेत त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. आपण या अनुषंगाने आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी संबंधितांना विहित मुदत घालून दिलेली आहे. त्यामुळे विहित मुदतीत काम न करण्यास जे जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करावयास पाहिजे असे स्पष्ट मत समितीने व्यक्त केले.

**३.१३ परिच्छेद क्र. २.२.५, संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रणे :**

ग्रामसेवक हे ७५ ग्रामपंचायतींमध्ये रोख रक्कम आणि लेखे हाताळत होते. असे करणे महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या विरुद्ध आहे. अशा व्यवस्थेमुळे ग्रामपंचायतीच्या निधीचा दुर्विनियोग किंवा अफरातफरीची शक्यता बळावते. त्यामुळे उक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने विभागीय सचिवांचे काय म्हणणे आहे? अशी पृच्छा समितीने केली असता ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक हा एकटाच असतो त्या ठिकाणी दीर्घकाळ दोन कर्मचारी ठेवणे शक्य होणार नाही. परंतु दीर्घकाळासाठी एक काम करता येईल. सचिव आणि विभागाचे लेखाधिकारी गेल्या महिन्यात या संदर्भातील अभ्यास करण्यासाठी मध्य प्रदेश राज्यातील खंडवा येथे गेले होते. त्या राज्याने ग्रामपंचायतींच्या कारभाराच्या बाबतीत दर्पन नावाची पद्धत सूरू केली आहे. त्या राज्यात ग्रामसेवकाचा कॅश हँडलींगशी संबंध येत नाही. ग्रामसेवकांनी बँक सिस्टीम आणि आयटी इंटीग्रेट करून कॅश हँडल करु नये या संदर्भात प्रस्तावित करून विभाग हळूहळू हे प्रश्न सोडविणार असल्याचे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सांगितले आणि जे दैनिक कलेक्शन होते हे त्याच दिवशी जमा करावे लागणार असल्याचे समितीस अवगत केले.

नवीन पद्धत प्रस्तावित करीत आहात ही चांगली गोष्ट आहे. कारण यामुळे भविष्यात चुकीच्या गोष्टी होणार नाहीत. परंतु अगोदरच्या काळात जे प्रकार घडलेले आहेत त्या बाबतीत विभाग कोणती भूमिका घेणार आहे किंवा कारवाई करणार आहात का? अशी पृच्छा समितीने केली असता पंचायती राज समितीने पुणे जिल्ह्याचा दौरा केला होता. त्या जिल्ह्यात बऱ्याच प्रमाणात वसूली करण्यात आलेली आहे. या दृष्टीने विभागाकडून सातत्याने वसूली करीत आहोत परंतु यातील काही प्रकरणे १९५८, १९६०, १९६२ या कालावधीतील आहेत. विभाग जुन्या काळातील प्रकरणे मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. विभागाकडून मोहिमा सुद्धा राबविण्यात येतात. सन १९९० पूर्वीच्या काही केसेस ड्रॉप केल्या तर अलीकडच्या कालावधीतील प्रकरणांकडे जास्त प्रमाणात लक्ष केंद्रित करू शकतो. तसेच विभागाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे सुद्धा अडचणी येत आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

कर्मचारी नाहीत म्हणून दोषींवर कारवाई करणार नसल्याचा गैरफायदा घेतला जात असेल तर ते योग्य नाही असे मत समितीने व्यक्त केले असता गेल्या पाच वर्षांत या अनुषंगाने कडक कारवाई केली आहे. जुन्या प्रकरणांच्या बाबतीत अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्याच्या विचारात आहोत. जुन्या काळातील प्रकरणांच्या बाबतीत अनेक अडचणी उद्‌भवतात. त्या काळात कर्मचारी कोण होते याचा शोध लागत नाहीत. शिवाय अनेक प्रकरणांच्या बाबतीत आवश्यक ती कागदपत्रे सापडत नाहीत. जुन्या प्रकरणात कारणे दाखवा नोटीस सुद्धा देता येत नाही. परंतु अलीकडच्या काळातील अफरातफरीची प्रकरणे वसूलीसाठी घेतली तर ही अडचण येणार नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले तसेच आता नवीन दुरुस्तीनुसार लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत तर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना २५ हजार रुपयांचा दंड करण्याचे प्रस्तावित केले आहे. चुकीच्या प्रकरणांची संख्या मोठ्या प्रमाणावर दिसत असली तरी प्रत्यक्षात मात्र चार-पाच प्रकरणांत वस्तुस्थिती आढळून येते अशी माहितीही विभागीय सचिवांनी दिली.

महालेखापरीक्षक हे संपूर्ण प्रकरणांच्या अनुषंगाने नव्हे तर सॅम्पल केसच्या अनुषंगाने परिच्छेद काढत असतात. सॅम्पल केसमध्येच एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रकरणे निदर्शनास येतात. तसेच सन १९५८ ते २०१४ या कालावधीत १०५७ ग्रामसेवक आणि २५० सरपंचांविरुद्धची अफरातफरीची प्रकरणे प्रलंबित आहेत. ते मयत होईपर्यंत सुद्धा त्यांच्या प्रकरणांच्या बाबतीत निर्णय होणार नाही, असे दिसते. त्यामुळे ही प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे गरजेचे आहे. या प्रकरणांमध्ये आपल्याला काहीच गैरप्रकार आढळून आला नाही काय? ६ जिल्हा परिषदांमध्ये २००५ ते २०१२ या कालावधीत अफरातफरीच्या ४४ प्रकरणांमध्ये ६० कोटी ५२ लाख रुपये अडकलेल्याचे निदर्शनास आले. परंतु या प्रकरणांच्या अनुषंगाने दोषींवर एफआयआर दाखल करण्यामध्ये चार ते सात वर्षांचा विलंब लावला आहे आणि तोच लेखापरीक्षणातील आक्षेप आहे. वास्तविक पाहता, अशा दोन-चार प्रकरणांत तातडीने एफआयआर दाखल केला असता तर त्यांच्यासह इतरांवर सुद्धा काही तरी वचक बसला असता. समिती जाणून घेऊ इच्छिते की, ज्यांनी एफआयआर दाखल करण्यास विलंब केला त्यांच्यावर विभागाने काय कारवाई केली? अशी विचारणा समितीने केली असता या संदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना डायरेक्शन्स दिल्या असून मुळात जुनी प्रकरणे निकाली काढण्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अधिकार आहेत. त्यांनी जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढून प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी केली तर त्या बाबतची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात घेण्यास सुरूवात केली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीची अपेक्षा आहे की, कोणत्याही परिस्थितीत आर्थिक अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये सहा महिन्यांत दोषींवर एफआयआर दाखल केला पाहिजे. नाही तर त्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, अशा प्रकारचे परिपत्रक जोपर्यंत निर्गमित केले जात नाही तोपर्यंत कोणीही कारवाई करणार नाही. केवळ विभागीय चौकशी करून वेळ मारून नेण्यात येईल. त्यामुळे विभागाने अशा प्रकारचा ठोस आदेश

निर्गमित केला पाहिजे अशी सूचना समितीने केली. तसेच पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात प्रतिनियुक्तीवर असलेल्या एका ग्रामसेवकाने २०१२ ते २०१४ या कालावधीत क्लेरिकल कामात अफरातफर केली. त्या ग्रामसेवकावर ज्या दिवशी एफआयआर दाखल करण्यात आला त्याच दिवशी त्याने आत्महत्या केली. त्यामुळे त्या ग्रामपंचायतीचे त्या कालावधीतील सर्व व्यवहार ठप्प झालेले आहेत. त्या ग्रामपंचायतीचा कार्यभार हाती घेण्यास कोणीही तयार नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता चार दिवसांपूर्वी राज्यातील जिल्हा परिषदांतील प्रकरणांचा आढावा घेतला आहे. त्यानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांना मदतीसाठी गट विकास अधिकारी आणि लेखा सहायक दिले आहेत. अशाप्रकारे या कामी एक पद ॲडजस्ट करण्याचे आदेश विभागाने निर्गमित केले असल्याचा खुलासा ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी केला.

**३.१४ परिच्छेद क्र. २.२.६, निष्कर्ष आणि शिफारशी :**

समितीची अपेक्षा आहे की, मिसॲप्रोप्रिएशन कमी करण्यासाठी जिल्हा परिषद/पंचायत समित्यांच्या कामकाजामध्ये विभागाचा इफेक्टीव्ह परफॉर्मन्स योग्यप्रकारे दिसला पाहिजे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये सुरळीत आणि पारदर्शक कारभार होण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करणार आहात? जेणेकरून ज्या उपाययोजना करणार आहात त्या बाबतचा समावेश समितीच्या अहवालात करणे शक्य होईल असे समितीने मत व्यक्त केले असता विभाग दोन प्रकारचे उपक्रम राबवित आहे. पहिला म्हणजे, सध्या निधी हा वेगवेगळ्या विभागांना मिळतो. त्यामुळे या संदर्भातील कार्यप्रणाली अजून सुधारावयास पाहिजे. यातील अनावश्यक लेअर्स कमी झाला पाहिजे. पूर्वी अनेक ठिकाणी विभागीय आयुक्तांमार्फत निधीचे वाटप करण्यात येत होते. परंतु आता ही पद्धत बंद करून थेट निधी देण्यास सुरूवात केली आहे. एक स्टेप कमी झाल्यामुळे आता दोन-तीन महिन्यांची बचत होत आहे. या अनुषंगाने विभागाच्या पातळीवरील विषयांमध्ये अजून काही सुधारणा करणार आहोत. तसेच काही प्रलंबित प्रकरणांच्या बाबतीत अनुशेष असेल तर वित्तविभागासोबत पाठपुरावा करून तो अनुशेष दूर करणार आहोत. तसेच जिल्हा परिषदेला पूर्ण वेळ युनिट देता येईल काय आणि जिल्हा परिषद सेसमध्ये कम्पलसरी करून तीन वर्षांत जिल्हा परिषदांनी त्यांच्या सिस्टीम आणि त्यांचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करणार आहोत. तसेच ग्रामपंचायतीला दर्पनसारखी अकाऊंटीग सिस्टीम उपलब्ध करून देता येईल काय या बाबतीत सुद्धा प्रयत्नशील आहोत. कारण सद्यःस्थितीत ग्रामसेवकाला प्रचंड प्रमाणावर रजिस्टर्स ठेवावे लागतात. त्यामुळे यामध्ये काही सुलभ करता येते काय हे बघणार आहोत. मी अगोदर सांगितल्यानुसार काल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांना मदतीसाठी एका गट विकास अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. तसेच प्रलंबित लेखा परिच्छेद निकाली काढण्यासाठी विभागातर्फे मोहिम सुरू करीत आहोत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

## (ब) ग्रामविकास व जलसंधारण विभाग

### (ग्रामविकास, सहकार विभाग)

**साक्ष :**

**४.१ परिच्छेद क्र. २.३, 'शासकीय निधीची अडवणूक' :**

उपरोक्त परिच्छेद ग्रामविकास व जलसंधारण ग्रामविकास संबधित असला तरी यातील काही मुद्दे सहकार विभागशी संबधित असल्याने उपरोक्त परिच्छेदाबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ८ जून २०१६ रोजी ग्रामविकास विभाग आणि सहकार विभागाचे सचिव व तसेच विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी शासकीय निधीची अडवणूक या परिच्छेदाबाबत सद्यःस्थितीची माहिती देण्यास समितीने सांगितले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, जिल्हा परिषद अधिनियमामध्ये दोन पर्याय दिलेले होते. त्यानुसार जिल्हा परिषदांनी त्यांचा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये किंवा राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये ठेवावयाचा आहे. मागील अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदांचा निधी सहकारी बँकांमध्ये ठेवला जात आहे. दुर्दैवाने वर्धा, उस्मानाबाद, नागपूर, नंदूरबार, बुलढाणा व धुळे या सहा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्यामुळे जिल्हा परिषदांचा निधी या बँकांमध्ये अडकून पडला ही वस्तुस्थिती आहे. परंतु विभागाच्या प्रयत्नाने आतापर्यंत १९० कोटी रुपये त्या त्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी जिल्हा परिषदांना परत केलेले आहेत. नागपूर बँकेमध्ये १२६ कोटी रुपये, बुलढाणा बँकेमध्ये १२१ कोटी रुपये, वर्धा बँकेमध्ये ९१ कोटी रुपये, नंदूरबार बँकेमध्ये ८७ कोटी रुपये, उस्मानाबाद बँकेमध्ये ५९ कोटी रुपये व धुळे बँकेमध्ये ११ कोटी रुपये अडकले होते.

जिल्हा सहकारी बँकांच्या संदर्भात नाबार्डने अहवाल दिला होता तो सहकार आयुक्त कार्यालयाला प्राप्त झाला नाही का? अशी विचारणा समितीने केली असता सहकार विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, नाबार्डचे अहवाल सहकार विभागाकडे आणि संबधित बँकांकडे आहेत. सगळ्यांच बँकांची चौकशी करण्यात आली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने सूचना दिल्यानुसार या सहा बँकांचे व्यवहार बंद झाले. नाबार्डने निदर्शनास आणून दिल्यानंतर केल्यानंतर संबंधित बँकांची, कलम ८३ अंतर्गत चौकशी सुरू केली. काही ठिकाणची चौकशी पूर्ण झाली तर काही ठिकाणी ती सुरू आहे.

हा विषय सहा बँकांपुरता मर्यादित आहे. या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये जिल्हा परिषदा आणि इतर कार्यालयाकडून ठेवण्यात आलेला निधी इतर ठिकाणी वळता केल्याची उदाहरणे आहेत. जिल्हा परिषदेकडून आलेला विकास कामाचा निधी किंवा वेतन खर्चाचा निधी इतर ठिकाणी वळता केला जाऊ नये. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे आलेला जिल्हा परिषदेचा निधी कायम ठेवण्याची सक्ती विभागाकडून करण्यात आली तर त्यांना तो निधी इतर ठिकाणी वळता करता येणार नाही. This amounts to misuse of funds. असे करता येत नाही, परंतु सर्रासपणे केले जात आहे. काही बँकांकडून सांगितले जाते की, दोन दिवसात पैसे परत देण्यात येतील. जिल्हा परिषदेकडून आलेला निधी त्याच कामासाठी वापरण्याचे आदेश जिल्हा बँकांना देणे शक्य आहे. विदर्भातील काही जिल्हा बँकांना थेट प्रधानमंत्री कार्यालयाकडून (पीएमओ) चेक आलेले आहेत. मराठवाड्यातील अनेक बँका अडचणीत असताना त्यांना अशा प्रकारची मदत मिळाली नाही. विदर्भातील बँकांना मोठ्या प्रमाणात मदत मिळूनही त्या बँका जिल्हा परिषदांचा निधी परत देऊ शकत नसतील तर निश्चित वेगळे काही तरी चालले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता सहकार विभागाच्या विभागीय प्रतिनिधींना सांगितले की, विदर्भातील नागपूर, वर्धा व बुलढाणा या तीन बँकांची लायसन्स रिझर्व्ह बँकेने रद्द केली होती. त्यांच्याकडून एफ.डी. अकाऊंट, सी.आर.ए.आर.मेन्टेन होत नव्हते. शासनासमोर एकच पर्याय होता की, या बँकांना भागभांडवलासाठी पैसे देणे. त्यातून त्यांच्या सी.आर.ए.आर. मध्ये प्रगती (improvement) झाल्यानंतर त्यांना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून लायसन्स मिळावे यादृष्टीने, महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार आणि नाबार्ड यांच्यामध्ये अंतर्गत करार झाला. त्यानुसार या तीन बँकांना ५२० कोटी रुपये सरकारने दिले. त्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेला प्रस्ताव पाठविण्यात आला की, या बँकांकडून निकष पूर्ण होत असल्यामुळे या तीनही बँकांना लायसन्स देण्यात यावे. नागपूर जिल्हा बँकेला मार्च महिन्यात लायसन्स मिळाले. वर्धा आणि बुलढाणा जिल्हा बँकांना एप्रिल महिन्यात लायसन्स मिळाले. केंद्र सरकार, नाबार्ड आणि महाराष्ट्र शासनाने अनुदान दिल्यामुळे या बँका अडचणीतून बाहेर येऊ शकल्या, त्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँकेने त्यांना लायसन्स दिले. या बँकांचा बँकिंग व्यवसाय २०१६-१७ मध्ये सुरू झाला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने गाईडलाईन्स दिल्या आहेत, दोन वर्षांत या बँका अडचणीतून बाहेर आल्या पाहिजेत.

शासनाने या बँकांना आर्थिक मदत देऊन दीड वर्षांपेक्षा जास्त काळ उलटला आहे जिल्हा परिषदांची खाती म्हणजे शाश्वत उत्पनाची खाती असतात. त्यांची देणी सांभाळली असती तर ही खाती जिल्हा बँकांकडे राहिली असती. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता सहकार विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, २०१५-१६ या वर्षात शासनाने डिसेंबर, २०१५ मध्ये पहिल्यांदा काही रक्कम दिली, मार्चमध्ये काही रक्कम दिली. मान्यता (कम्प्लायन्स) झाल्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेला शासनाकडून आणि या बँकांकडून कळविण्यात आले. त्यानंतर मार्च-एप्रिल महिन्यात या बँकांना लायसन्स मिळाले आहे. नागपूर बँकेला लायसन्स मिळाल्यापासून दरमहा ८० लाख रुपये जिल्हा परिषदेला प्रदान सुरू

झाले. जसजशी या तीन बँकांमध्ये वसुलीची परिस्थिती सुधारेल, ठेवी वाढतील तसे या बँकांकडून जिल्हा परिषदांना पैसे परत केले जाऊ शकतील. या वर्षात या बँकांकडून जिल्हा परिषदांना काही प्रदान होऊ शकतील.

आलेला निधी त्याच कामासाठी वापरावा अशा सूचना जिल्हा बँकांना देता येतील का? हा निधी तीन वर्षांचा आहे की एका वर्षाचा आहे? अशी विचारणा समितीने केली असता सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, बँकिंग व्यवसायामध्ये विविध मार्गांनी बँकेकडे ठेवी येत असतात, कर्जाची वसुली होत असते, त्यामधून नवीन कर्ज वाटप केले जाते. जिल्हा परिषदेकडून आलेला निधी तसाच ठेवला जावा, त्याच कामासाठी वापरावा असे होत नसते. जो निधी होता तो २०१२ मधील आहे. २०१२ मध्ये रिझर्व्ह बँकेकडून मार्गदर्शक सूचना आल्यानंतर त्या तारखेला जिल्हा परिषदांचा जो निधी होता तो २०१२ मधील आहे. शासनाच्या विविध विभागांचा निधी पूर्वी जिल्हा बँकांमध्ये ठेवायचा होता. प्रामुख्याने या सहा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अडचणीत आल्यानंतर ग्रामविकास विभाग व वित्त विभागाने निर्णय घेतला की, सहकारी बँका आर्थिक अडचणीत आहेत त्यामुळे यापुढे आपण शक्यतो जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये निधी ठेवू नये. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, असा निर्णय सर्वच डीसीसी (जिल्हा मध्यवर्ती सहकारी) बँकांबाबत घेता येणार नाही, असा निर्णय होऊ शकत नाही.

त्यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, पूर्वी उल्लेख केलेल्या सहा जिल्हा बँकांसह नांदेड, जालना आणि बीड अशा एकूण ९ जिल्हा बँका आहेत.

याबाबतची पार्श्वभूमी विषद करताना सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, तशा प्रकारचा निर्णय झाला. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली. त्यावेळी सर्व जिल्हा बँकांनी निवेदन केले की, अशा प्रकारचा निर्णय झाला तर सर्व बँका अडचणीत येतील. म्हणून ज्या जिल्हा बँका सध्या अडचणीत आहेत त्या बँकांमध्ये निधी ठेवू नये असा निर्णय झाला. या सहा जिल्हा बँकानंतर राज्यामध्ये नाबार्डकडून ऑडिट झाले तेव्हा आणखी दोन-तीन बँका रडारवर आल्या, इंडिकेटर बघून त्या बँका अडचणीत जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. म्हणून या ९ बँकांमध्ये पैसे ठेवू नयेत असा निर्णय झाला. पूर्वीचा ग्रामविकास विभागाचा निर्णय अजूनही आहे. प्रत्यक्षात ९ बँकांमध्ये पैसे ठेवण्यात येत नाहीत. या बँकांमध्ये बँकिंग व्यवहार सुरू झाला आहे. बँक अडचणीत आल्यानंतर ती अडचण दूर करावयाची झाली तर त्याकरिता ३ ते ४ वर्षाचा कालावधी लागतो. या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मार्चनंतर लायसन्स मिळाले आहे. या बँकांचा व्यवहार पूर्ववत व्हावयाचा असेल तर पुरेसा कालावधी द्यावा लागेल. दिलेला निधी चिन्हांकित ठेवावयाचा झाला तर बँकिंग व्यवहार चालू शकत नाही. बँकिंग व्यवहार सुरू झाल्यानंतर या बँकांमध्ये सरप्लस निर्माण होईल आणि त्या टप्प्याटप्प्याने जिल्हा परिषदांचा निधी परत करतील.

जिल्हा परिषदेकडून आलेला निधी चिन्हांकित केला नाही तर तो निधी संबधितांकडून इतर ठिकाणी वळता करण्यात येईल. वर्किंग कॅपिटल उपलब्ध करून दिले नाही तर त्या बँका पुनरुज्जीवित होणार नाहीत. विभागाचा प्रस्ताव बरोबर आहे, परंतु निधी चिन्हांकित करावा. बॅकलॉग कमी झाला पाहिजे. याबाबत ग्रामविकास विभाग व सहकार विभागाचे नियंत्रण असावे असे समितीने सूचित केले असता सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, धुळे जिल्ह्यात प्रत्येक महिन्याला २५ लाख याप्रमाणे मागील वर्षापासून ३.५ कोटी रुपये वसूल करून दिले आहेत. राज्य शासनाने ५०० कोटी रुपये एवढा निधी दिल्यानंतर राज्य शासन, भारतीय रिझर्व्ह बँक आणि नाबार्ड यांची या बँकांच्या व्यवहारावर बारीक नजर आहे. प्रत्येक व्यवहार छाननी केल्याशिवाय करता येत नाही. निधी वळता होण्याची शक्यता शून्य आहे.

एखाद्या ग्राहकापासून विभागाला फायदा होत असेल तर तो ग्राहक टिकून राहण्यासाठी विशेष प्रयत्न केला जातो. जिल्हा परिषदा या प्राथमिक ग्राहक आहेत, त्यांना सांभाळता आले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता सहकार विभागांच्या सचिवांनी सांगितले की, जिल्हा परिषदेचे खाते पुन्हा सुरू झाले, त्यामुळे नक्की त्या लोकांना त्यांचा निधी देण्याच्या दृष्टीने नियोजन करता येते. जिल्हा परिषद, सहकार विभागाचे अधिकारी यांचा जिल्हा पातळीवर समन्वय ठेवण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करता येईल. समितीच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हा परिषदेची विकास कामाची, वेतनाची रक्कम असते. कर्जमाफी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात जिल्हा बँकांकडे निधी आला त्यावेळी राज्य सहकारी बँकेत ती रक्कम गुंतवण्यात आली होती. आता जेव्हा सगळे डबघाईस येते अशा वेळेला शाश्वत खात्याला न्याय देण्याच्या हेतूने त्यांनी जिल्हा परिषदेने ठेवलेली पगाराची, विकास कामाची रक्कम त्यांना परत दिली पाहिजे. विभागीय प्रतिनिधी सांगतात त्याप्रमाणे जिल्हा परिषदाची बँकेतील खाती बंद करता येणार नाही त्यांची खाती बंद पडली तर सगळे संपून जाईल. सातारा, सांगली, पुणे, कोल्हापूर या चांगल्या स्थितीतील थोड्याफार बँका आहेत. आगामी कालावधीत तिथेही राजकीय द्वेशापोटी काहीही होऊ शकते? We are anticipating some problems. ये बैंक नीचे गिरने वाली है, इसको यहां से निकालकर दूसरी जगह पर लेकर जाओ. This should not be a trend. असे मत समितीने व्यक्त केले व विचारणा केली की, सर्व जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये पैसे ठेवू नये असा निर्णय घेतला आहे का? याबाबत ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितलेली की, असा निर्णय घेतला नाही. वित्त विभागाचे स्पष्टीकरण असे आहे की, त्या जिल्ह्यातील त्या बँकांची आर्थिक स्थिती पाहून त्या जिल्हा परिषदांनी योग्य तो निर्णय घ्यावा.

विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार नऊ बँका रडारवर आहेत. गोंदिया जिल्हा बँकेतून जिल्हा परिषदेने पूर्ण पैसे काढले. ही बँक रडारवर आहे का? याबाबतची माहिती देण्याबाबत समितीने सांगितले तसेच विभागाच्या इच्छेप्रमाणे पैसे काढण्यात येऊ नयेत. परंतु नाबार्डच्या आणि यांच्या भूमिकेच्या आधारे पैसे काढण्यात यावेत असे समितीने सूचविले असता सहकार विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, समितीच्या सूचनेनुसार यापुढे जिल्हा परिषदेचे पैसे या बँकांमध्ये ठेवले जातील. त्यामध्ये ग्रामसेवकांचे पगाराचे पैसे, शिक्षकांच्या पगाराचे पैसे वगैरे हे पैसे चिन्हांकित करून त्याच पगारासाठी वापरता येऊ शकतील अशी व्यवस्था करता येईल. आता फक्त ग्रामविकास विभागाचे जे पैसे थकलेले आहेत. ते चिन्हांकित करून आता लगेच परत करता येणार नाहीत. समितीच्या सूचनेप्रमाणे त्या-त्या जिल्हा परिषदेमध्ये यापुढे पैसे डिपॉझिट केले जातील.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, ज्या बँका डबघाईस आलेल्या आहेत, त्यांना सहकार विभागाकडून मदत करण्यात येते ज्या बँकांची गुणवत्तापूर्ण कामगिरी (रिझल्ट) नाही, त्यांना सुद्धा सहकार विभागाकडून पैसे काढण्याच्या (withdraw) पद्धतीस मान्यता देण्यात आली. त्याबाबत काय परिस्थिती आहे? त्या अनुषंगाने गोंदिया जिल्हा बँकेची परिस्थिती खराब असेल तर तेथील ठेवीदारांना सूचित करता येईल की, त्यांनी पैसे काढावेत असे मत समितीने व्यक्त करून समितीने याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, याबाबत वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचना दोन वर्षे आधी आल्या होत्या. प्रत्येक जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्तरावर काळजी घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे.

आता इतक्या बँका डबघाईस आल्या आहेत. नाबार्डचे निरिक्षण विभागाकडे व मुख्य सचिवांकडे आले. याबाबतचा समितीकडे पूर्ण रेकॉर्ड आहे. तीन-तीन वर्षे विभागाने लक्ष दिले नाही. जेव्हा बँका पूर्णपणे डबघाईला आल्या तेव्हा विभागाने लक्ष दिले. नाहीतर ही परिस्थिती आलीच नसती. सन २०११ च्या पत्रावर सन २०१४ मध्ये कार्यवाही केली. नाबार्ड व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचना असतात, सहकार विभाग, ग्रामविकास विभाग काय करतो? नाबार्डने सूचित केले होते. तरी सुद्धा लक्ष त्याकडे दिले गेले नव्हते. सन २०११, २०१२ चे निरिक्षक आहे. It is in the para of AG. असे असताना, या सर्व विभागांना माहित असताना सुद्धा लक्ष दिले नाही असे समजायचे का? अशी विचारणा समितीने केली असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाचा सल्ला घेऊन दोन वर्षांपूर्वी ग्रामविकास विभागाकडून अशा सूचना देण्यात आल्या की, जिल्हापरिषदांनी स्थानिक स्थिती पाहून, depending on the health and strength of the co-operative bank याबाबत योग्य तो निर्णय करावा. कारण जिल्हा परिषदांना दोन प्रकारच्या मुभा आहेत.

त्याला त्या-त्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार आहेत असे म्हणावयाचे आहे का? बँकेमध्ये पैसे ठेवायचे की नाही ठेवायचे हा नेमका निर्णय ग्रामविकास विभाग घेणार की सहकार विभाग घेणार? ते जिल्हा परिषदेवर अवलंबून आहे. ग्रामविकास विभागाचे पैसे असतील तर ग्रामविकास विभागाने ठराव केला तर ते त्यांचे अधिकार आहेत. असे समितीने व्यक्त केले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, अधिनियमाप्रमाणे सहकारी बँक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत पैसे ठेवणे शक्य आहे.

यावर समितीने विचारणा केली की, बँकेत पैसे ठेवण्याचा निर्णय कोण घेणार? समजा जिल्हा बँकेत पैसे ठेवायचे नाहीत असा निर्णय जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला तर असे मत समितीने व्यक्त केले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कॅफो यांच्याकडून निर्णय घेण्यात येतो याबाबत सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, हा राज्य शासनाचा निधी आहे. मागच्यावेळी जो निर्णय झालेला आहे त्यामध्ये वित्त विभागाच्या सूचनेच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागाने मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. हे अगदी स्पष्ट आहे. जिल्हा परिषदेचे सी.ई.ओ आणि कॅफो स्थानिक पातळीवर असले तरी वरिष्ठ स्तर म्हणून राज्य शासनाचे निर्णय अंतिम होत असतात.

राज्य शासनाचे निर्देश आहेत की, पैसे जिल्हा बँकेतच ठेवावेत? हा निर्णय नंतरचा झाला. त्याच्या आधी कोणाचा निर्णय होता? जिल्हा बँकेत पैसे ठेवावेत असा निर्णय होता का? अशी विचारणा समितीने केली असता सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, आधीचा निर्णय राज्य शासनाचा होता. जिल्हा बँक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेत पैसे ठेवावेत असा निर्णय होता. परंतु ९ बँकांमध्ये पैसे ठेवू नयेत.

याबाबत महालेखाकारांनी विचारणा केली की, जसे राज्य शासनाने बँकांना पुनरुज्जीवित करायला पैसे दिले आहेत त्याच बरोबर त्या बँकांचा सी.आर.ए.आर. ४ टक्क्यांपेक्षा कमी का झाला? याबाबत आढावा घेतला का किंवा आता सद्य:स्थितीत आढावा घेण्यात येत आहे का? सद्य:स्थितीत सर्व बँकांवर लक्ष ठेवण्यासाठी सहकार विभाग किंवा वित्त विभागाकडून वेळोवेळी काही होते आहे का? म्हणजे प्रत्येक तीन महिन्यांनी, सहा महिन्यांनी ते अद्ययावत करण्यात येते का?

याबाबत समितीने सूचविले की याबाबत ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी ग्रामविकास व सहकार विभागाच्या वतीने माहिती द्यावी की, या बॅकांवर ग्रामविकास विभागाकडून वेळावेळी निरिक्षण ठेवले जाते का? त्याच बरोबर सहकार विभागाकडून निरिक्षण ठेवले जाते का? अशी विचारणा समितीने केली. तसेच महालेखाकारांनी मत व्यक्त केले की, ग्रामविकास विभागाचे पैसे मेजर अमाऊंट असल्यामुळे महालेखापालांचा जो

परिच्छेद आहे तो ग्रामविकास विभागाच्या निधीबद्दलचा आहे. त्याच बरोबर शासनाच्या इतर छोटया योजना आहेत. त्यांचेही पैसे या बँकांमध्ये अडकून असल्याची शक्यता आहे. त्याबाबत यामध्ये नमूद करण्यात आले नाही. त्यामुळे ही रक्कम याच्यापेक्षा जास्त असू शकते. तर इतर विभागांना सुद्धा ही माहिती मिळाली पाहिजे की, या बँकांची स्थिती काय आहे? जेणेकरून ते विभाग निर्णय घेतील की, त्यांचा पैसा येथे ठेवायचा किंवा नाही. अशी एक कार्यपद्धती असायला पाहिजे. त्याचा वेळोवेळी तीन, सहा महिन्यांनी किंवा विभागाने ठरविलेल्या मुदतीच्या आत आढावा घेतला पाहिजे.

बँकांमध्ये आधी ठेवी ठेवत असताना काही संनियंत्रण ठेवले आहे किंवा नाही? याबाबत सहकार विभागाच्या सचिवांनी खुलासा करताना सांगितले की, ज्यावेळी ह्या बँका अडचणीमध्ये येऊ लागल्या त्यावेळी सहकार व ग्रामविकास विभागाने काय केले? नाबार्ड आणि आर.बी.आय. ने काय केले आहे? याबाबत सन २०१२ मधील राकेश मोहन कमिटीचे रिपोर्टस् आहेत. त्याअनुषंगाने बँकींग लायसन्स् ज्यावेळेला द्यायचे होते. दिनांक ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत सर्व बँकांनी लायसन्स् घ्यावे अशा प्रकारची शिफारस होती. त्याप्रमाणे आर.बी.आय.ने ही शिफारस लागू केलेली आहे. त्यावेळी सी.आर. ए.आर. ४ टक्के पर्यंत ठेवावी. आता टप्याटप्याने ७ टक्क्यांपर्यंत आणलेली आहे. ४ टक्यांपेक्षा कमी असलेल्या बँकांचे काय करावे? त्यावेळेला राज्यामध्ये ४ टक्यांपेक्षा कमी असलेल्या एकंदरीत ११ बँका होत्या. त्यापैकी काही बँका एक ते दोन वर्षांत पुढे येऊन सी.आर.ए.आर. ची ४ टक्यांपर्यंत अट पूर्ण केली. ती अट पूर्ण न केलेल्या ६ बँका होत्या. त्या ६ बँकांपैकी काही बँकांना राज्य शासनाने अनुदान दिलेले आहे. त्यापैकी नांदेड, धुळे, नंदुरबार, जालना या बँकांना अनुदान दिलेले आहे. उदाहरणार्थ सांगायचे असेल तर उस्मानाबादला एक बँक आहे. ह्या बँकेने स्वतःहून ४ टक्के सी.आर.ए.आर. ची अट पूर्ण केलेली आहे. म्हणून त्यांना लायसन्स् मिळालेले आहे. उरलेल्या बँकांना मिळाले नाही. या दरम्यान सन २०१२, २०१३, २०१४, २०१५ पर्यंत एक कृतीदल ठेवलेली होती. टास्कफोर्समध्ये रिझनल डायरेक्टर, आर.बी.आय. आणि सहकार सचिव, सहकार आयुक्त आणि नाबार्डचे काही अधिकारी आहेत. ही टास्कफोर्स ह्या बँकांच्या व्यवहाराचे मॉनीटरींग प्रत्येक दोन महिन्यांनी करण्यात येत होते. आर.बी.आय.चे रिझनल डायरेक्टर स्वतः त्या टास्कफोर्सचे चेअरमन होते. सध्या ही अन्य टास्क फोर्स चालू आहे असे आयुक्तांचे मत आहे. ही टास्क फोर्स प्रत्येक दोन महिन्यांनी आढावा घेऊन बँकांनी मागच्या दोन महिन्यांमध्ये काय कारवाई केली, आणि लोन्स् किती दिलेले आहेत? रिकव्हरी किती आहे? दिलेले लोन्स् योग्य आहे किंवा नाही? हे सर्व मायक्रो मॉनेटरींग ते टास्कफोर्स करत होते. सध्या सुद्धा करतात. त्यापद्धतीने मॉनेटरींग केलेले आहे. म्हणून ज्या बँकांना रडारमधून बाहेर जायचे होते. त्या बँकेची सुद्धा सुधारणा झालेली आहे. काही बँकांची सुधारणा झालेली नाही. त्याचे कारण वेगवेगळे आहे. परंतु त्या पद्धतीने मॉनेटरींग चालू होते. सद्या दिलेल्या निधीचे सुद्धा त्या टास्कफोर्सच्या वतीने मॉनिटरींग चालू आहे.सेफगार्ड आणि सेफ्टी मेकॅनिझम ठेवलेले आहे. पैशाचा गैरवापर होण्याची शक्यता शून्य आहे.

बँकामध्ये ठेवलेल्या निधीचा वापर योग्य रितीने होतो का याची खातरजमा करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने सहकार, वित्त, व ग्रामविकास विभागाची काही यंत्रणा सध्या बसवलेली आहे का? कारण ग्रामविकास विभागाचा पैसा तेथे जमा करण्याचे आणि पैसे काढण्याची पद्धती सुरू करायची आहे. त्या दृष्टीने सहकार, वित्त व ग्रामविकास विभागाची काही यंत्रणा सध्या बसवलेली आहे का? जेणेकरून तिनही विभागाचा सुद्धा या बँकांवर काऊंटर चेक असावा असे समितीने सूचित केले असता, सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, ग्रामविकास विभागाच्या काही ठेवी आहेत. इतर विभागाच्या सुद्धा ठेवी आहेत. ह्या बँकामध्ये असलेल्या ठेवी आहेत. कोणाच्या ठेवी किती आहेत हे सर्व पब्लिक डोमेनमध्ये आहे.

बँकांच्या आर्थिक परिस्थितीवर नजर ठेवण्याचे काम आपल्या राज्य सरकारच्या तीनही विभागाकडून होत आहे किंवा नाही? लेखापरिक्षण अहवाल पाहून वेळोवेळी काम होते की, दरवर्षी होते? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जेव्हा जेव्हा नाबार्ड मार्फत तपासणी केली जाते. त्याचा अहवाल जिल्हा मध्यवर्ती बँकेला पाठविला जातो आणि शासन म्हणून सहकार आयुक्तांकडे पाठविला जातो. त्यांनी त्यांची मान्यता दिली आहे किंवा नाही याच्या बाबतीत सहकार आयुक्तांच्या वतीने या संबंधित बँकांना सुद्धा कळविण्यात येते. राज्य स्तरावर कृतीदल (टास्कफोर्स) आहे. त्याचे प्रधान सचिव (सहकार) हे त्या समितीचे सदस्य आहेत. नाबार्डचे सी.जी.एम. आणि आर.बी.आय. चे आर.डी.डी. व आयुक्त हे त्या समितीचे सदस्य आहेत. त्यामुळे ह्या सर्व बँकांचा दर दोन महिन्यांनतर आढावा घेतला जातो. त्यामुळे आता ही पद्धती स्थापित झाली आहे. आता ह्या सहा बँकांचा एकाच तारखेला एकाच वर्षाला सर्व रक्कम गोठण्याचे (Amount Freeze) कारण असे होते की, सन २०१२ मध्ये ४ टक्के सी.आर.ए.आर. अचिव्ह करायचा होता. तो या सहा बँकांनी केला नाही. त्यांना एक वाढीव मुदत दिली होती. त्या वाढीव मुदतीमध्ये देखील ह्या बँकांनी ४ टक्के सी.आर.ए.आर. अचिव्ह केला नाही. म्हणून आर.बी.आय. ने सहा बँकांसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. आता ती परिस्थिती पुढे येत नाही कारण ७ टक्के सी.आर.ए.आर. मेन्टेंन करण्यासाठी मार्गदर्शक सूचना आहेत. आता सर्व बँकांनी ७ टक्यांचा सी.आर.ए.आर. मेन्टेन केलेला आहे. त्यामुळे येथून पुढे सर्व गोष्टी क्लोजली मॉनीटर केल्या जात आहेत. त्यावेळेला एकदम असे घडण्यामागचे कारण आवश्यक सी.आर.ए.आर. साध्य न करणे हे होते.

यावर महालेखापालांनी अशी विचारणा केली की, योजनेचे पैसे येतात ते डायरेक्टली एखाद्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये ठेवावेत की, पब्लिक सेक्टर बँकेत ठेवावेत. याचा निर्णय एखाद्या योजनेसाठी विभागाकडून जेव्हा घेण्यात येतो तेव्हा सचिवालय सोडले तर खालच्या स्तरावरील जे अधिकारी आहेत. त्यामध्ये मंडळ स्तरावरील अधिकारी असतील किंवा डी.डी.ओ. असतील त्यांच्यामध्ये कितपत जागरुता आहे? विभागाकडून ज्या बँकेमध्ये सरकारी योजनेचे पैसे ठेवण्यात येतात. ती बँक खरोखर सुरक्षित आहे किंवा नाही. याबाबत पब्लिक डोमेनमध्ये माहिती दिल्याने ही माहिती प्रत्यक्षपणे त्यांच्यापर्यंत कशी पोहचते? ती पोहचायला हवी असे विभागास वाटत नाही का?

याबाबत सहकार विभागाच्या विभागीय प्रतिनिधींना सांगितले की, ह्या बँका सहकारी बँका आहेत. सहकार विभाग शासनाचा एक विभाग आहे. जर शासनाच्या प्रत्येक विभागाने आपले पैसे त्या बँकेमध्ये ठेवताना जर अशा प्रकारे सतत दक्षता बाळगू लागले तर ह्या बँकांमध्ये सामान्य लोक पैसे कशाला ठेवतील. मग बँका चालणार कशा? फक्त शासनाचा निधी बँकेमध्ये ठेवताना प्रत्येक विभागाने प्रत्येक योजनानिहाय अशी देखरेख असे करून एखाद्या बँकेत पैसे ठेवायचे की नाही ठेवायचे असा निर्णय करण्यात आला तर सहकारी बँका कशा चालणार? त्याच्यामुळे वेगळ्याने देखरेख करण्याची गरज नाही. कारण ज्या वेळेला प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली नाबार्ड आणि आर.डी.डी. सर्व देखरेख करत असेल तर काही बँका अडचणीमध्ये येत आहेत. त्या बँका अडचणीमध्ये येताच कामा नये. ती पुन्हा अडचणीमध्ये येऊ नये अशी ज्यावेळेला खबरदारी राज्य पातळीवरून घेतली जात असेल तर प्रत्येक विभागाने आपले पैसे ठेवायचे किंवा नाही ठेवायचे अशा प्रकारचा निर्णय करण्यात आला बँकेमध्ये जर का शासनाने पैसे एका बाजूला शासनाने ५५० कोटी रुपये बँक टिकून रहाण्यासाठी तीन बँकांमध्ये गुंताविले केले तसेच वेगवेगळ्या योजनांचे पैसे ठेवायचे की नाही ठेवायचे याबाबतीत प्रत्येक विभागातील अधिकारी दक्ष राहून काम करायला लागला तर लोकांच्या मनात शंका निर्माण होईल की, बँकेमध्ये पैसे ठेवावे की नाहीत. म्हणून हे प्रत्येक योजनानिहाय, प्रत्येक विभाग निहाय अशा पद्धतीने देखरेख करणे म्हणजे सहकारी बँकांना पुन्हा अडचणीत आणल्या सारखे होईल. त्यामुळे ज्यावेळेला शासनाच्या पातळीवरून देखरेख केली जात आहे. तेथे सर्व सी.आर.ए.आर. मेन्टेंन केला जातो. एन.पी.ए. मॉनेटरींग केले जात आहे. हे स्किम वाईज करण्याची गरज नाही.

यासंदर्भात सहकार विभागाच्या प्रतिनिधींनी माहिती दिली परंतु वित्त व ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी माहिती द्यावी असे समितीने सूचविले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद यांना पैसे भरण्यासाठी सहकारी बँक आणि राष्ट्रीयीकृत बँका या दोन्हीबद्दल मुभा दिलेली आहे. काही जिल्हा मध्यवर्ती बँकांची आर्थिक स्थिती बिघडल्यामुळे सन २०१४ मध्ये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र पाठविलेले आहे. पत्राच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असा उल्लेख केला की, 'वरील वस्तुस्थिती पाहता आपणास असे कळविण्यात येते की, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा निधीची रक्कम सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा व त्याबाबत योग्य वाटल्यास जिल्हा निधीचे खाते शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयीकृत बँकेत चालतात त्या बँकेत सुरू करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा.', असे दोन्ही पर्याय दिले.

यावर समितीने मत व्यक्त केले की, सर्व सहकारी बँका वाईट नाहीत. बँकांचा आढावा जिल्हा परिषदेच्या सी.ई.ओ. ला कसा घेता येईल? How he is empowered? त्याचा आधार कुठे आहे? अशी विचारणा समितीने केली असता सहकार विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, प्रत्यक्षात आता ठेवी ठेवणारा ग्राहक असला तर त्याच्या ठेवी कुठे ठेवायच्या याबाबत मार्केटमध्ये असणाऱ्या बँकांचा अंदाज घेण्यात येत असतो. आता राष्ट्रीयीकृत बँकामध्ये सुद्धा शासनाचे विविध विभाग पैसे ठेवत असतात. राष्ट्रीयीकृत बँकाचा आढावा घेण्यात येतो का? तसा आढावा घेता येत नाही. महालेखाकारांनी विभागाच्या बोलण्याकडे थोडे सहानुभूतीने पहावे. महालेखापाल प्रत्येक वेळी सहकार विभागाच्या बँकांचा आढावा घेत असताना शेरा मारत असतात, शेरा जरुर मारावा. परंतु सहकार विभागामध्ये ज्या बँकांची कार्यक्षेत्र आहे. सद्या राज्यामध्ये ज्या काही सुधारणा यापूर्वी झालेल्या आहेत. त्यामध्ये सहकार विभागाची, सहकार क्षेत्रामध्ये असलेली बँकांची अमुलाग्र भूमिका होती. ती भूमिका मान्य करावी लागेल. काही बँकांची परिस्थिती नाजूक आहे. हे मान्य करावे लागले. त्याचा अर्थ असा नाही की, ठेवी ठेवायच्या असतील तर त्या बँकाचा वार्षिक ताळेबंद पहावा, बँकांचा मागच्या वर्षीचा व्यवहार कसा आहे याची माहिती द्यावी.

याबाबत तसे करता येणार नाही. सहकार विभागाचे निरिक्षण ते ग्रामविकास विभागाला कळवावे, ग्रामविकास विभागाने तशा प्रकारचे निर्देश त्या संबंधित जिल्हा परिषदेला द्यावेत. अशी एक यंत्रणा तयार केली पाहिजे असे समितीने व्यक्त केले तसेच समितीने निदर्शनास आणून दिले की, सहकार विभागाच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बोर्डावर सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक सदस्य आहेत. जिल्हा उपनिबंधक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी हयांचा समन्वय जिल्हा स्तरावर असतो. त्यामुळे डेप्युटी रजिस्ट्रार यांना मुख्य कार्यकारी अधिकारी विचारु शकतात. मंडळावरील सदस्यांना दर दोन महिन्यांनी बोर्डाच्या मिटींगला जाणे आवश्यक असते याबाबत शासनाने कायदा केलेला आहे. मागच्या ६-७ बँकामध्ये अनुभव आला तेथे सुद्धा डीडीआर होते. मंत्रालय स्तरावरील वित्त, ग्रामविकास तसेच सहकार विभागाने पुढाकार घेतला पाहिजे अशी अपेक्षा महालेखापालकांनी व्यक्त केलेली आहे. या मताशी समिती देखील सहमत आहे. याबाबत बँकांच्या पुनरुज्जीवनासाठी सहकाराच्या भरवशावर वित्त विभाग फक्त पैसे घेत राहील असे बरोबर नाही.

यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सध्या ग्रामविकास विभागाकडून सीओंना स्थानिक बँकेची परिस्थिती बघून निर्णय घेण्याबाबत कळविले आहे.यासंदर्भात सहकार विभागाच्या प्रतिनिधीनी खुलासा केला की, राष्ट्रीयीकृत बँका आणि जिल्हा मध्यवर्ती बँका यातील कोणत्या बँकांमध्ये पैसे ठेवायचे. याबाबत स्थानिक माहितीच्या आधारे सीओंना वाटले की, जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थिती ठीक नाही तर त्यांनी तेथील पातळीवर निर्णय घ्यावा अशा प्रकारच्या सूचना आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्ह्याच्या सीईओंनी कशाच्या आधारावर निर्णय घ्यायचा. जर उद्या तेथे काही अडचण निर्माण झाली तर तेथील सीईओंना जबाबदार धरण्यात येईल. सहकार विभागाकडे नाबार्डचे लोक येतात. तसेच आरबीओचे लोक येत असतात. याची या समितीच्या अध्यक्षांना जेवढी जाणीव आहे तेवढी सीईओला कशी असणार आहे. याबाबत बैठक घेत असल्याने थोडी काळजी घेण्यात यावी. विभागाकडून दोन महिन्यांनी बैठक घेण्यात येते असे सांगण्यात आले. वित्त, सहकार किंवा ग्रामविकास विभाग यापैकी कोणताही विभाग असला तरी शासनाचा पैसा जिल्हा परिषदेकडे सुरक्षित असला पाहिजे. त्याचबरोबर बँकांचा सुद्धा कारभार चालला पाहिजे. राष्ट्रीयकृत बँकेतून शेतकऱ्यांना कर्ज मिळत नाही तर त्यांना फक्त जिल्हा मध्यवर्ती बँकेतून कर्ज मिळते. म्हणून जर आपण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार्य केले नाही तर ह्या बँका निश्चितच बंद होतील. या बँकेत गैरव्यवहार होऊ नये आणि कोणाचेही पैसे थकवू नयेत यादृष्टीने सूचना देण्यात याव्यात.असे समितीने सूचित केले असता सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिकारी व डीडीआर यांना सदर बँकांची आर्थिक परिस्थिती काय आहे हे माहिती नसते. आता प्रत्येक वर्षी ३१ मार्च रोजी नाबार्ड बँकांचे लेखापरिक्षण करीत असते. प्रत्येक वर्षी नाही केले तरी वर्षातून ७-८ बँकांचे लेखापरिक्षण केले जाते. प्रत्येक बँकेचे लेखापरिक्षण दोन वर्षातून एकदा होत असते. लेखापरिक्षण अहवालाप्रमाणे बँकांची ए, बी अशी वर्गवारी दिलेली असते. ज्या बँकेला ए ग्रेड दिलेली आहे त्या बँकेत ठेवी ठेवण्यास कोणत्याही प्रकारचा धोका नसतो अशा प्रकारची सूचना देता येते. परंतु प्रत्येक वर्षी या बँकांचे लेखापरिक्षण होत नाही. बँकेची वर्गवारी कशा प्रकारची आहे याबाबतचा सल्ला द्यायचा असेल तर राज्य शासन पातळीवरून कमिशनरकडून देण्याची सूचना देण्यात येत आहेत.

जर असे केले तर एका बँकेचा नंबर ५ वर्षांनी लागेल. लेखापरीक्षण दर दोन वर्षांनी करायला पाहिजे. अंतर्गत लेखापरिक्षण सहकार विभागाच्या माध्यमातून केले जाते काय? अशी विचारणा समितीने केली असता सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, तीन वर्षांनी लेखापरिक्षण केले जाते. या वर्षीपासून प्रत्येक बँकेचे लेखापरिक्षण केले जाते.

वित्त विभाग आणि ग्रामविकास विभाग यांनी सहकार विभागासोबत समन्वय करून राज्य सरकारच्या अखत्यारीत असलेल्या सर्व बँकांची परिस्थिती सांभाळली पाहिजे यादृष्टीने काळजी घेण्यात यावी. बँक बुडू नये यादृष्टीने प्रयत्न करायला पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाचे सचिव श्री.श्रीवास्तव यांनी ग्रामविकास विभागाला पत्र पाठविले. एखाद्या विशिष्ट बँकेचा जिल्हा परिषदेचा निधी बंधनकारक ठेवणे इष्ट नाही. बँक देत असलेली सेवा, बँकेतील ठेवी, बँकेतील गुंतवणूकीवर मिळत असलेले व्याज व सुरक्षीततेचा विचार करून जिल्हा निधी कुठे गुंतवावा याबाबत जिल्हा परिषदांनी निर्णय घेण्यास स्वातंत्र्य देणे अधिक संयुक्तिक राहील.

या पलीकडे जाऊन बँकेची वर्गवारी सहकार विभाग किंवा नाबार्डच्या माध्यमातून होत आहे. यामध्ये ए आणि बी वर्गामध्ये काही अडचण नाही. पण खालच्या वर्गाच्या (ग्रेडच्या) बाबतीत सखोल चौकशी करणे आवश्यक नाही तर सीओ किंवा खालच्या कॅफोवर सर्व जबाबदारी टाकून काही होणार नाही. शेवटी शासनाचे पैसे बुडतील. तेव्हा यादृष्टीने काही सुधारणा करण्याचे निर्देश ग्रामविकास विभागाकडून देण्यात यावेत असे समितीने सूचविले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी याबाबत निर्देश देण्यात येतील असे सांगितले

सीईओवर सर्व जबाबदारी टाकून काही होणार नाही. डीडीओला सुद्धा असे म्हणता येणार नाही की, बँकांची परिस्थिती खराब आहे. बँकांमध्ये जे काही गैरव्यवहार झालेले आहेत ते यापुढे होणार नाहीत याची दक्षता घेण्याची गरज आहे. विभागाला बँक सुद्धा चालवायची आहे आणि ग्रामीण जीवनाचा आर्थिक व्यवहार सुद्धा सुरळीत असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने बँकेला कामाचा आराखडा तयार करावाच लागतो असे मत समितीने व्यक्त केले.

जिल्हा परिषदेकडे बऱ्याच वेळा अशा अडचणी येतात की, हे पैसे कुणाकडे द्यावेत. शासनाच्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये पैसे ठेवावेत अशी सक्ती आहे. परंतु दुर्दैवाने काही बँकांमध्ये अडचणी आल्यामुळे हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाला. सरसकट असे म्हणता येणार नाही की, सर्वच बँकांचा कारभार खराब आहे. जर शासकीय यंत्रणा, आरडीडी किंवा जिल्हा परिषदेने आपल्या ठेवी जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये ठेवल्या नाही तर त्याचा परिणाम सामान्य माणसावर आणि इतर उद्योजक तसेच व्यापारी वर्ग या बँकांकडे शंकेने बघेल. नाहीतर यामध्ये धोका आहे आणि ग्राहकांना पैसे गुंतविणे धोक्याचे आहे. त्यामुळे असा निर्णय घेण्याबाबतचा शासन निर्णय थोडा अडचणीचाच होऊ शकतो. म्हणून सदर बँकेची वस्तुस्थिती काय आहे हे बघून आणि वरिष्ठांचा आदेश घेऊन निर्णय घेण्यात यावा. जिल्हा परिषदेचे सीईओ आणि एखादे डीडीआर यांनी त्या बँकेचा अहवाल द्यावा. त्यांचा अहवाल येईल त्याप्रमाणे निर्णय घेण्यात यावा. सुरूवातीचे धोरण आहे की, या बँकांमध्ये पैसे ठेवण्यापेक्षा को-ऑपरेटिव्ह बँकांमध्ये पैसे ठेवणे बंधनकारक ठेवावे. कारण हा निर्णय यापूर्वी घेतलेला आहे. या बँकांमध्ये पैसे ठेऊन खूप अडचणी झालेल्या आहेत. विशेषकरून नगरपालिका आणि महानगरपालिकांचे पैसे यामध्ये गुंतलेले आहेत. जिल्हा परिषदेला सक्ती असल्यामुळे जिल्हा मध्यवर्ती

बँकेमध्ये पैसे गुंतविते. ही ग्रामीण भागातील लोकांना विशेषतः लहान शेतकऱ्यांना मदत करणारी एकमेव यंत्रणा आहे. नॅशनल बँका छोट्या शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत. मोठ्या शेतकऱ्यांना व उद्योजकांना कर्ज देतात. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँका सक्षम आणि कार्यरत राहण्याच्या दृष्टीने आजची जी पद्धती आहे त्याचा निर्णय करीत असताना सीओंना जबाबदार न धरता मुख्य लेखा वित्तीय अधिकारी आणि डीडीआर यांचा एक वस्तुनिष्ठ अहवाल घेऊन सीओंनी त्यावर निर्णय घ्यावा असे समितीने सुचविले.

यामध्ये एक चांगली गोष्ट अशी की, बँकांचे दरवर्षी लेखापरीक्षण होत आहे. आरडीडी आणि वित्त विभागाला यांच्या सहमतीने यावर निर्बंध घालता येतील असे समितीने सूचित केले असता विभागाच्या सचिवांनी सांगितले की, वित्त सचिवांच्या अनुमतीने जी सूचना काढलेली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद सीओंना चांगल्या स्थितीत असलेल्या बँकांमध्ये ठेवी ठेवायच्या असतील तर विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे सर्व डीसीसी बँकांचे लेखापरीक्षण प्रत्येक वर्षी नाबार्डकडून होत असते. नाबार्डचे लेखापरीक्षण झाल्यानंतर आरसीएस आणि कमिशनर मिळून या बँकांकडे नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असते. ॲडव्हायझरीप्रमाणे जिल्हा परिषद सीओंनी कारवाई करायला काही हरकत नाही. अशा प्रकारची ग्रामविकास विभागाने सूचना देण्याची गरज आहे. डीसीसी बँकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास सुरूवात झालेली आहे. म्हणून याबाबत विश्वास ठेवण्याची गरज आहे. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये आरडीडीचे पैसे अडकलेले आहेत ते कधीही बुडणार नाहीत. जेव्हा या बँकेची परिस्थिती सुधारेल तेव्हा व्याजासकट पैसे परत केले जाणार आहेत. धुळे-नंदूरबार बँकेची २०१५च्या जुलै महिन्यात बैठक घेण्यात आली. त्यावेळेस त्यांनी सांगितले की, दर महिन्याला २५ लाख रुपये देऊन ६ कोटी रुपये जमा करण्यात येतील. मागच्या वर्षी एका वर्षात १४ कोटी रुपये परत केले. त्यांचा प्लॅन ६ कोटी रुपये परत करण्याचा होता. मागच्या दोन महिन्यात दोन कोटी रुपये परत केलेले आहेत. बँकांना याची जाणीव आहे की, जिल्हा परिषदेचे पैसे आणि जिल्हा परिषद चांगल्या स्थितीत ठेवली नाही तर बँक अडचणीत येऊ शकते याची जाणीव जिल्हा बँकांना झालेली आहे. म्हणून जेवढ्या लवकरात लवकर बँका पैसे परत करतील तेवढा त्यांचा बिझनेस वाढेल आणि बँक अडचणीतून बाहेर येईल. त्यामुळे भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

वसुली संदर्भात सहकार विभागाच्या सचिवांनी सांगितले की, धुळे-नंदूरबार डीसीसी बँकेमध्ये ३ कोटी रुपयांची मागच्या वर्षी वसूली झालेली आहे. मागच्या २-३ वर्षाची आकडेवारी राज्य शासनाने दिलेली आहे. बँक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी एकाच वेळेला ५१ कोटी रुपये देण्यात आले होते. या ५१ कोटी रुपयांपैकी ३५ कोटी रुपयांची वसुली झालेली आहे. व्यवहार चांगला झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने वसुली होते. अशाप्रकारची वसुली जालना बँकेची सुद्धा झालेली आहे. निधी दिल्यानंतर त्या निधीचा दुरुपयोग होत आहे, त्या बँकांचा काही उपयोग होत नाही असे नाही तर बँकांना चांगल्या प्रकारचा उपयोग होतो. लिक्वीडीटी आल्यानंतर बँक २-३ वर्षात यातून बाहेर पडत आहे.

सहकार विभागीय प्रतिनिधींना अधिक माहिती दिली की, या ९ बँकांच्या बाबतीत सन २०१२-२०१३ मध्ये व्याप्तीमध्ये (डिस्ट्रक्शनमध्ये) आल्या. त्यानंतर लागोपाठ चार वर्ष मराठवाड्यामध्ये दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे दरवर्षी कर्जाचे पुनर्गठन करण्यात येते आणि दरवर्षी वसूलीला स्थगिती देण्यात येत आहे. त्यामुळे पीक कर्ज किंवा दुसरी कोणतीही वसूली करता येत नसल्यामुळे या बँका अडचणीत आलेल्या आहेत. अन्यथा या बँकांनी आतापर्यंत पैसे वसूल केले असते आणि काही प्रमाणात परतफेड सुद्धा करून शकल्या असत्या. चालू वर्षाचे उत्पन्न चांगले असले तर बँकाकडून बऱ्याच प्रमाणात कर्ज वसूली करणे शक्य आहे.

## (अ) ग्रामविकास व जलसंधारण

### (ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, शालेय शिक्षण, नगर विकास, महसूल व वन विभाग)

**अभिप्राय व शिफारशी :**

**५.१ परिच्छेद क्र. २.२.२, 'पंचायत राज संस्थांच्या स्वतःच्या स्त्रोतांकडून झालेली कमी जमा' :**

विद्यमान अधिनियमांमध्ये म्हणजे, 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१' (ZP and PS Act) आणि 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८' (VP Act) सुधारणा करून राज्यात जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदा (ZPs), गट स्तरावर पंचायत समित्या (PSs) आणि गाव स्तरावर ग्राम पंचायत (GPs) यांचा समावेश असलेली पंचायत राज संस्थांची (PRIs) त्रिस्तरीय व्यवस्था प्रस्थापित करण्यात आली होती.

PRIs च्या जमांमध्ये केंद्र शासनाकडून (GOI) आणि महाराष्ट्र शासनाकडून (GOM) मिळणारे अनुदान आणि त्यांच्या स्वतःच्या स्त्रोतातून होणारी प्राप्ती संम्मिलित असते. PRIs च्या स्वतःच्या स्त्रोतात PRI स्तरावर जमा होणारी महसूली आणि GOM ने PRIs ना दिलेल्या महसूली हिश्श्याचा समावेश असतो. PRIs च्या स्वतःच्या महसूलात मालमत्ता कर, पाणी कर, विद्युत कर, सामान्य स्वच्छता उपकर, भाडेपट्टी इ. करांचा समावेश असतो. GOM ने मिळणाऱ्या महसूली हिश्श्यात जमीन महसूल उपकर, मुद्रांक शुल्क अनुदान, वन महसूल अनुदान, वाहन कर अनुदान, व्यवसाय कर अनुदान, अभिकरण शुल्क इत्यादींचा समावेश असतो. PRIs कडून जमांचा उपयोग विकास कामांसाठी आणि मुलभूत नागरी सेवा देण्यात सुधारणा करण्यासाठी केला जातो.

वर्ष २००९-१४ दरम्यान, ७५ GPs आणि २५ PSs सह ३३ ZPs पैकी आठ ZPs च्या दस्तऐवजांची, GOM कडून PRIs नां प्राप्त झालेली अनुदाने वेळेत प्राप्त झाली होती अथवा नाही, ती पर्याप्त होती अथवा नाही आणि कर आकारणी आणि संकलनाची प्रणाली कार्यक्षम होती अथवा नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी चाचणी तपासणी करण्यात आली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महालेखाकारांनी काढलेल्या आक्षेपामध्ये नमूद तक्त्यानुसार सन २००९ ते २०१४ दरम्यान झालेल्या एकूण प्राप्तीच्या तुलनेत पंचायत राज संस्थांच्या स्वतःच्या स्त्रोतातून झालेली प्राप्ती ही अत्यल्प म्हणजे ४.८४% होती. तर महाराष्ट्र शासनाकडून एकूण प्राप्तीच्या तुलनेत झालेली प्राप्ती ही ८५.५९% होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत. पंचायत राज संस्थांना अनुदान स्वरुपात शासनाकडून अधिक उत्पन्न मिळत असून त्यांचे स्वउत्पन्न कमी आहे. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने या संदर्भात दि. ३१/१२/२०१५ रोजी नवीन कर निर्धारणाच्या संदर्भात शासन निर्णय काढलेला आहे. यामुळे उत्पन्नाच्या टक्केवारीमध्ये वाढ होणार आहे काय? असे समितीने विचारले असता ग्रामपंचायतीमध्ये सुधारणा होणार असून त्यांचे उत्पन्न वाढणार आहे असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. नवीन इमारती बांधल्यानंतर तसेच उद्योगासाठी कर आकारणीची पद्धत वेगळी आहे. आकारण्यात आलेला कर ते लोक ग्रामसेवकाकडे जाऊन कर कमी करण्याचा प्रयत्न करीत असतात. **वास्तविक कर आकारणी ही कायद्यानुसार आवश्यक असून त्यात कर आकारणीची सामाईक पद्धती विहितच असणे आवश्यक आहे. हा कर कमी अथवा जास्त करण्याचे अधिकार अथवा मुभा कोणालाही असता कामा नये. सद्यःस्थितीत कर आकारणी समिती स्थापन असून त्यांना कर आकारणीचे अधिकार असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. कर आकारणीबाबतची प्रकरणे व अपील १५-१५ वर्षे प्रलंबित राहतात व त्यामुळे शासनाचा महसूल देखील बुडतो. हीच परिस्थिती पाणीपट्टीच्या बाबतीत देखील आहे. पंचायत राज संस्थांना असलेला शाश्वत निधीचा स्त्रोत वाढविण्यासाठी व नियमित करण्यासाठी शासनाने या संदर्भात एक सक्षम यंत्रणा निर्माण करावी व त्याचा समावेश कायद्यामध्येही करण्यात यावा, जेणेकरून कर आकारणी ही प्रकरणनिहाय व व्यक्तीनिहाय न करता एक सामाईक कार्यपद्धती अस्तित्वात आणावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.२ परिच्छेद क्र. २.२.३.१, 'व्यवसाय कर अनुदानात सुधारणा न करणे'**

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, उपजीविका आणि रोजगार कर कायदा,१९७५ (PT) च्या अंमलबजावणीचे प्रयत्न राज्यातील १५ जिल्ह्यांतील स्थानिक प्राधिकारी व्यवसाय कर आकारणीत होतो. व्यवसाय कर कायदा आल्यानंतर व्यवसाय कर आकारण्याचे अधिकार काढून महाराष्ट्र शासनाकडून त्यांना वार्षिक अनुदान प्रदान करण्याची तरतूद करण्यात आली. PT कायद्याची अंमलबजावणीची तीव्रता आधीच्या ३ वर्षाच्या कुठल्याही वर्षी स्थानिक प्राधिकरणाने संकलित केलेल्या जास्तीत जास्त रकमेवर या रक्कमेचे प्रगणन केले जाते व त्याआधारे महाराष्ट्र शासनाने एकूण वार्षिक अनुदानाची रक्कम रु. २७.४२ लक्ष ठरविली व दरवर्षी ती देण्यातही आली. परंतु लोकसंख्या/रोजगार यात वाढ झाल्यामुळे व्यवसाय कर संकलन अनेक पटीने वाढले असून सन २००९ ते २०१४ दरम्यान हे संकलन रु. ७,६१२.७८ कोटी इतके होते. परंतु या वाढीव

व्यवसायकराच्या प्रमाणात शासनाने व्यवसाय कर प्रदान न केल्यामुळे जिल्हापरिषदांना महसूल वाढीच्या लाभापासून वंचित राहावे लागले असा आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केला आहे. **वास्तविक २५ वर्षापूर्वी जे व्यवसाय कराचे संकलन होते ते आता १०० पटीने वाढले असतानाही अनुदान मात्र जुन्या आकारणीप्रमाणे देण्यात येत आहे. विभागाने वाढीव व्यवसाय कराच्या प्रमाणात वाढीव कर प्रदानाच्या रकमेची मागणी वित्त विभागाला केल्यानंतर वित्त विभागाने यास नकार दिला असला तरीही ही मागणी योग्य आहे व ती विभागाने केलीच पाहिजे असे समितीचे मत आहे. अनेक जिल्हापरिषदा व ग्रामपंचायती या आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे या कराचे प्रदान वाढीव दराने व नियमितपणे देण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे मत आहे. अतः या संदर्भात शासनाने थकीत व्यवसाय कराचे प्रदान तातडीने करावे व वाढीव व्यवसाय कराबाबत ठोस उपाययोजना करून योग्य निर्णय शासनस्तरावर घेवून आवश्यकता पडल्यास कायद्यात याबाबतची सुधारणा करावी तसेच देशात नव्याने लागू झालेल्या GST कायद्यामुळे या कर प्रणालीमध्ये बदल होणार असून या अनुदानाच्या रकमेचा पुनर्आढावा शासनाने घ्यावा व GST अंतर्गत राज्यास प्राप्त होणाऱ्या निधीच्या प्रमाणात जिल्हापरिषदांना अनुदान मिळणेबाबत आवश्यक ती पुढील उपाययोजना करण्यात यावी व संविधानाच्या ३६८ व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक संस्थांना प्राप्त झालेला स्वायत्त दर्जा व निधीचा नियमित स्त्रोत अबाधित ठेवावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

### ५.३ परिच्छेद क्र. २.२.३.२, 'मोटार वाहन कर अनुदानाची सुधारणा न करणे'

मुंबई मोटार वाहन कर कायदा,१९५८ च्या कलम ११ (२) (ब) नुसार या कायद्याच्या पुर्वीपासून वाहनावर जी टोल आकारणी होत होती ती दि. ३१/०३/१९५८ रोजी संपणाऱ्या ३ वर्षाच्या टोल संकलनाचा खर्च अधिक १० टक्के रक्कम वगळून येणारी रक्कम ही त्या स्थानिक मंडळाचे निव्वळ सरासरी वार्षिक उत्पन्न होते. जे शासनामार्फत प्रत्येक वर्षी स्थानिक मंडळास प्रदान करावयाचे होते. या कायद्याच्या अंमलबजावणी पूर्वी फक्त १४ जिल्हापरिषदा मोटार वाहन कराची आकारणी आणि संकलन करीत होत्या आणि त्यांचे एकूण वार्षिक संकलन रु. ५.४४ लक्ष होते. जे आजतागायत महाराष्ट्र शासनाने १४ जिल्ह्यांना वाटप केले. परंतु सन १९५८ पासून आजतागायत वाहनांच्या संख्येत झालेल्या वाढीच्या तुलनेत मोटार वाहन कराची वाढ निर्देशांकित केली गेली नसल्यामुळे वाढत्या महसूलाच्या लाभापासून या १४ जिल्हापरिषदा वंचित राहिल्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

या संदर्भात 'सदर मोटार वाहन कराच्या अनुषंगाने देण्यात येणारे रु. ५.४४ लक्ष एवढ्या अत्यल्प अनुदानाऐवजी राज्यभरातील सर्व जिल्हापरिषदांच्या कार्यक्षेत्रात जेवढा वाहन करापोटी महसूल जमा होतो त्याच्या २५ टक्के इतके अनुदान राज्यातील जिल्हापरिषदांना स्वनिधी म्हणून उपलब्ध करून देण्यात यावे असा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला होता. परंतु याबाबत वित्त विभागाने मोटार कर हे राज्याचे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असून इतके अनुदान पंचायत राज संस्थाना देणे शक्य नाही. राज्य वित्त आयोगाशी संपर्क साधावा. तथापि, प्रस्तावास संमती नाही' असे अभिप्राय देवून अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाने फेटाळला असल्याचे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे.

याअनुषंगाने विभागाने हा मुद्दा १४ व्या वित्त आयोगासमोर मांडला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. वित्त विभागाने जर यास मान्यता दिली नाही तर विभागाने Desending Note सोबत जोडून हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमारे मांडणे आवश्यक होते. प्रत्येक विषयाला वित्त विभागाने मान्यता दिलीच पाहिजे असे काही नाही. हा प्रस्ताव थेट मंत्रीमंडळासमोर येवून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, असे मत समितीने व्यक्त केले. **याबाबत विभागाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी. तसेच या पंचायत राज संस्थांना स्वनिधीच्या स्वरुपात एकत्रित रकमेचे प्रदान करून हे मोटार वाहन कर अनुदान बंद करण्याबाबतच्या पर्यायाचा देखील विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत सादर यावी अशी समितीची शिफारस आहे.**

### ५.४ परिच्छेद क्र. २.२.३.३, 'भविष्य निर्वाह निधी वाटपाच्या अनुदानाचे कमी वाटप'

ZPs च्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज प्रदानाचे दायित्व महाराष्ट्र शासनाचे आहे. आठ चाचणी तपासणी केलेल्या ZPs मध्ये असे आढळून आले की, सन २०१०-१४ दरम्यानचे कर्मचाऱ्यांच्या PF वरील व्याजापोटी रु. ७४४.७० कोटी अनुदान रकमेची मागणी ZPs ने महाराष्ट्र शासनाकडे केली गेली होती. तथापि, महाराष्ट्र शासनाने ही रक्कम रु. ४८३.४५ कोटी इतकी सिमित केली होती. परिणामी रु. २६१.२५ कोटी इतक्या PF वरील व्याजाच्या अनुदानाचे कमी वाटप झाले. तसेच, राज्याच्या ३३ ZPs शी संबंधित PF वरील व्याज अनुदानाची रक्कम रु. ८५३.२८ कोटी इतकी होती.

भविष्य निर्वाह निधीवरील व्याजाची रक्कम ही शासनाकडून दिली जाते व ही रक्कम कमी प्राप्त झाल्यामुळे अनुदानाचे कमी वाटप झाले हा मुख्य मुद्दा महालेखाकारांच्या आक्षेपात घेण्यात आला आहे. शासनाने सर्व जिल्हापरिषदांकरिता रु. ७०० कोटीची तरतूद केली होती. मात्र व्याजाची रक्कम ही त्यापेक्षा जास्त असल्यामुळे हा तुटवडा निर्माण झाला. वित्त विभागाकडे यासंदर्भात सुधारीत तरतूदीसाठी पाठपुरावा करण्यात येत

असल्याचे विभागीय प्रतिनिधींकडून सांगण्यात आले. हा भारीत स्वरुपाचा खर्च असल्यामुळे याचे केवळ महालेखाकार कार्यालयाकडून समायोजन करावयाचे आहे. परंतु त्या प्रत्येक जिल्हापरिषदेला ही रक्कम स्वतंत्रपणे समायोजित करणे आवश्यक असते. सन २०१० पासून हे समायोजन प्रलंबित असल्याचेही समितीस सांगण्यात आले. केवळ Book Adjustment चा हा विषय आहे. सन २०१० पूर्वी एकूण रकमेवर असे समायोजन केले जात होते. त्यामुळे तेव्हा बचत दिसून येत नव्हती. आता जिल्हापरिषदांच्या मागणीनुसार समायोजन केले जाते. त्यामुळे बचत दिसून येते. तसेच उर्वरित अनुदानाच्या संदर्भात रु. ११३७ कोटी रकमेची मागणी विभागाने केली असून त्या संदर्भातील पाठपुरावा वित्त विभागाकडे करण्यात येत असल्याचे देखील समितीसमोर सांगण्यात आले. मार्च अखेरीस सदर योजनेवर झालेल्या जमा व खर्च रकमेनुसार त्यावरील व्याजासाठी जिल्हापरिषदा मार्च नंतर महालेखापाल कार्यालयाकडे पुस्तकी समायोजनासाठी मागणी नोंदवितात. सुधारीत अंदाजामध्ये केलेली मागणी व प्रत्यक्ष महालेखाकार कार्यालयाकडे केलेली मागणी यामध्ये तफावत आढळते. महालेखापाल कार्यालय मार्च अखेरीस शासन निर्णयानुसार तरतूद समायोजित करीत असल्याने बऱ्याच जिल्हापरिषदांना मागणीप्रमाणे तरतूद मिळत नाही व काही ठिकाणी मागणी न केल्यामुळे अथवा कमी केल्यामुळे तरतूद शिल्लक राहते. सदर शिल्लक तरतूद महालेखापाल कार्यालय ज्या जिल्हापरिषदेला जादाचा निधी आवश्यक आहे त्यांना समायोजित करीत नसल्याने सदर योजनेवर बचत दिसून येते असल्याचे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे. वास्तविकतः जिल्हापरिषदेचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीधारक असल्याने त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने व्याज देण्याची देयता शासनाने स्वीकारलेलीच आहे. सन २००९ पर्यंत सर्व जिल्हापरिषदांची व्याज आकारणी करून त्यातील बजेटची तरतूद जरी रु. ७०० कोटी असली तरी ती सर्व रक्कम समायोजित करून उर्वरित रक्कम लोकलेखा समितीपुढे रेग्युलराईज होत होती. परंतु ही पद्धत चुकीची असल्यामुळे सन २००९ मध्ये वित्त विभागाने सुधारीत परिपत्रक काढून ही पद्धत थांबविली व त्याची अंमलबजावणी करणे हे विभागावर बंधनकारक आहे. तसेच हा खर्च भारीत स्वरुपाचा असतानाही यात वित्त विभाग कपात कसे काय करु शकते? असे महालेखाकारांनी आपेक्ष घेतले असता, विभाग मागणी करीत असते परंतु विभागाला पुरेशी तरतूद प्राप्त झाली नसून सद्य:स्थितीत रु. ११३७ कोटीची मागणी करण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. वित्त सचिवाना यासंदर्भात समितीने विचारले असता, प्रथम विभागाकडून प्रस्ताव येण्याची गरज आहे व विशेष प्रस्तावानुसार त्यावर निर्णय घेण्यात येतो. वास्तविक सन २००९ च्या वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार या मागणीचा प्रस्तावही कोषागार कार्यालयामार्फत येणे आवश्यक असतानाही मागणी जिल्हापरिषदेकडून थेट महालेखाकार कार्यालयाकडे करण्यात येते जे योग्य नाही, असे समितीने विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने ते मान्य केले व यासंदर्भात योग्य तो पाठपुरावा केला जाईल असे समितीला आश्वासित केले. बऱ्याच जिल्हापरिषदांना मागणीप्रमाणे तरतूद मिळत नाही तसेच काही जिल्हापरिषदांनी निधीची कमी मागणी केल्यामुळे तरतूद शिल्लक राहते. तसेच काही जिल्हापरिषदा ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यामध्ये ही मागणी करतात. या सर्व बाबी नियोजनाच्या अभावामुळे होत असल्याचे समितीला दिसून आले. त्यामुळे या निधीचे योग्य नियोजन शासनस्तरावरून करणे शक्य होत नाही. **(१) जिल्हापरिषदा व पंचायत समितीकडून मागण्यात येणारा निधी, कमी मागणीमुळे शिल्लक राहिलेला निधी, मागणी कोणत्या महिन्यात करायची व ग्रामविकास विभागामार्फत एकत्रित निधीची मागणी कधी करायची या सर्व बाबींसाठी शासनस्तरावर एक देखरेख यंत्रणा निर्माण करून त्याअनुषंगाने मार्गदर्शक सूचना सर्व जिल्हापरिषदा व पंचायत समितींना निर्गमित करण्यात याव्यात. पंचायत समिती व जिल्हापरिषद स्तरावर कॅफो व Account Officers ची यंत्रणा आता सक्षमरित्या कार्यरत आहे. त्यांचाही यामध्ये समावेश करून हा प्रश्न तातडीने सोडविण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) सन २००४ नंतर वेगळी पद्धत लागू झाल्यामुळे कॉंट्रीब्युटी पीएफ सुरू झाल्यामुळे या अडचणी आता येणार नाहीत. परंतु या प्रलंबित व्याजाच्या रकमेचे समायोजन तातडीने करण्याबाबतचा निर्णय दोन महिन्यात करण्यात यावा. त्यासाठी सॅपचे सॉफ्टवेअर घेऊन सर्व जिल्हापरिषदा मंत्रालयाशी संगणकीय पद्धतीने जोडण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत देण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

### ५.५ परिच्छेद क्र. २.२.३.४, 'मुद्रांक शुल्क अनुदानाचे कमी/विलंबाने वाटप करणे'

ZP आणि PS अधिनियमाच्या विभाग १५८ नुसार महाराष्ट्र शासनाने ZPs ना मुद्रांक शुल्क अनुदान अभिहस्तांकित करण्याची तरतूद आहे. महसूल विभागाकडून अचल मालमत्तांच्या व्यवहारांवर विहित दरापेक्षा एक टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्क ZPs ना मुद्रांक शुल्क अनुदाने म्हणून वितरित करण्यासाठी संकलित केला जातो. एकूण प्राप्त झालेल्या मुद्रांक शुल्क अनुदानापैकी ५० टक्के अनुदान ZPs कडे ठेवले जाते आणि उर्वरित ५० टक्के अनुदान हे GPs ना वितरित करण्यासाठी संबंधित PSs ना मुक्त केले जाते. PSs कडून GPs ना अनुदानाचे वाटप हे मागील वर्षात प्रत्येक GP च्या अखत्यारीत प्रत्यक्षात संकलित झालेल्या मुद्रांक शुल्काची जी यादी मुद्रांक विभागाकडून अग्रेषित केली जाते त्या आधारावर केले जाते.

निवड केलेल्या आठ ZPs पैकी चार ZPs मध्ये लेखापरिक्षेला असे आढळून आले की, वर्ष २००९-१४ दरम्यान या चार ZPs ना देय असलेल्या एकूण रु. ९३८.८२ कोटींपैकी फक्त रु. ७८९.०६ कोटीच शासनाने वाटप केले होते. परिणामी रु. १४९.७६ कोटी मुद्रांक शुल्क अनुदानाचे कमी वाटप झाले होते. तसेच ठाणे आणि परभणी ZP मध्ये सन २००९-१४ कालावधीसाठी महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या रु. १०८.७२ कोटी मुद्रांक शुल्क अनुदानांपैकी ५० टक्के (रु. ५४.३६ कोटी) ZPs कडून PSs ना पुढे संबंधित GPs च्या वाटपासाठी दिले गेले होते. तथापि, असे आढळून आले की, ZPs कडून फक्त रु. ५०.११ कोटी वाटप केले होते. परिणामी रु. ४.२५ कोटी अनुदानाचे PSs नां कमी वाटप झाले होते. मुद्रांक शुल्क विभागाकडून GP निहाय यादी प्राप्त झाली नव्हती आणि म्हणून रकमेचे वाटप केले जाऊ शकले नव्हते असे ZP परभणी यांचेकडून सांगण्यात येणे हे उत्तर स्विकारणीय नाही. कारण GPs नां अनुदानाचे वाटप करण्यासाठी जरी GOM कडून अनुदाने प्राप्त झाली होती. तरीही ZP कडून मुद्रांक शुल्क विभागाकडून यादी मिळविण्यासाठी कुठलीही कारवाई केली गेली नव्हती. तसेच आठ निवड केलेल्या ZPs पैकी चार ZPs मध्ये सन १९९६-२०१४ कालावधीशी संबंधित रु. ५४.४५ कोटी रक्कमेचे मुद्रांक शुल्क अनुदानाचे ZPs कडून PSs नां वाटप करण्यात ०१ ते १८ वर्षाचा विलंब झाला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

उपरोक्त आक्षेपाच्या अनुषंगाने समितीने साक्ष घेतली असता, सन २००९-१४ दरम्यान यवतमाळ, रायगड, हिंगोली व पुणे या चार जिल्हापरिषदांना प्रत्यक्षात रु. ११०५.४८ कोटी दिल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले व रु. ३१६ कोटी कमी देण्यात आले. यासंदर्भात बजेट तरतूद करण्याची मागणी केल्यानंतर IGR कडून एकत्रितपणे मागणी घेतली जाते व त्यानुसार बजेट तरतूद करून अनुदान उपलब्ध करून दिले जाते. महसूल विभागाकडून अचल मालमत्तेच्या व्यवहारावर विहित दरापेक्षा १ टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्क घेऊन ती रक्कम अनुदान म्हणून जिल्हापरिषदांना देणे आवश्यक आहे. अशाप्रकारे एकूण प्राप्त झालेल्या मुद्रांक शुल्क अनुदानापैकी ५० टक्के अनुदान जिल्हापरिषद व ५० टक्के अनुदान ग्रामपंचायत यांना वितरित करणे आवश्यक असते. परंतु ही रक्कम अद्यापपर्यंत वितरित न झाल्याचे समितीला दिसून आले. रु. ११०५ कोटी चा आकडा हा केवळ ४ जिल्ह्यांपुरता मर्यादीत आहे. मुद्रांक शुल्काचा व्यवहार झाल्यानंतर ताबडतोब हे पैसे जिल्हापरिषद व ग्रामपंचायतीना दिले पाहिजेत. परंतु तसे झाल्याचे दिसून येत नाही. मुद्रांक शुल्काच्या अनुदानाची रक्कम शासनाकडे प्राप्त होवून देखील जिल्हापरिषदांना ३ ते ४ वर्ष ती वाटप न होण्यामुळे जिल्हापरिषदा आर्थिक अडचणीत येतात. मुद्रांक शुल्काची रक्कम प्राप्त झाल्यानंतर ती रक्कम संबंधित जिल्ह्याला त्याच महिन्याच्या शेवटी हस्तांतरीत करण्यासाठी का वर्ग केली जात नाही? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्हानिहाय मुद्रांक शुल्क अनुदानाची किती रक्कम प्राप्त झाली ही माहिती मिळण्यास सन २०१२ पुर्वी कार्यप्रणाली सेंट्रलाईज (centralise) नसल्यामुळे अडचण येत होती. त्यामुळे ही आकडेवारी मॅन्युअली (manually) निश्चित होत होती. तसेच ५-५ वर्ष रि-कन्सीलीएशन (Reconcilliation) झालेले नसल्यामुळे ही रक्कम वेळेवर पाठविण्यास अडचणी येतात. ही वस्तुस्थिती आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सागितले.

**विहित तरतूद व कार्यपद्धतीनुसार रकमेचे प्रदान न झाल्यामुळे स्थानिक संस्था आर्थिक अडचणीत येणार नाही यासाठी व प्रक्रियेत सुधारणा होण्यासाठी शासनस्तरावरून एक मोहिम राबवून कालबद्ध योजना तयार करण्यात यावी. यासाठी राज्यातील अशाप्रकारच्या मुद्रांक शुल्काच्या अनुदानाची किती रक्कम प्राप्त झाली याची जिल्हानिहाय विभागणी करण्यात यावी व त्या माध्यमातून त्या त्या जिल्हापरिषदा व ग्रामपंचायतीना देय असलेल्या रकमेची निश्चिती तातडीने करण्यात यावी. यात मोठ्या प्रमाणात संगणकीय सॉफ्टवेअरच्या माध्यमातून हे काम केल्यास ते अधिक लवकर, अचूक व पारदर्शकपणे होऊ शकेल. सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या सेंट्रलाईज (centralise) कार्यप्रणालीमुळे मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम कंसोलीडेटेड फंडात (consolidated Fund) जमा होते व त्याची आकडेवारी ग्रामविकास विभागाला कळविली जाते. त्याआधारे रि-कन्सीलीएशन (Reconsolation) करून जिल्हापरिषदा व ग्रामपंचायतीना देय असलेल्या रकमा त्यांना देण्यात याव्यात. तसेच कॅफोकडून मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम देणे शिल्लक नसल्याबाबत तातडीने ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. जेणेकरून अनुदानाची रक्कम प्रलंबित असल्यास ती वितरित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. तसेच या ४ जिल्ह्यांसंदर्भात अनुदानाची रक्कम वितरित न केल्याबाबत अथवा ज्यांनी विलंब लावला आहे अशा संबंधिताना कारणे दाखवा नोटीस काढून खुलासा घेण्याबाबत विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले होते. त्याअनुषंगाने सुरू असलेली कार्यवाही तातडीने पूर्ण करून संबंधितांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीकडे एक महिन्याच्या आत सादर करावा व या मुद्रांक शुल्क अनुदानाच्या प्रलंबित रकमेच्या प्रदानाची व्यवस्था तातडीने व विनाविलंब करण्याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही शासनस्तरावर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.६ परिच्छेद क्र. २.२.३.५, 'वन महसूल अनुदानाची कमी प्राप्ती'**

ZP आणि PS अधिनियमाच्या भाग १८१ नुसार राज्य शासनाने याबाबत कायद्याद्वारे विनियोजन केल्यानंतर, प्रत्येक ZP ला दरवर्षी एक एप्रिल १९७२ पासून सुरू झालेल्या पंचवार्षिक कालावधीच्या त्वरित/अगदी लगतच्या आधीच्या तीन वित्तीय वर्षात जिल्ह्याच्या मर्यादामध्ये गोळा

झालेल्या वन महसूलाच्या सरासरी सात टक्के रक्कम द्यायची असते. चाचणी तपासणी केलेल्या ZPs च्या दस्तऐवजांवरून आणि वन विभागाने सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून आले की, सन २००९-१४ दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाकडून ZPs ना देण्यात येणाऱ्या वन अनुदानांची चुकीची निर्धारणा करण्यात आली होती. आठ चाचणी तपासणी केलेल्या ZPs पैकी पाच ZPs मध्ये GOM ने रु. ०.४१ कोटी रकमेचे वन महसूल अनुदानाचे अतिरिक्त वाटप केले होते तर तीन ZPs मध्ये रु. ६.७३ कोटी रकमेचे कमी वाटप केले होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र जिल्हापरिषद ॲक्ट १९६१ मधील कलम १८१ (अे) नुसार दरवर्षी जमा होणाऱ्या वन महसूल रकमेच्या सरासरी सात टक्के रक्कम सदर जिल्ह्याला दिली जाते. ज्या वर्षी महसूलाची रक्कम द्यावयाची असते त्याच्या मागील ३ वर्षी जो महसूल जमा झालेला असतो त्याची सरासरी काढून तेवढी मागणी वन विभागामार्फत ग्रामविकास विभागाकडे केली जाते व त्यानंतर हा निधी उपलब्ध होत असतो. या वन महसुलाचे मुख्य उत्पन्न स्त्रोत म्हणजे इमारत लाकडांचा लिलाव करून मिळणारी रक्कम, जळाऊ लाकडाचा लिलाव, बांबु, गवत, गौण, वनोपज यांच्या लिलावातून मिळणारे उत्पन्न यांचा समावेश असतो. तसेच इमारती लाकूड, बांबु इत्यादींची विक्री केल्यानंतर त्याअंतर्गत वनविकास कराच्या माध्यमातून मिळणारा १२ टक्के कर तसेच वन गुन्ह्यांमध्ये जो दंड वसूल केला जातो याचा देखील त्यात समावेश असतो. अशाप्रकारे महसुली उत्पनापोटी सन २०१०-११ मध्ये रु. २४१ कोटी ५४ लाख, सन २०११-१२ मध्ये रु. २६३ कोटी ३३ लाख, सन २०१२-१३ मध्ये रु. २५२ कोटी ७७ लाख, सन २०१३-१४ मध्ये रु. १८५ कोटी ६० लाख, सन २०१४-१५ मध्ये रु. २११ कोटी ९९ लाख, माहे सप्टेंबर,२०१५-१६ पर्यंत रु. ११५ कोटी ५७ लाख महसुली उत्पन्न प्राप्त झालेले आहे. परंतु अनेक कारणांमुळे हे महसूली उत्पन्न दरवर्षी कमी कमी होत आहे. कारण पूर्वी तेंदूपत्त्यापासून जो महसूल मिळायचा तो आता त्या मजूरांना बोनस स्वरुपात देण्यात येतो. तसेच पेसा कायद्याची अंमलबजावणी राज्यात सुरू झाल्यामुळे पेसा क्षेत्रात मिळणारा महसूल त्या ग्रामपंचायत व ग्रामसभेला मिळतो. तसेच बांबुपासून मिळणारे उत्पन्न सुद्धा पेसा क्षेत्रात त्या त्या ग्रामपंचायत व ग्रामसभेला मिळणार असल्यामुळे ह्या महसूलाची रक्कम राज्यस्तरावर येण्याऐवजी स्थानिक स्तरावर त्या त्या ग्रामपंचायतीना मिळणार आहे. त्यामुळे शासनाकडे प्राप्त होणाऱ्या महसूलाची रक्कम कमी झालेली दिसून येते. जिल्हापरिषद व ग्रामपंचायतीना प्राप्त होणाऱ्या या वन महसूल अनुदानाच्या रकमेतून वनीकरण करणे, सार्वजनिक मैदाने/बागा येथे झाडे लावणे, वन विभागातील रस्त्यांचे बांधकाम करणे, वैद्यकीय व रुग्णालयीन सेवा उपलब्ध करून देणे, पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच शाळेच्या इमारतींची व्यवस्था करणे इ. एकूण २४ प्रकारच्या कामांचा यात समावेश आहे. महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपात ६० टक्के अनुदानातून ५ जिल्हापरिषदांमध्ये रु. ०.४१ लक्ष जास्त व उर्वरित ३ जिल्हापरिषदांमध्ये रु. ६.७३ कोटी कमी अनुदान वितरित करण्यात आल्याचे नमूद आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता, वन विभागाने वर्षनिहाय व जिल्हापरिषदनिहाय संपुर्ण आकडेवारी तपासली असून त्यानुसार एकूण रु. ०.४१ लक्ष नाहीतर रु. ५ लाख ५४ हजार जास्त वितरित करण्यात आले आहेत, तसेच रु. ६ कोटी ७३ लाख कमी नाहीतर रु. ७७ लाख ९४ हजार कमी दिलेले आहेत अस समितीसमोर सांगण्यात आले. तसेच काही जिल्ह्यांना जास्त अनुदान का दिले याबाबत विभागाने अभ्यास केला असता सन २०१०-११ मध्ये रेग्युलर ग्रॅन्ट शिवाय पूरक मागणीद्वारे ५१ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद केली होती व ती सुद्धा जिल्हापरिषदांना वाटप करण्यात आली. ही रक्कम सन २००५-०६ ते सन २०१०-११ या कालावधीची आहे. कारण राज्य सरकार प्रत्येक वर्षी संपुर्ण रक्कम देत नाही व त्यामुळे प्रत्येक वर्षाचा हा गॅप भरुन काढण्यासाठी गेल्या काही वर्षी पुरवणी मागणीच्या माध्यमातून अनुदानाची मागणी केली जाते व त्यामुळेच ती अतिरिक्त असल्याचे दिसून येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या करातून वैद्यकीय व रुग्णालयीन सेवा उपलब्ध करून देणेबाबतची तरतूद दिसून येते. परंतु या निधीमधून डॉक्टरांच्या वेतनाचे प्रदान करता येत नसल्यामुळेही अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले व या संदर्भात योग्य तो निर्णय घेणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करणेबाबतही सुचित केले. या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही विभागाने करावी.

**उपरोक्त परिच्छेदासंदर्भात महालेखाकारांनी घेतलेले आक्षेप लक्षात घेता ज्या जिल्हापरिषदांना अनुदानाची कमी रक्कम देण्यात आलेली आहे त्यांना उर्वरित रक्कमेचे प्रदान तातडीने करण्यात यावे तसेच ज्या ठिकाणी रक्कमेचे अतिरिक्त प्रदान झाले आहे त्या रकमांचे पुढील आर्थिक वर्षात समायोजन करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. तसेच वन महसूल कमी होण्यामागील एक कारण वन उपजाची चोरी हे देखील आहे. ही चोरी थांबविली तर शासनाच्या महसूल उत्पन्नात देखील वाढ होऊ शकते. तसेच वन महसूल अधिक मिळणेसाठी वन उपजाचे जतन व संवर्धन जास्तीत जास्त प्रभावीपणे करण्यात यावे व वन संपत्तीवर सॅटेलाईटच्या माध्यमातून लक्ष ठेऊन असे प्रकार थांबविण्याबाबत व वन महसूलात वाढ करणेसाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

### ५.७ परिच्छेद क्र. २.२.३.६, इतर अनुदाने मुक्त न करणे

ZPs आणि PSs अधिनियमांतील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने जमीन महसूल उपकर, जमीन महसूल अतिरिक्त उपकर, प्रोत्साहन अनुदाने इत्यादी ZPs ना द्यावयाची असतात. लेखापरिक्षेला आढळून आले की, निवड केलेल्या आठ ZPs पैकी सहा ZPs मध्ये सन १९९४-२०१४ या कालावधीसाठी जरी रु. २११.१५ कोटी रक्कम ZPs ना देय होती तरी महाराष्ट्र शासनाने ते मुक्त केले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सहा जिल्हापरिषदांमध्ये जमीन महसूल वाढीव उपकरासाठी रु. २५.६२ कोटी वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच रु. ८१ कोटी २५ लाख जमीन महसूल उपकरासाठी व रु. ७५,९९९ अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही सुरू असून यात नेमका बॅकलॉग किती आहे यासाठी सन २०१२ मध्ये मोहिम सुरू केली असून त्यावेळी रु. १२५३.७७ कोटी थकीत होते व विभागाने प्रयत्न करून रु. ११०६ कोटी उपलब्ध करून दिले आहेत. अजून रु. ८१ कोटी जिल्हापरिषद सेस व रु. ६६ कोटी गौण खनिज असा निधी वितरित करणे बाकी आहे, असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. **हा निधी वितरित करण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

### ५.८ परिच्छेद क्र. २.२.३.७, अभिकरण शुल्काची कमी प्राप्ती

ZP आणि PS अधिनियमाच्या विभाग १२३ बरोबर १९९९ च्या शासन निर्णयासह राज्य शासनाने ZPs ना प्रकल्प खर्चाच्या पाच टक्के रक्कम त्याच्या कार्यान्वयनासाठी किंवा अशा कामाच्या देखभालीसाठी किंवा योजनेच्या विकासासाठी राज्य शासनाच्या वतीने अभिकरण शुल्क म्हणून द्यावयाची असते. आठ चाचणी तपासणी केलेल्या ZPs मध्ये लेखापरीक्षेला असे आढळून आले की, सन १९९२-२०१४ या कालावधीत संबंधित महाराष्ट्र शासनाकडून देय असलेल्या रु. २१.२९ कोटींपैकी या आठ ZPs ना फक्त रु. ९.९० कोटी रक्कमच प्राप्त झाली होती. परिणामी रु. ११.३९ कोटी कमी प्राप्त झाले होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

जिल्हापरिषदेला ICS, Bio Gas इ. योजनांसाठी निधी प्राप्त होत असतो व त्यांचे ५ टक्के ETP चार्जेस असतात व ते सुद्धा कमी प्राप्त झाल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. अभिकरण शुल्क हे कृषि विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग, महिला व बालकल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग, पशुसंवर्धन विभाग, जलसंधारण विभाग यांचेकडून येत असून अभिकरण शुल्काची एकंदर रु. ३२ कोटी येणे बाकी असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. तसेच आता नवीन योजना अस्तित्वात असून त्यामध्ये असे केले जात नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. परंतु असे असले तरीही जुन्या योजनांची जी रक्कम बाकी होती ती त्या त्या विभागांना दिली पाहिजे असे मत समितीने साक्षीदरम्यान नोंदविले. **अतः महालेखाकारांनी घेतलेले आक्षेप लक्षात घेता अभिकरण शुल्काची रक्कम तातडीने त्या त्या जिल्हापरिषदांना देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

### ५.९ परिच्छेद क्र. २.२.३.८, विद्युत शुल्क अनुदानाची प्राप्ती न होणे

शासनाच्या ग्रामविकास विभागाने पारित केलेल्या (ऑगस्ट, २००९) शासन निर्णयानुसार GPs नी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर (RWSS) खर्च केलेल्या विद्युत शुल्काच्या ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती महाराष्ट्र शासनाने ZPs/PSs द्वारे GPs ना करावयाची असते. ७५ चाचणी तपासणी केलेल्या GPs च्या वार्षिक लेख्यांची तपासणी केली असता असे आढळून आले की, २९ GPs मध्ये सन २००९-२०१३ दरम्यान RWSS वर रु. ५.११ कोटी इतका विद्युत शुल्काचा खर्च करण्यात आला होता. तथापि, GPs ने खर्च केलेल्या एकूण खर्चाच्या ५० टक्के (रु. २.५६ कोटी) अनुदानापैकी मार्च, २०१४ पर्यंत GOM कडून चार GPs ना फक्त रु. ०.११ कोटी रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आली होती. उर्वरित २५ GPs नी संबंधित PSs/ZPs द्वारे GOM कडे रु. २.४५ कोटीची मागणी केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

उपरोक्त आक्षेपानुसार ग्रामपंचायतींनी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर खर्च केलेल्या विद्युत शुल्काच्या ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती शासनामार्फत झालेली नाही. राज्यात अनेक पाणीपुरवठा योजना सद्यःस्थितीत बंद पडलेल्या आहेत. त्यातील अनेक योजना केवळ विद्युत शुल्क न भरल्यामुळे बंद आहेत. असे असताना या शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती शासनामार्फत न झाल्यामुळे या पाणीपुरवठ्याच्या योजना अधिकच अडचणीत येत आहेत. सद्यःस्थितीत १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून पाणीपुरवठ्याची देयके भरण्याची मुभा देण्यात आलेली आहे. वास्तविक ज्या ग्रामपंचायतींमध्ये या पाणीपुरवठ्याच्या योजना सुरू आहेत त्यांना योजनांची बिले भरण्याची सक्तीच केली पाहिजे. अन्यथा या सर्व योजना बंद झाल्यानंतर त्या सुरू करणे कठीण होऊन जाते, असे मत समितीने व्यक्त केले. याबाबत अधिकची माहिती घेण्याचा साक्षीदरम्यान प्रयत्न केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती व त्या माध्यमातून विद्युत शुल्क देणे याच्या गाईडलाईन्स् पाणीपुरवठा विभागाने

निर्गमित केलेल्या आहेत. ह्या योजनेअंतर्गत गावाला देण्यात येणारी ही रक्कम हे अनुदान नसून पाणीपुरवठ्यासाठी राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमामध्ये त्या त्या वर्षात जो निधी प्राप्त होईल त्याच्या १५ टक्के रक्कम जिल्हापरिषदांनी त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जमा करावी व त्यातून त्या जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या योजनांकरिता देखभाल व दुरुस्तीसाठी त्याचा वापर करावा. तसेच त्यातील ५० टक्के रक्कम शक्यतो त्यांनी योजनेच्या विद्युत देयकांसाठीच वापरावी अशी सूचना पाणीपुरवठा विभागाने दिली होती. परंतु गत २ वर्षांत केंद्र सरकारकडून या पेयजल कार्यक्रमांतर्गत जेवढा निधी अपेक्षित होता त्यापेक्षा फार कमी प्रमाणात निधी आल्यामुळे निधीचे वितरण कमी झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. काही ठिकाणी तर १५ टक्के रक्कम सुद्धा ठेवण्यात आली नाही. वास्तविक पाणीपट्टी वसूली करून योजना चालविण्याची जबाबदारी ही ग्रामपंचायतींची असते. तसेच विद्युत शुल्क हे विशेष अनुदान नसून देखभाल व दुरुस्तीसाठी तयार केलेली एक व्यवस्था असून हा निधी देणे शासनाला बंधनकारक आहे. जो काही निधी उपलब्ध असेल त्यातून हा खर्च ग्रामपंचायतींनी करावा असे मत विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान विदित केले. एकीकडे ज्या ग्रामपंचायती पाणीपट्टी नियमित भरतात त्यांना कुठलेही प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येत नाही. तसेच दुसरीकडे ज्या ग्रामपंचायती अजिबात पाणीपट्टी भरत नाहीत त्यांचेवर कुठलीही कार्यवाही शासनामार्फत होत नाही. ही कार्यपद्धती शासन व्यवस्थेमध्ये चुकीचा संदेश देणारी ठरते. अशा योजना राबविताना विभागाचे मॉनिटरींग देखील कमी पडते व यासंदर्भात कडक धोरण आखण्याची आवश्यकता असल्याचे मतही समितीने व्यक्त केले. या योजना व्यवस्थित राबविण्याचा शासनाचा मानस असला तरीही जोपर्यंत जिल्हापरिषदांचे परफॉर्मन्स ऑडीट होत नाही तोपर्यंत योजनांचे व त्याच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन होऊ शकत नाही. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत निधी कमी प्राप्त झाला तर तो वितरणाचे निकष काय? अशी समितीने विचारणा केली असता या पुढे १५ टक्के निधी जो ग्रामपंचायतीला द्यायचा आहे तो वसूलीशी निगडीत करून ज्यांची वसूली ८० ते ९० टक्के पेक्षा जास्त असेल त्यांनाच ही १५ टक्के रक्कम द्यावी, जेणेकरून वसूलीसाठी एक प्रोत्साहनात्मक चालना देखील मिळेल. तसेच या योजनेच्या अंमलबजावणीच्या कामाचे विकेंद्रीकरण करण्यात आले असून ते अधिकार आता खालच्या स्तरापर्यंत दिले आहे. परंतु अद्यापही अशाप्रकारचे काम हाताळण्यासाठी खालच्या स्तरावर सक्षम यंत्रणा नसून तसेच यासाठी आवश्यक असलेला प्रशिक्षित कर्मचारी वर्ग देखील ग्रामपंचायतींकडे नसणे. केवळ महाराष्ट्रात औद्योगिक पाणीपुरवठा, शहरी पाणीपुरवठा, ग्रामीण पाणीपुरवठा या तीन योजनांसाठी तीन वेगवेगळे विभाग कार्यरत आहेत. त्यामुळे एकाच प्रकारच्या या कामामध्ये कुठेही एकसंघता राहत नसून अनेक ठिकाणी निर्णयात विसंगती देखील दिसते. ही व्यवस्था बदलून पाणीपुरवठ्यासाठी केवळ जिल्हापरिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे दोन स्तरच ठेवले पाहिजेत. तसेच पदे भरण्याकरिता बंदी असल्यामुळे या पाणीपुरवठा सारख्या महत्त्वाच्या योजनांकरिता प्रशिक्षित कर्मचारी वर्ग उपलब्ध होवू शकत नाही. पाणी टंचाई असलेल्या भागावर तर याचा अधिकच परिणाम होतो. तसेच पाणीपुरवठा योजनांच्या माध्यमातून आकारण्यात येणारे विजेचे शुल्क हे खुप जास्त असल्यामुळे काही ग्रामपंचायती ही देयके भरू शकत नाहीत. हा दर देखील कमी करण्याची आवश्यकता असल्याचे मत समितीने व्यक्त केले. **अतः शासन निर्णयामध्ये १५ टक्के निधी देण्याची तरतूद करण्यात येणे, परंतु दुसरीकडे हा निधी देणे बंधनकारक नसल्याचेही मत विभाग व्यक्त करीत आहे. अशा परिस्थितीत शासन निर्णयामध्ये ही तरतूद करण्यास काय अर्थ शिल्लक राहतो? निधी देणेबाबतचा हा शासन निर्णय सन २००९ चा असून त्यानुसार महालेखाकारांनी आक्षेप घेतलेले आहेत. सन २०१४ मध्ये पुन्हा एकदा सूचना काढून ही मार्गदर्शक सूचना असून ती बंधनकारक नाही असे त्यात नमूद केलेले आहे. सन २०१४ नंतर शासनावर हा निधी देणे बंधनकारक नसेल परंतु, सन २००९ च्या शासन निर्णयानुसार सन २०१४ पर्यंत जी काही थकबाकी असेल ती वित्त विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून घेवून ग्रामपंचायतींना तातडीने वितरित करण्यात यावी तसेच पाणीपुरवठा योजनांसाठी आकारण्यात येणाऱ्या विजेच्या दराचाही पुनर्विचार शासनाने करावा व व्यावसायीक दराऐवजी घरगुती उपयोगासाठीचे दर घेण्यात यावे. यासंदर्भात विद्युत नियामक आयोगाकडे पाठपुरावा करावा व ग्रामीण क्षेत्राकडे या योजना रहिवासी क्षेत्रामध्ये येत असतांना देखील वीज देयके मात्र व्यावसायिक दराने पाठविण्यात येतात. अतः यासाठी घरगुती उपयोगाचे दरच विचारात घेण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**५.१० परिच्छेद क्र. २.२.३.९, अ-प्राधिकृत नगरपालिकांकडून प्राथमिक शिक्षण अंशदानाची प्राप्ती न होणे**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण कायदा, १९४७ मधील तरतुदींनुसार प्रत्येक अ-प्राधिकृत नगरपरिषदेने ZP ला त्या नगरपालिका क्षेत्रातील मालमत्तेच्या पट्टीयोग्य मूल्याच्या वार्षिक ५ टक्के इतकी रक्कम प्राथमिक शिक्षण अंशदान म्हणून प्रदान करणे आवश्यक असते. निवड केलेल्या आठही ZPs मध्ये लेखापरिक्षेला असे आढळून आले की, नगरपरिषदांकडून प्राथमिक शिक्षण अंशदान वसूल केले नव्हते. चार ZPs मध्ये सन १९७३-७४ ते सन २०१३-१४ या कालावधीतील रु. ९.५२ कोटींची रक्कम नगरपरिषदांकडून देय होती ती वसूल केली नव्हती. उर्वरित चाचणी तपासणी केलेल्या चार ZPs मधील तीन ZPs नी (हिंगोली, परभणी आणि यवतमाळ) वर्ष २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत संबंधित नगरपरिषदांकडे कधी मागणीच केली नव्हती. ZP, रायगड यांनी जरी या मागणीचा पाठपुरावा संबंधित नगरपरिषदांकडे (कर्जत नगर परिषद) डिसेंबर, २००५ पासून केला होता. तरीही, नगरपरिषदेने त्यांच्या अखत्यारित असलेल्या मालमत्तांचा तपशील सादर न केल्यामुळे ZP कडून अंशदान निर्धारित केले जाऊ शकले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण कायद्यातील तरतुदीनुसार अ-प्राधिकृत नगरपरिषदेने जिल्हापरिषदेला त्या नगरपालिका क्षेत्रातील मालमत्तेच्या पट्टीयोग्य मूल्याच्या वार्षिक ५ टक्के इतकी रक्कम प्राथमिक शिक्षण अंशदान म्हणून प्रदान करणे आवश्यक असताना हा निधी का देण्यात आला नाही अशी समितीने विचारणा केली असता, सन २०१३ नंतर हा निधी देणे क्रमःप्राप्त राहिलेला नसून विभागाने ही पद्धत आता बंद केली असून हा कायदाच आता बदललेला आहे. परंतु सन २०१३ च्या अगोदरची रक्कम देणे मात्र आवश्यक आहे. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ खाली १४ जिल्हे आहेत. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, पुणे, नाशिक या जिल्ह्यात तो लागू आहे. त्यात काही अ-प्राधिकृत नगरपालिका आहेत म्हणजे तेथे शाळा त्यांना नाही तर जिल्हापरिषदेला चालवायच्या आहेत व त्यांच्या उत्पन्नातून काही जिल्हापरिषदांना द्यावयाच्या रकमेचा शॉर्टफ्लो आहे, असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. मुंबई प्राथमिक शिक्षण कायद्यात प्राधिकृत नगरपालिका व अ-प्राधिकृत नगरपालिका असा फरक केलेला आहे. प्राधिकृत नगरपालिकेचे त्यांच्या क्षेत्रातील शाळांवर नियंत्रण असते व ज्या ऑथोराईज नाहीत त्या सर्व नॉन-ऑथोराईज असल्याचे कायद्यात म्हटले आहे व त्यांच्या शाळांवर जिल्हापरिषद देखरेख ठेवते. कायद्यातील तरतुदी पाहिल्या तर काही नगरपालिकांचे त्यांच्या कोणत्याही शाळेवर नियंत्रण नाही, त्या नॉन-ऑथोराईज आहेत असा खुलासा नगर विकास विभागाच्या सचिवांनी केला. याबाबत महालेखाकारांनी असे नमूद केले की, महालेखापालांचा आक्षेप हा फक्त अ-प्राधिकृत नगरपालिकांच्या बाबतचा असून ज्या अ-प्राधिकृत नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये या शाळा आहेत. त्यांचे अनुदान शासनाने दिले पाहिजे. त्यांच्या शाळेची जिल्हापरिषद देखभाल करते आणि त्यामुळे जिल्हापरिषदेला त्यांचे एकूण रेटेबल मूल्याच्या वार्षिक ५ टक्के इतकी वसूली देणे अभिप्रेत आहे. आता ह्या १४ जिल्ह्यांच्या थकबाकीच्या वसूलीबाबत विभागाचे काय मत आहे अशी समितीने विचारणा केली असता कायद्यातील तरतूद व परिपत्रकातील तरतुदीनुसार नगरपरिषदेचे दायित्व त्या त्या नगरपरिषदांना देणे क्रमप्राप्त आहे. **एखाद्या नगरपरिषदेने जिल्हापरिषदेला त्यांच्या देय दायित्वाचा भरणा केला नसेल तर त्यांनी त्याचा भरणा तात्काळ करावा अशी सूचना सर्वच नगरपरिषदांना देण्यात याव्यात व नगर विकास विभागाने जिल्हापरिषदांना जी रक्कम देणे प्रलंबित आहे ती तातडीने देण्यात यावी व नगरपरिषदेने जर हा निधी जिल्हा परिषदेला दिला नाही तर नगरविकास विभागाने हा निधी नगरपरिषदेला देय असलेल्या निधीतून कपात करून जिल्हा परिषदेला तो देण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

### ५.११ परिच्छेद क्र. २.२.४.१, महसूलाची निर्धारणा, आकारणी आणि संकलन कराची थकबाकी

VP अधिनियमातील तरतुदीनुसार पाणी आकार, मालमत्ता कर, सार्वजनिक स्वच्छता उपकर, पथदिव्यांवरील कर इत्यादी विविध कर GPs कडून आकारले व संकलित केले जातात. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, GPs विविध करासंबंधीच्या चालू मागणीच्या वसूलीची तसेच थकबाकीची माहिती आपल्याकडे ठेवत नव्हते. परिणामी थकबाकीची कालावधीनिहाय स्थिती आणि वसूलीवर झालेला परिणाम निश्चित करणे अवघड होते. आठ चाचणी तपासणी केलेल्या ZPs मध्ये मार्च २०१४ ला पाणी आकाराची रु. ५१.०३ कोटी थकबाकी होती जे एकूण मागणीच्या ३८ टक्के होते. तसेच मार्च, २०१४ ला इतर कर संकलनाची थकबाकी जसे मालमत्ता कर, सार्वजनिक स्वच्छता उपकर, पथदिव्यांवरील कर इत्यादी रु. ३२.५१ कोटी इतकी होती आणि जी एकूण मागणीच्या १० टक्के होती असे आक्षेप महालेखकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. **या परिच्छेदामध्ये ग्रामपंचायतीने पुरेशा प्रमाणात कर वसूल केलेला नसून मागणी पेक्षा कराची रक्कम कमी आहे असे दिसून येते. महालेखापाल यांनी घेतलेल्या उपरोक्त आक्षेपासंदर्भात शासनाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करून केलेल्या कारवाई बाबतची माहिती समितीस सादर करावी. १४ व्या वित्त आयोगानुसार ठरविण्यात आल्याप्रमाणे पुढील वर्षापासून १० टक्के वसूली वाढल्याशिवाय त्यांना प्रोत्साहनपर अनुदान मिळणार नाही या निकषांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच या संदर्भात लेखापरीक्षण करणे बंधनकारक करून यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

### ५.१२ परिच्छेद क्र. २.२.४.२, भ्रमणध्वनी मनोऱ्यांवरील कराची न आकारणी

ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार (ऑक्टोबर, २००६), GPs नी त्यांच्या सीमेत उभारलेल्या व्यावसायिक भ्रमणध्वनी मनोऱ्यांवर विहित दरांनी कर आकारणे आवश्यक होते. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, तीन PSs अंतर्गत ४४ GPs मध्ये सन २००५-१४ या कालावधीसाठी ७८ भ्रमणध्वनी मनोऱ्यांवरील कर निर्धारणा केली नव्हती. परिणामी रु. २२.८७ लाख कर रकमेची वसूली झाली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

उपरोक्त आक्षेपाच्या अनुषंगाने समितीच्या असे निदर्शनास येते की, मोबाईल टॉवरच्या संदर्भात कुठेही पुरेशी वसूली झालेली नसून वसूलीत दिरंगाई दिसून येते. यासंदर्भात विभागाने काय कार्यवाही केली अशी समितीने विचारणा केली असता, वसूलीच्या सूचना विभागामार्फत निर्गमित करण्यात येतात. जिल्हापरिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतीने वसूलीच्या संदर्भात पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. **महालेखापालांनी त्यांच्या परिच्छेदात आक्षेप घेतल्यानंतर व विभागामार्फत वसूलीच्या सूचना निर्गमित झाल्यानंतरही ग्रामपंचायती पैसे वसूल करू शकत नसतील तर विभागाच्या सूचनांना कोणताही अर्थ शिल्लक राहत नाही. या मोबाईल**

**टॉवरच्या कराची वसूली बरोबर झाली तर १० टक्के इंन्सेसिव्ह दिला जाईल व १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत देय असलेल्या प्रोत्साहन भत्याच्या निकषामध्ये मोबाईल टॉवरच्या वसूलीचा देखील समावेश करणेबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही व्हावी. तसेच मोबाईल टॉवरच्या संख्येमध्ये व करापोटी जमा करावयाच्या रकमेमध्ये विभाग व महालेखाकार यांच्यात तफावत दिसून येते. महालेखाकार यांच्या म्हणण्यानुसार रु. १७.७९ लाख ही वसूलीची रक्कम निश्चित करण्यात आली असून विभागाच्या माहितीनुसार केवळ रु. ७.७९ लाख रक्कम दिसून येते. ही तफावत तात्काळ दूर करण्यात यावी. राज्यातील ग्रामीण क्षेत्रातील टॉवरबाबत सक्तीने रक्कम वसूल करण्यात यावी. विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांनी मोबाईल टॉवरबाबत चुकीची माहिती दिली, तसेच शासन निर्णयानुसार कर आकारणी न करता ती कमी दराने केली या संदर्भात जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस १ महिन्याच्या आत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**५.१३ परिच्छेद क्र. २.२.५, संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रणे**

जमांचे योग्य लेखांकन, लेखे तयार करणे आणि दस्तऐवजांची देखभाल इ. योग्य पद्धतीने होते अथवा नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी परिणामकारक संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रणे आवश्यक आहेत. PRIs मधील संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रण कमकुवत होते, जे खाली दर्शविले आहेत :—

चाचणी तपासणी केलेल्या सर्व ७५ GPs मध्ये रोख रक्कम आणि लेखे ग्रामसेवक हाताळत होते जे महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या विरुद्ध आहे. अशा व्यवस्थेमुळे GPs मधील निधींच्या दुर्विनियोगाची / अफरातफरीची शक्यता बळावते.

मार्च, २०१४ ला आठ ZPs मध्ये १९५८ पासून १०५७ ग्रामसेवक / २५० सरपंचांविरुद्ध रु. ४९.८७ कोटी रकमेची ४३८७ प्रकरणे निपटाऱ्यासाठी प्रलंबित होती. ZPs आपल्याकडे दुर्विनियोगाच्या प्रकरणांची वर्षनिहाय माहिती ठेवत नव्हते. त्यामुळे लेखापरीक्षेला वर्ष २००९-१४ दरम्यान किती प्रमाणात दुर्विनियोजन झाले होते हे निश्चित करणे अवघड होते, यात ZP, पुणे मात्र अपवाद होती जिथे वर्ष २००९-१४ दरम्यान रु. २.३३ कोटी रक्कम संम्मिलीत असलेली ६२ दुर्विनियोजनाची प्रकरणे दिसून आली. तसेच आठ चाचणी तपासणी केलेल्या ZPs पैकी सहा ZPs मध्ये वर्ष २००५-१२ दरम्यान रु. ६०५२ कोटी रक्कम सम्मिलीत असलेली अफरातफरीची ४४ प्रकरणे आढळून आली होती. अफरातफर झाल्याचा शोध लागल्याच्या तारखेपासून प्रथम माहिती अहवाल (FIR) ४० ते ८४ महिन्यांच्या विलंबाने नोंदविला गेला.

PS, जव्हार (जि. ठाणे) आणि PS औंधा (जि. हिंगोली) येथे वर्ष २००९-१४ दरम्यान इंदिरा आवास योजने अंतर्गत १८३४ घरे बांधण्यात आली होती. या घरांची निर्धारण वहीत नोंद घेऊन निर्धारण वही अद्यावत न केल्यामुळे ही घरे मालमत्ता कर आणि पाणी कराची निर्धारणा करण्यातून वगळली गेली. PS, जिंतूर (जि. परभणी) अंतर्गत GP, अंबरवाडी येथे जरी निर्धारणा वही ठेवण्यात आली होती. तरीही वर्ष २००१-०२ पासून मालमत्तेची निर्धारणा करण्यात आली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

विहित ७५ ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकच रोख रक्कम आणि लेखे देखील हाताळत होते. असे करणे महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या विरुद्ध असून या व्यवस्थेमुळे ग्रामपंचायतीच्या निधीचा दुरुपयोग किंवा गैरव्यवहाराची शक्यता बळावते अशी विचारणा समितीने केली असता, ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक हा एकटाच असल्यामुळे अशी परिस्थिती उद्भवते. विभाग ही पद्धत आता बदलत असून ग्रामसेवकांनी बँक सिस्टीम आणि आयटी इंटिग्रेट करून कॅश हॅन्डल करू नये व रोजची रोख रक्कम त्याच दिवशी बँकेत जमा करावी असा प्रस्ताव ठेवून विभाग हा प्रश्न हळू हळू सोडवित असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर विदित केले. विभागाने भविष्यासाठी नवीन पद्धत प्रस्तावित करणे ही चांगली गोष्ट आहे परंतु महालेखाकारांच्या आक्षेपासंदर्भात काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून सातत्याने वसूली करण्यात येत आहे, काही प्रकरणे अत्यंत जुनी असून वसूलीसाठी देखील अडचण येत असल्यामुळे तसेच विभागाकडे कर्मचारी वर्ग नसल्यामुळे काही प्रकरणे वगळण्याची आवश्यकता असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले असता, या प्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने मत व्यक्त केले असता, खुप जुन्या प्रकरणांमध्ये तत्कालिन कर्मचाऱ्यांचा तसेच कागदपत्रांचा शोध लागत नसल्यामुळे कार्यवाही करण्यास अडचण येत असल्याचे सांगण्यात आले. तसेच आता नवीन दुरुस्तीनुसार लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत तर संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना रु. २५,००० दंड प्रस्तावित करण्यात आल्यामुळे यावर प्रतिबंध बसू शकेल. असे असले तरी **६ जिल्हापरिषदांमध्ये सन २००५ ते २०१२ या कालावधीत अफरातफरीच्या ४४ प्रकरणांमध्ये रु. ६,०५२ कोटी अडकले असतानाही दोषींवर एफआयआर दाखल करण्यामध्ये ४ ते ७ वर्षांचा विलंब लावलेला आहे. या प्रकरणांमध्ये तातडीने एफआयआर दाखल केला असता तर याचा इतरांवर वचक बसला असता. तसेच ज्यांनी हा विलंब केला त्यांचेवर काय कारवाई करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता, त्याबाबतची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात घेण्यास सुरुवात केली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. ही सर्व प्रकरणे शासनाने तातडीने निकाली काढून दोषींवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## (ब) ग्रामविकास व जलसंधारण

### (ग्रामविकास/सहकार विभाग)

**अभिप्राय :**

**६.१ परिच्छेद क्र. २.३, शासकीय निधीची अडवणूक**

सहा जिल्ह्यांमधील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी वित्तीय स्थिती घसरत असतांना सुद्धा महाराष्ट्र शासनाने या बँकांमधील ठेवी दुसऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये स्थानांतरित करण्याची प्रतिबंधक कारवाई त्वरित न केल्यामुळे रु. ५२०.७५ कोटी निधीची अडवणूक झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १३०, पोट कलम ३ च्या खंड (b) नुसार जिल्हापरिषद आणि पंचायत समितींना त्यांचा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवण्याची मुभा दिलेली आहे. दुर्देवाने वर्धा, उस्मानाबाद, नागपूर, नंदूरबार, बुलढाणा, धुळे या सहा बँका आर्थिक अडचणीत आल्यामुळे जिल्हापरिषदेचा निधी या बँकांमध्ये अडकून पडला ही वस्तुस्थिती असल्याचे विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान मान्य केले. विदर्भातील नागपूर, वर्धा व बुलढाणा या तीन बँकांचे एफडी अकाऊंट व सी.आर.ए.आर. मेंटेन्ट न केल्यामुळे आरबीआय ने त्यांचे लायसन्स रद्द केले. परिणामी या सर्व बँकांचे आर्थिक व्यवहारावर प्रतिबंध घालण्यात आला. या बँका आर्थिक अडचणीत असल्याच्या सूचना जिल्हापरिषदांना विलंबाने पोहोचल्यामुळे या रकमा बँकेतून काढून घेणे शक्य झाले नाही, परिणामी शासनाचे मोठ्या निधीचे नुकसान झाले.

अशा बँकांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी भागभांडवलासाठी मदत मिळण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन, केंद्र शासन आणि नाबार्ड यांच्यामध्ये झालेल्या अंतर्गत करारानुसार या तीन बँकांना रु. ५२० कोटी शासनाने दिले. त्यानंतर या तीन बँकांचे लायसन्स परत मिळाले. हळूहळू आता या सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आर्थिक अडचणीतून बाहेर पडत असून विभागाच्या प्रयत्नाने आतापर्यंत जवळजवळ रु. १९० कोटी जिल्हापरिषदांना परत मिळाल्याचे व उर्वरित रक्कम टप्प्याटप्प्याने वसूल करण्याचे काम सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

"त्या वर्षी या बँका आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता असल्यामुळे जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हापरिषदांची रक्कम सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा व त्याबाबत योग्य वाटल्यास जिह्याच्या निधीचे खाते, शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयकृत बँकेत चालतात त्या बँकेत सुरू करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा" असे शासनस्तरावरून सर्व जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्राद्वारे कळविण्यात आले. परंतु तो पर्यंत या बँकांवर आरबीआयद्वारे अधिरोध जारी केल्यामुळे चार पैकी तीन बँकांचे व्यवहार ठप्पच होते. नाबार्डचे निरिक्षण विभागाकडे व मुख्य सचिवांकडे आल्यानंतर विभागाने याकडे तीन वर्ष लक्ष दिले नाही. जेव्हा बँका पूर्णपणे डबघाईला आल्या त्यावर्षी शासनस्तरावरून सूचना निर्गमित करण्यात आल्या. या बाबींकडे वेळीच लक्ष देऊन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असत्या तर ही परिस्थिती आली नसती. एकीकडे कायद्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये निधी ठेवण्याबाबतची तरतूद दिसून येते. परंतु बँक डबघाईला निघाली तर हा शासनाचा संपूर्ण निधी अडकून पडण्याची भितीही दुसऱ्या बाजुने असते. अशा परिस्थितीत योग्य निर्णय कोणता? हे ठरविण्याचा आधार काय? व हे तपासण्यासाठी कोणती यंत्रणा जिल्हापरिषदेकडे आहे? तसेच घेतलेला निर्णय भविष्यात जिल्हापरिषदेच्या हिताचा न ठरल्यास केवळ संबंधित जिल्हापरिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार धरण्याची शक्यता व भिती या सर्व अडचणींमुळे अशाप्रकारचे निर्णय स्थानिक अधिकाऱ्यांच्या पातळीवरून शक्यतोवर घेणे धाडसाचे, जोखीमीचे व अत्यंत जबाबदारीचे ठरते.

अशा परिस्थितीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये निधी ठेवण्यातच येऊ नये यासंदर्भात जेव्हा तत्कालिन मा.मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक झाली त्यावेळी सर्व जिल्हा बँकांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले की, असा निर्णय घेतला तर सर्व बँका आर्थिक अडचणीत येतील. सर्वच बँका अडचणीत नाहीत त्यामुळे असे निर्बंध सर्वच बँकांवर सरसकट लादणे हे अन्यायकारक ठरेल. त्यामुळे सुरक्षिततेसाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या व्यवहारावर शासनाच्या माध्यमातून बंदी घालण्याऐवजी जी जिल्हा बँक सध्या अडचणीत आहे त्या बँकेमध्ये निधी ठेवू नये असा निर्णय घेण्यात आला.

एकीकडे शासनाचा निधी मोठ्या प्रमाणात या जिल्हा बँकांकडे ठेवण्यात येतो. परंतु जिल्हापरिषदेचा निधी कोणत्या बँकेत ठेवावा हा निर्णय एका व्यक्तीवर सोपविणे योग्य ठरणार नाही. या बँकांची आर्थिक स्थिती स्थानिक पातळीवरील यंत्रणेला अवगत असेलच असे नाही. यासाठी शासनस्तरावर कठोर सामायिक यंत्रणा किंवा कार्यपद्धती अस्तित्वात असण्याची आवश्यकता असून त्याचे निकष देखील ठरविणे क्रमःप्राप्त आहे. विभागाकडून ज्या बँकांमध्ये शासनाचा निधी ठेवण्यात येत आहे ती बँक खरोखर सुरक्षित व आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा नाही ही माहिती

शासनस्तरावरून स्थानिक स्तरापर्यंत जाणे आवश्यक आहे. एकीकडे शासनाच्या प्रत्येक विभागाने हा निधी या बँकांमध्ये ठेवताना दक्षता घेणे आवश्यक आहे तर दुसरीकडे शासनानेच या बँकांवर अविश्वास दाखवून या बँकामध्ये असलेला निधी काढून राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये टाकण्यास सुरुवात केली. तर सामान्य नागरिक देखील या बँकांबाबत शंका उपस्थित करतील व या बँकांमध्ये पैसे ठेवणार नाहीत. मग सुस्थितीत असणाऱ्या बँका देखील आर्थिक अडचणीत येतील. त्यामुळे शासनाचा निधी ठेवण्यासाठी बँकेची निवड करण्याचा निर्णय हा अतिशय संवेदनशील व नाजूक विषय असून यातून जनतेचा विश्वास व शासनाचे हीत हे दोन्ही हेतू साध्य करण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. कोणतीही बँक असली तरी शासनाचा निधी सुरक्षित असला पाहिजे. हे उद्दिष्ट समोर ठेवून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे हे जाळे नष्ट करून देखील चालणार नाही. राष्ट्रीयीकृत बँकेकडून शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्ज मिळत नाही. बहुतांश जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज मिळते. म्हणून या बँकांना सुरळितपणे सुरू ठेवण्यास सहकार्य केलेच पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे. फक्त अशा बँकांमध्ये निधीचा गैरव्यवहार किंवा आर्थिक अनियमितता होऊ नये याची पुरेपुर काळजी घेण्याची आवश्यकता आहे. काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची आर्थिक स्थिती अद्यापही चांगली आहे. त्यामुळे या सर्व बँकांचा विचार एकाच पातळीवर ठेवून करता येणार नाही. अशा बँकांचे मूल्यमापन करून त्यांचेवर नियंत्रण ठेवण्याची कोणती यंत्रणा शासनाकडे उपलब्ध आहे अशी विचारणा समितीने केली असता, ज्या आर्थिक अडचणीत आलेल्या बँका आहेत त्यांना निधीची मदत करून त्यांचे बँकेचे व्यवहार सुरू करण्यात आलेले आहेत. जसजशी या बँकांची आर्थिक परिस्थिती सुधारेल तसतशी त्यांच्याकडून रक्कम वसूल देखील होत आहे. डबघाईला आलेल्या अनेक बँकांनी शासनाचा निधी मोठ्या प्रमाणात परत केलेला आहे व या बँकांना पुनरुज्जिवीत करून त्यांचा सी.आर.ए.आर. वाढविण्याचा प्रयत्न देखील करण्यात येत आहे. यासाठी एका कृतीदलाची (Task Force) देखील स्थापना केलेली आहे. या कृती दलामध्ये रिजनल डायरेक्टर, आरबीआय, सहकार सचिव, सहकार आयुक्त आणि नाबार्डचे काही अधिकारी यांचा समावेश असून बँकांच्या व्यवहारांचे मॉनीटरींग दर दोन महिन्यांनी यांच्यामार्फत करण्यात येते. आरबीआय चे रिजनल डायरेक्टर हे या कृती दलाचे चेअरमन आहेत. या कृती दलाने प्रत्येक दोन महिन्यांनी आढावा घेऊन बँकांनी मागच्या दोन महिन्यांमध्ये काय कार्यवाही केली, किती कर्ज दिलेले आहे, वसुली किती आहे, दिलेले कर्ज योग्य आहे किंवा नाही या सर्व बाबींची देखरेख करते. सेफ गार्ड, सेफ्टी मॅक्यॅनिझम ठेवले असल्यामुळे पैशाचा गैरवापर होण्याची शक्यता आता बरीच कमी झालेली आहे. शासनाने आता या बँका अडचणीतच येणार नाहीत ही काळजी अधिक घेतली पाहिजे. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या बोर्डावर सहकार विभागाचे जिल्हा उप निबंधक सदस्य आहेत. जिल्हा उपनिबंधक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समन्वय जिल्हास्तरावर असतो. तसेच मंडळावरील सदस्यांना दर दोन महिन्यांनी बोर्डाच्या मिटींगला जाण्याची तरतूदही कायद्यातच केलेली आहे. त्यामुळे बऱ्यापैकी या बँकांच्या व्यवहारावर नियंत्रण आलेले आहे. त्यातच दरवर्षी नाबार्ड या बँकांचे लेखापरीक्षण करीत असते. लेखापरीक्षण अहवालाप्रमाणे बँकांची 'ए', 'बी', 'सी' अशी वर्गवारी केलेली असते. ज्या बँकेला 'ए' ग्रेड दिलेली आहे त्या बँकेत पैसे ठेवण्यास कोणत्याही प्रकारचा धोका नसतो. अशाप्रकारे या सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे व्यवहार सुरळितपणे सुरू करण्याचा शासनस्तरावरून प्रयत्न करण्यात येत असल्याचे समितीसमोर विभागीय सचिवांनी सांगितले.

**शिफारशी :**

**६.२ राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व त्यामध्ये शासनाचा ठेवण्यात आलेला निधी हा अत्यंत नाजूक विषय असून तो नियमानुसार, परिस्थतीनुसार, निधीच्या सुरक्षिततेचा विचार करून हाताळणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाचा निधी सुरक्षित ठेवण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये हा निधी ठेवण्यात येऊ नये. गैरसोय होईल असा सरसकट निर्णय शासनाने घेणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे असा निर्णय शासनाने घेतला तर या सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची व्यवस्था व जाळे नष्ट होईल व या बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा व कर्ज मिळणार नाही. त्यामुळे एकीकडे शासनाच्या निधीची सुरक्षितता तसेच दुसरीकडे या बँकांचे आर्थिक व्यवहार सुरळित ठेवणे अशी दुहेरी जबाबदारी शासनाने पार पाडणे आवश्यक आहे. शासनाचा निधी या बँकेत ठेवावा किंवा ठेवू नये असे थेट आदेश शासनस्तरावरून निर्गमित करण्यापेक्षा या निर्णयाप्रत येण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांना मदत होईल अशी सक्षम यंत्रणा शासनस्तरावर उभी करण्याची आवश्यकता आहे. बँकांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन निधी गुंतविण्याचा निर्णय घेण्याचे काम केवळ एका अधिकाऱ्यावर सोपवून चालणार नाही. बँकांच्या आर्थिक परिस्थितीचे मूल्यमापन करण्याची कुठलीही व्यवस्था जिल्हापरिषदेच्या स्तरावर उपलब्ध नसते. अतः प्रत्येक वर्षी या बँकांचे जे लेखापरीक्षण होत असते त्याआधारे करण्यात आलेल्या वर्गवारीचा अहवाल हा शासनामार्फत स्थानिक पातळीपर्यंत सर्व स्तरावर शासनाने पोहचविण्याची व्यवस्था करावी व त्याआधारे निधीची गुंतवणूक करण्याची कार्यपद्धती, निकष व मार्गदर्शक तत्वे शासनस्तरावरच विहित करून देण्यात यावीत व त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यासाठी जिल्हापरिषद स्तरावर मुख्य लेखा वित्तीय अधिकारी आणि डीडीआर यांचा वस्तुनिष्ट अहवाल घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यावर निर्णय घ्यावा व बँक देत असलेली सेवा, बँकेतील ठेवी, बँकेतील गुंतवणुकीवर मिळत असलेले व्याज, सुरक्षिततेचा विचार करून जमा निधी कुठे गुंतवावा याबाबतचा**

**निर्णय जिल्हापरिषदांनी घ्यावा. तसेच असा निधी गुंतविताना मागील वर्षाच्या ऑडीटमध्ये बँकेची वर्गवारी 'अ' असेल तर त्यांना प्राधान्य देण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्वसामान्य जनतेची फसवणूक होऊ नये या कारणास्तव बँकेसंदर्भातील त्या आर्थिक वर्षात निश्चित केलेल्या वर्गवारीचा अहवाल त्या त्या बँकेच्या शाखेमध्ये सहज दिसू शकेल अशा दर्शनी भागात दर्शवावा व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**६.३ (२) महालेखाकारांनी आक्षेपात नमूद केलेल्या रकमांची वसूली जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून करून घेणेसंदर्भात कडक कारवाई शासनाने करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## नगरविकास विभाग

**७.** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २०१३-२०१४ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ५.२ 'टाळता येण्याजोग्या कमिशन भुगतान' यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहे :—

**७.१ परिच्छेद क्र. ५.२, टाळता येण्याजोग्या कमिशन भूगतान :**

**(BPCL) ने आयात केलेल्या क्रुड तेलावरील जकातीच्या संकलनात MCGM अपयशी ठरल्यामुळे २०१०-१३ दरम्यान कमिशनपोटी रुपये १०१.३२ कोटी टाळत्या येण्याजोगे प्रदान केले गेले.**

मुंबई महानगपालिका कायदा १८८८ च्या कलम १९२(१) अंतर्गत, मुंबईच्या हद्दीत रस्ते, रेल्वे, समुद्र, आणि वायुमार्गाने प्रवेश केलेल्या वस्तुंवर जी वापरासाठी किंवा विक्रीसाठी आणली आहे त्यावर जकात कर आकारला जातो.

भारत पेट्रोलियम कॉपेरिशन लिमिटेड BPCL समुद्रमार्गे क्रुड तेलाची आयात मुंबईच्या हद्दीत करीत होते आणि त्यांचे तेलाचे टँकर्स हे मुंबई पोर्ट ट्रस्ट (MbPT) अंतर्गत असलेल्या इंदिरा गोदीत नांगरून ठेवत असत या कारणाकरिता BPCL, बृहन्मुंबई महानगर पालिकेला (MCGM) आयात केलेल्या क्रुड तेलावर जकात कर देत होते.

लेखापरीक्षेला असे अढळून आले की, BPCL कडून MCGM ला दिल्या जाणाऱ्या जकात कर प्रदान करण्याची व्यवस्था/प्रणाली किचकट होती. इंदिरा गोदीत जकात करासाठी नियुक्त असलेल्या MCGM कर्मचाऱ्यांकडून जकात कर रकमेचे निर्धारण झाल्यानंतर, BPCL जकात करांचे धनादेश MbPT च्या खिडकीवर जमा करीत होती. MbPT त्यानंतर हे जकात करांचे धनादेश MCGM च्या SBI च्या खात्यात जमा करीत असे. अशा प्रकारे MbPT ही MCGM ची संकलन एजंट म्हणून काम करीत होती ज्या साठी MCGM Mbpt ला एकूण संकलित केलेल्या जकात कराच्या रकमेवर ३% कमिशन प्रदान करीत होती. वर्ष २०१०-१३ दरम्यान MCGM ने MbPT ला कमिशन पोटी रु. १०१.३२ कोटी प्रदान केले होते.

MCGM ने MbPT ला कमिशनपोटी प्रदान केलेले रु. १०१.३२ कोटी रक्कम खालील कारणामुळे टाळता येण्याजोगी होती.

**ज्ञापन :**

**७.२** महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

इंदिरा गोदी/ मुंबई पोर्ट ट्रस्ट क्षेत्रा बाहेरील बंदरावरून/जागेवरून मुंबईत आयात होणाऱ्या गॅसवर BPCL जकात कराचे अधिदान धनादेशाद्वारे परस्पर MCGM ला करीत आहे. परदेशातुन BPCL ने आयात केलेल्या क्रुड तेलावर जकातीचे संकलन MbPT मुंबई महापलिकेच्या वतीने स्थायी समिती ठराव क्रमांक १६४१ दिनांक २४ नोव्हेंबर १९५४ नुसार करीत होती. परंतु मुंबई महानगरपालिकेले BPCL शी पत्र व्यवहार करून जकातीची रक्कम MCGM ला परस्पर भरण्यास केलेल्या विनंतीस होकार देऊन दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पासून मुंबईत आयात केलेल्या क्रुड ऑईलवरील जकात कराचे अधिदान धनादेशाद्वारे परस्पर MCGM ला करीत आहे व दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पासून BPCL ने मुंबईत आयात केलेल्या क्रुड ऑईलवर ३% कमिशन MbPT कडे जमा करण्याचे MCGM ने बंद केले आहे.

संबंधित कालावधी २०१०-१३ मध्ये ई-अधिदान शक्य नव्हते कारण जकात खात्याचे संपूर्ण संगणीकीकरण दिनांक ०१ ऑगस्ट २०११ पासून झाले आणि त्या पुढील वर्षी ई-पोर्टल कार्यरत झाले. परंतु आयातदारांच्या ई-पोर्टल विषयी बऱ्याच तक्रारी येत होत्या. व BPCL चा ई-अधिदाना बाबत प्रतिसाद नव्हता.

मुंबई महानगरपालिका कायद्यातील तरतुदी व जकात नियमावलीनुसार जकात कराची आगाऊ वसूली करण्याचे अधिकार MCGM ला नाहीत.

जकात नियमावली नियम क्रमांक २८ नुसार आयातदारांना (ठराविक कालावधी) जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीत आयात होणाऱ्या मालाच्या जकाती नुसार MCGM कडे अनामत रक्कम ठेऊन चालू लेखा सुविधा (Account Current Facility) घेता येते. BPCL हा भारत सरकारचा सार्वजनिक क्षेत्रातला उपक्रम असल्यामुळे चालू लेखा सुविधा घेण्यासाठी MCGM ने केलेल्या विनंतीस कायदेशीर बाबीमुळे अनामत रक्कम ठेऊ शकत नसल्यामुळे नकार दिला यामुळे पुर्वीची MBPT द्वारे जकात वसूलीची व्यवस्था सुरू होती.

तिसरा पर्यायाबाबत चर्चा व पत्रव्यवहार अतिरिक्त महापलिका आयुक्तांकडून डिसेंबर, २०१० मध्ये करण्यात आला व पुढील चर्चा/ पत्र व्यवहार मुंबई महानगरपालिकेने BPCL शी करून जकातीची रक्कम MCGM ला परस्पर भरण्यास केलेल्या विनंतीस BPCL ने होकार देऊन दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पासून मुंबईत आयात केलेल्य क्रुड तेलावर जकात कराचे अधिदान धनादेशाद्वारे परस्पर MCGM ला करीत आहे व दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पासून BPCL ने मुंबईत आयात केलेल्या क्रुड तेलावर ३% कमिशन Mbpt कडे जमा करण्याचे MCGM ने बंद केले आहे.

**सदर ज्ञापनाच्या अनुषंगाने महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :**

(१) मुंबई महानगरपालिकेमार्फत अन्य इतर कोणत्या कराच्या वसूलीसाठी त्रयस्त पक्षाला कमिशन देण्यात येते का?

(२) मुंबई महानगरपालिकेच्या इतर महसुलाबाबतीत त्रयस्थ पक्षाला देण्यात येणारे कमिशन टाळण्याकरीता महानगरपालिकेमार्फत कोणती यंत्रणा शोधली आहे काय?

**महालेखापाल कार्यालयाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने स्पष्टीकरण :**

मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना जकातीच्या रकमेवर देण्यात येणाऱ्या ३ टक्के कमिशन व्यतिरिक्त अन्य इतर कोणताही महसूल गोळा करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत त्रयस्थ पक्षाला कोणतेही कमिशन देण्यात येत नाही. त्यामुळे कमिशन टाळण्याकरीता महानगरपालिकेमार्फत कोणतीही यंत्रणा शोधण्याचा प्रश्न उद्धवत नाही.

मुंबईत समुद्र मार्गाने येणाऱ्या मालावर जकात घेण्यासाठी व जकात चुकवेगिरी टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई पोर्ट ट्रस्ट यांची जकात एजंट म्हणून ३% कमिशनवर नेमणुक केली आहे. मालावरील जकातीचे निर्धारण जकात अधिकारी करतात व त्या प्रमाणे मुंबई पोर्ट ट्रस्ट योग्य ती जकात जमा करते व एकूण जमलेल्या जकातीवर ३% कमिशन स्वतःकडे ठेऊन ९७%जकातीची रक्कम बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या तिजोरीत जमा करते. ही व्यवस्था स्थायी समिती मध्ये मंजुर झालेला ठराव क्रमांक १६४१ दिनांक २४ नोव्हेंबर १९५४ पासुन कार्यरत आहे.

BPCL परदेशातून क्रुड तेलाची आयात करते त्यावर MbPT मुंबई महानगर पालिकेच्या वतीने जकात संकलन करते व त्या जकातीवर ३% कमिशन स्वतःकडे ठेऊन ९७% मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा करते. ही व्यवस्था वरील स्थायी समितीच्या ठरावा नुसार १९५४ पासून कार्यरत आहे.

इंदिरा गोदी MbPT क्षेत्राबाहेर BPCL ने आयात केलेल्या गॅस/क्रुड तेलावर BPCL MCGM ला जकात कराचे धनादेशा द्वारे परस्पर प्रदान करते.त्यामुळे त्रयस्थ पक्षाने (MbPT) आयात केलेल्या आणि MbPT त नांगरलेल्या (ठेवलेल्या) सामानावर, जकात कर प्रदान करण्याची कारणेमिमांसा करता येत नव्हती.

MCGM ला BPCL कडून जकात कर संकलीत करण्यासाठी अजून पर्याय होते (i) ई-प्रदानाद्वारे, (ii) MCGM जकात कर नियम १९३५ च्या नियम २८ अंतर्गत चालू लेखा सुविधा (Account Current Facility) आणि (iii) इंदिरा गोदीत नियुक्त असलेल्या MCGM च्या कर्मचाऱ्यांनी BPCL कडून जकात कराचे धनादेश परस्पर संकलित करणे. तिसऱ्या पर्यायावर जरी MCGM च्या अतिरिक्त महापालिका आयुक्तांकडून डिसेंबर २००० मध्ये चर्चा केली गेली होती तरीही त्याची अंमलबजावणी झाली नव्हती.

हे प्रकरण शासनाला जुलै २०१४ मध्ये संदर्भित केले होते त्यांचे उत्तर मार्च २०१५ पर्यंत मध्ये प्रतिक्षेत होते.

**साक्ष :**

**७.३ परिच्छेद क्र. ५.२, 'टाळता येण्याजोग्या कमिशन भूगतान' :**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ५.२ 'टाळता येण्याजोग्या कमिशन भूगतान' यासंदर्भात अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ७ जून २०१६ रोजी नगरविकास विभागाच्या विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन १९५४ पासून सन २०१३ पर्यंत कर संकलनाबाबत सुरू असलेली व्यवस्था बंद करण्यात आली असती तर महानगरपालिकेचे लाखो रुपयाचे उत्पन्न वाचले असते, असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. विभागाकडून या संदर्भातील निर्णय घेण्यास एवढा विलंब का लावण्यात आला? यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत रस्ते, रेल्वे, समुद्र किंवा वायुमार्गाने प्रवेश केलेल्या वस्तुंवर जकात कर आकारला जातो. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनकडून (बीपीसीएल) समुद्रमार्गे क्रुड तेलाची आयात मुंबईच्या हद्दीत करण्यात येत होती व त्यांचे तेलाचे टँकर्स मुंबई पोर्ट ट्रस्टच्या (एमबीपीटी) गोदीत येत असत. या कारणासाठी बीपीसीएल महानगरपालिकेला आयात केलेल्या क्रुड तेलावर जकात कर देत होती. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून जकात कराचे निर्धारण झाल्यानंतर बीपीसीएलकडून जकात कराचे धनादेश बीपीटी च्या खिडकीवर जमा करण्यात येत होते. एमबीपीटी त्यानंतर हे जकात कराचे धनादेश महानगरपालिकेच्या बँक खात्यात जमा करीत असे. अशा प्रकारे एमबीपीटी ही महानगरपालिकेची कर संकलन एजंट म्हणून काम करीत होती. ज्यासाठी महानगरपालिकेकडून बीपीटीला ३ टक्के कमिशन प्रदान करण्यात येत होते. आता मात्र बीपीसीएलकडून जकात कराचे प्रदान थेट धनादेशाद्वारे महानगरपालिकेला करण्यात येत आहे व त्यामुळे बीपीटीला ३ टक्के कमिशन देण्याचे महानगरपालिकेने बंद केले आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, १९५४ च्या करारानुसार ही पद्धत सुरू होती. महालेखाकारांच्या मतानुसार सन २०१० किंवा २०११ पूर्वीच्या पद्धतीबाबत आक्षेप नाही. विभागाने मुंबई पोर्ट ट्रस्टशी पत्रव्यवहार करून क्रुड ऑईल वरील भारत पेट्रोलियमकडून मुंबई पोर्ट ट्रस्टकडे जमा करण्यात येणारे ३% कमिशन बंद करण्याची बाब २०११ पासून न करता सप्टेबर २०१३ पासून सुरू केलेली आहे. हे विभागाने सुरुवातीला केले असते तर बरे झाले असते असे मत समितीने व्यक्त केले. २०११ पासून डायरेक्ट पाईपलाईनने माहूलच्या रिफायनरीमध्ये क्रुड ऑईल जाते. त्यावर महालेखाकारांचा आक्षेप आहे की, हे विभागाने त्यावेळी केले असते तर २०१०-२०१३ दरम्यान कमिशनपोटी विभागास १०१ कोटी रुपयाचे झालेले आर्थिक नुकसान पहाता मुंबई पोर्ट ट्रस्टला कमिशन देण्याची गरज नव्हती. कारण २०११ पासून क्रुडऑईल डायरेक्ट पाईपलाईनद्वारे जात आहे. त्यामुळे त्यांना पैसे देण्याचे गरज काय? असा महालेखापालांचा आक्षेप असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मुलतः शेवटी या सर्व सुविधा, प्रवेश परवानगी, स्थान ह्या मुंबई पोर्ट ट्रस्टवर (एमबीपीटी) वर अवलंबून आहेत. आजही एमबीपीटीमध्ये महानगरपालिकेचे ऑफिस आहे. अजूनही तेथे महानगरपालिकेचे लोक बसतात. अजूनही मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेचा वापर करण्यात येतो. त्यामुळे एमबीपीटीच्या परवानगीशिवाय विभागास हे करता येत नाही. त्यामुळे त्यांच्याशी विभागाचा पत्रव्यवहार चालू होता.

विभागाची त्यावेळी अडचण होती, आजही विभागाची एक आस्थापना तेथे आहेच. जकात कराकरिता तेथे कर्मचारी लागणार आहेत. ती व्यवस्था विभागासाठी उपलब्ध आहेच. पण एमबीपीटीमधून डायरेक्ट पाईपलाईनद्वारे क्रुड ऑईल गेले तरी मुंबई पोर्ट ट्रस्टची काही भूमिका नसतानासुद्धा १०० कोटी रुपये नगरविकास विभागाने त्यांना दिलेले आहेत. हे पैसे वाचवीता आले असते हा महालेखाकारांचा आक्षेप आहे असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुलतः विभाग एमबीपीटीची सुविधा आजही वापरत आहे. ती शासकीय संस्था असल्यामुळे त्यांच्याबरोबर विभागास परस्पर कपात (कट) करता येत नाही. पत्र्यवहार व प्रक्रियेमध्ये वेळ लागल्यामुळे हे झालेले आहे. २०१३ पासून विभागाने त्यांच्याशी नवीन करार केलेला आहे. नवीन कराराप्रमाणे आता रक्कम बीपीसीएलकडून वसूल करण्यात येत आहे.

हा विषय क्रुड ऑईलच्या ऑक्ट्रायसंदर्भात असला तरी ऑक्ट्रायबाबत समितीने विचारणा केली की, श्री.सिताराम कुंटे हे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त असताना स्कॅनिंग मशीन बसविण्याचे ठरले होते. ते स्वप्न आता दुःस्वप्न झालेले आहे. ऑक्ट्राय नाक्यामुळे रस्त्यांची परिस्थिती अतिशय वाईट झालेली आहे. ऑक्ट्राय विषयामध्ये श्रीमती व्ही.राधा या जॉईंट कमीशनर यांना विभागास गमवावे लागले आहे. आजच्या परिस्थितीत ऑक्ट्रायमध्ये १०० टक्के ई-पेमेंट करण्याची आवश्यकता आहे. विभागाने कोणतीही चलने स्वीकारून नयेत. संपूर्ण भारत देश डिजीटलायझेशनवर चालला आहे. विभागाला ऑक्ट्रायची चोरी थांबवायची असेल तर १०० टक्के ई-पेमेंट करण्यात यावे. आयुक्तांच्या मतानुसार ई-पेमेंटची व्यवस्था आहे. पण समितीचे मत आहे की, विभागाने १०० टक्के ई-पेमेंट करावे. महानगरपालिका लावत असलेल्या दंडाचे प्रमाण खूप जबरदस्त आहे. महानगरपालिकेच्या दंडाच्या भितीने कोणी ऑक्ट्रायची चोरी करणार नाही. एक वेळ ऑक्ट्राय चुकविणारा हातात आला की तो सुटत नाही. त्याला सुटण्याचा मार्गच नाही. ती महानगरपालिकेची फुलप्रूफ यंत्रणा आहे. त्यामधून ज्यांना प्रयत्न करायचे ते करतात. पण विभागाने १०० टक्के ई-पेमेंट केले तर विभागाचा रेव्हेन्यूचा स्कोप प्रचंड वाढणार आहे. याबाबत सिस्टीम विभागाने स्वीकारली आहे की, केंद्र सरकारच्या एजन्सीला विभाग ३ टक्के देण्यात येतात व ९७ टक्के निधी महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा करण्यात येतो. याबाबत तंज्ञाकडून सल्ला घेण्यात यावा. मुंबई शहरातील सर्व ऑक्ट्रॉय नाक्यावर तुम्ही १०० टक्के ई-पेमेंटची सिस्टिम सुरू करावी. पेपर्स व बिले स्कॅनिंग होतात. त्याची प्रत वाहनाच्या आऊटसाईटला चिटकवली पाहिजे. जोपर्यत ते व्हेईकल मुंबईमध्ये मटेरीयल अनलोड करीत नाही तोपर्यत ती चिटकवलेली पावती पाहिली पाहिजे. नगरविकास विभागाचा अधिकारी कर्मचारी हा रस्त्यामध्ये कोठेही ते वाहन थांबवून ती चिटकवलेली पावती वाचू शकतो. आता डिजीटलायझेशनमध्ये ही सिस्टीम करण्याची फार आवश्यकता आहे. तसेच स्कॅनिंग मशीनही बसवावेत असे मत समितीने व्यक्त करून विचारणा केली की, कधीपासून १०० टक्के ई-पेमेंट करण्यात येणार आहे का? विभागाचा असा काही मानस आहे का? ऑक्ट्राय वसूलीच्या कार्यपद्धतीमुळे वाहतुकीवर खूप ताण पडतो व वाहतुक कोंडी होते. मुंबईच्या ऑक्ट्रायमुळे ठाणे शहराला त्रास होतो. ई-पेमेंट झाल्यास वाहतुकीमधील अडथळा नाहिसा होईल. ज्या दिवशी विभागाच्या व्हिजीलन्सच्या टीम दहिसर चेक नाका ते मलाडच्या मध्ये कोठे थांबल्या असतील तर त्या दिवशी वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील वाहतुक कोंडी (ट्रॅफिक जाम) वसईपर्यत चालू असते. कारण सर्व वाहने रस्त्याच्या कडेला लावली जातात. त्यांना पुढे जाण्यासाठी सिग्नलच मिळत नाही. यामुळे व्द्रुतगती मार्गावर वाहतुकीची कोंडी केली जाते. हे एक दिवसाचे नाही, कायमचे झाले आहे अशी वस्तुस्थिती समितीने विभागीय प्रतिनिधींच्या लक्षात आणून दिली.

विभागाने २०१३ पासून वेगळी व्यवस्था सुरू केली. २०११ पासून डायरेक्ट पाईपलाईनद्वारे क्रुड ऑईल जात आहे. विभागाने या व्यवस्था बसविण्याकरिता दोन-अडीच वर्षाचा विलंब केलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडून त्यांना १०१ कोटीचे कमिशन द्यावे लागले आहे. या विलंबाला जबाबदार कोण? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एमबीपीटी व नगरविकास विभाग अशा दोन शासकीय संस्था असल्यामुळे एमबीपीटीच्या कन्सेंटशिवाय परस्पर ते कमी करता येत नाही. आता एमबीपीटीला पैसे देणे बंद करण्याबाबत त्यांच्याबरोबर पत्रव्यवहार झालेला आहे. सुरुवातीस हे का केले नाही या महालेखाकारांच्या आक्षेपाबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याबाबत २०११ पासूनच पत्रव्यवहार चालू आहे. दोन वेगळ्या शासकीय संस्था असल्यामुळे वेळ लागला आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टची सहमती घेण्यामध्ये

वेळ लागला आहे. त्यांची सहमती मिळाल्यावर ताबडतोब म्हणजे २०१३ पासून ते बंद करण्यात आले आहे. यासंदर्भात विभागाने त्यांच्याकडून दिनांक ३०.९.२०१३ ला सहमती आलेली आहे. तेव्हापासून विभागाने परस्पर घेण्यास सुरूवात केलेली आहे.

विभागाच्या उत्तरामध्ये नमूद आहे की, विभाग इतर कोणत्याही त्रयस्थ पार्टीला कमिशन देत नाही. अगोदर एमबीपीटीला कमिशन देण्यात येत होते बाकी कोणाला कमिशन देत नाही. पण समितीच्या माहितीनुसार मुंबई महानगरपालिकेच्या इंदिरा गोदी या कार्यकेंद्रावरील मालावर जकात संकलनामध्ये ३ टक्के दराने मुंबई पोर्ट ट्रस्टला विभागाकडून कमिशन दिले जाते. त्याचप्रमाणे मध्य रेल्वेला सुद्धा ११ कोटीपर्यंत ४.५ टक्के व नंतर २ टक्के असे कमिशन दिले जाते. त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या मुलुंड या कार्यकेंद्रावरून जकात वसुलीसाठी काकड या कंपनीला ३ टक्के कमिशन दिले जाते. ही बाब समितीने विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिली व याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाकडील ज्ञापनात असे नमूद आहे की, विभागाकडून इतर त्रयस्थांना कमिशन देण्यात येत नाही. याबाबत अधिक खुलासा करताना त्यांनी स्पष्ट केले की, बीपीसीएलने आयात केलेल्या क्रुड तेलावरील जकातीच्या संकलनात मुंबई महानगरपालिकेने टाळता येण्याजोगे प्रदान केले आहे. याबाबत बीपीसीएलने आयात केलेल्या क्रुड ऑईलवर आता विभाग कोणत्याही त्रयस्थांना कमिशन देत नाही. परंतु त्याशिवाय मुंबई महानगरपालिकेच्या ज्या ठिकाणी सेंट्रल एजन्सी आहेत, ज्या ठिकाणी विभागास या एजन्सीवर अवलंबून राहावे लागते, ज्या ठिकाणी इतर रेग्युलेटरी एजन्सी त्या मालावर कंट्रोल ठेवतात किंवा टॅक्स वसूल करतात, त्या ठिकाणी केंद्र सरकारच्या एजन्सीने सिंगल विंडो सिस्टीम केलेली आहे व विभागाने त्यांच्याबरोबर करार केलेले आहेत. त्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या इंदिरा गोदीमध्ये क्रुड तेलाशिवाय जो माल येतो, त्या मालाबाबत इंदिरा गोदीकडून विभागाने करार केलेला आहे व विभागाकडून त्याच्यावर गोदीला ३ टक्के कमिशन देण्यात येत असते. This is in the interest of good administration and single window system. त्याचप्रमाणे विभागाने मध्य रेल्वेसोबत करार आहे, विभागाकडून रेल्वेला कराराप्रमाणे ३ टक्के कमिशन देण्यात येते. तशाच प्रकारे पश्चिम रेल्वेसोबत वेगळा करार केलेला आहे. पश्चिम रेल्वेस पहिल्या ११ कोटीपर्यंत ४.५ टक्के व त्यानंतर २ टक्के कमिशन विभागाकडून देण्यात येते. आयसीडी मुलुंडमध्ये येणाऱ्या मालावर ३ टक्के कमिशन देण्यात येते. याशिवाय मुंबई महानगरपालिकेच्या ऑक्ट्राय केंद्रामध्ये संकलन होते. ते संकलन मुंबई महानगरपालिकेत म्युनिसिपल बँकेमार्फत विभागाकडून थेट करण्यात येते. त्याकरिता त्यांना अर्धा टक्का कमिशन विभागाकडून देण्यात येते. मुलुंडमध्ये आयसीडीचा, कंटेनर कार्पोरेशन ऑफ इंडियांचा ड्राय डॉक आहे. तेथे माल येतो. त्यात रेल्वेची एक कंपनी आहे. इतरांबरोबर जसे विभागाने करारनामे केलेले आहेत, तसाच तेथे याबाबत करारनामा केलेला असून त्या कंपनीला ३ टक्के कमिशन देण्यात येते. यातून एक फायदा असा आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कर्मचारी वर्ग भरपूर कमी झालेला आहे. तसेच वेगळी संस्था या मालाला घेते व ते ॲसेसमेंट करते. उदा.कस्टम विभागाने जे ॲसेसमेंट केलेले आहे त्या ॲसेसमेंटचा विभागास वापर करता येतो. चेक अँड बॅलन्स आपोआप होत असतो. त्याबरोबरच सिंगल विंडोची सुविधा विभागाकडून आयातदाराला देण्यात येते. त्यामुळे in the good interest of administration ने या ठिकाणी काम चालू आहे.

स्कॅनिंग मशीन व १०० टक्के ई-पेमेंटबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने देशातील सर्वात प्रथम ऑक्ट्रायचे संगणकीकरण केलेले आहे. विभागाने ऑक्ट्रायचे सर्वात मोठ्या प्रमाणावर संगणकीकरण केलेले आहे. विभागाकडे ऑक्ट्रायचे सर्व रेकॉर्ड संगणकीकृत आहेत.

स्कॅनिंग करण्याबाबत विभागाचा मानस होता. परंतु आता भविष्यात याचे श्रेणीवाढ (upgradation) करावयाचे चालू आहे. १०० टक्के ई-पेमेंट करावयाचे असेल तर त्यामध्ये लहान लहान आयातदार असतात. त्यांच्याकडून हे सर्व करून घेण्यासाठी व चर्चा करण्यासाठी थोडा वेळ लागेल. त्यासाठी पूर्ण प्रक्रिया करावी लागेल व सिस्टीम अपग्रेड करावी लागेल. त्यासाठी विभागास गुंतवणूक करावी लागेल. स्कॅनिंगकरिता देखील विभागास गुंतवणूक करावी लागेल. आता वस्तु व सेवाकर (GST) येणार आहे. यानंतर ऑक्ट्राय रद्द होणार आहे. त्यामुळे ऑक्ट्रायच्या कामाकरिता बरीच गुंतवणूक केल्यास ती अनुत्पादक होईल म्हणून आतापर्यंत मोठी गुंतवणूक त्यामध्ये केलेली नाही.

ऑक्ट्रायच्या सिस्टीममध्ये बरेचसे बदल होणार अशा प्रकारची चर्चा बऱ्याच वर्षांपासून चालू आहे. सुरुवातीस ऑक्ट्राय रद्द करावयाचे चालू होते. त्यानंतर शासनाने ठरविले की, उपकर लागू करण्यात यावा. त्यानंतर स्थानिक संस्था कराचा विषय आला. त्यानंतर आता वस्तु व सेवा कर विधेयक अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे ऑक्ट्रायमध्ये पुढे श्रेणीवाढ (Upgradation) करण्यात आलेली नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

**७.४ परिच्छेद क्र. : 'टाळता येण्याजोगे कमिशन भुगतान'**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL) ने आयात केलेल्या क्रुड तेलावरील जकातीचे संकलनास बृहन्मुंबई महानगरपालिका (MCGM) अपयशी ठरल्यामुळे सन २०१० ते सन २०१३ दरम्यान कमिशनपोटी रु. १०१.३२ कोटी टाळता येण्याजोगे प्रदान केले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

**७.५** मुंबई महानगरपालिका कायदा, १८८८ च्या कलम १९२ (१) अंतर्गत मुंबई हद्दीत रस्ते, रेल्वे, समुद्र आणि वायु मार्गाने प्रवेश केलेल्या वस्तुंवर जकात कर आकारला जातो. BPCL समुद्रमार्गाने क्रुड तेलाची आयात मुंबई हद्दीत करीत होती आणि त्यांचे तेलाचे टँकर हे मुंबई पोर्ट ट्रस्ट (MBPT) अंतर्गत असलेल्या इंदिरा गोदीत नांगरुन ठेवत असत. याकरिता BPCL जकात कर देत होते. हा जकात कर प्रदान करण्याची व्यवस्था/प्रणाली किचकट असून मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून या जकात कर रकमेचे निर्धारण झाल्यानंतर BPCL या जकात कराचा धनादेश MBPT च्या खिडकीवर जमा करीत असे. MBPT या जकात कराचा धनादेश हा मुंबई महानगरपालिकेच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यामध्ये जमा करीत असे. यासाठी मुंबई महानगरपालिका MBPT ला एकूण संकलित केलेल्या जकात कराच्या रकमेवर ३% कमिशन प्रदान करीत होती. सन २०१० ते २०१३ दरम्यान मुंबई महानगरपालिकेने MBPT ला कमिशनपोटी प्रदान केलेली रु. १०१.३२ कोटीची रक्कम टाळता येण्याजोगी होती. हे प्रदान ई-प्रदानाद्वारे अथवा BPCL कडून मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याने परस्पर धनादेश संकलित करण्याचा पर्याय उपलब्ध होता. परंतु ते अवलंबिण्यात आले नसल्यामुळे फार मोठ्या रकमेचे प्रदान मुंबई महानगरपालिकेला मुंबई पोर्ट ट्रस्टला करावे लागले. ही कार्यपद्धती सन १९५४ च्या करारानुसार सन २०१० पर्यंत सुरू होती. परंतु नगरविकास विभागाने MBPT शी पत्रव्यवहार करून क्रुड तेलावरील BPCL कडून MBPT कडे जमा करण्यात येणाऱ्या जकातीच्या रकमेपैकी देय असणारे ३ % कमिशन सन २०१० मध्ये बंद करण्याचा निर्णय घेतला. अशा परिस्थितीत मुंबई महानगरपालिकेद्वारे मुंबई पोर्ट ट्रस्टला कमिशनचे प्रदान हे सन २०१० पासून बंद करणे आवश्यक असतानाही ते सन २०१३ पासून बंद करण्यात आले. सन २०११ पासून डायरेक्ट पाईपलाईनने माहुलच्या रिफायनरीमध्ये क्रुड ऑईल जाते. MBPT ला देण्यात येणारे कमिशन सन २०१० पासून बंद झालेले असतानाही सन २०१० ते २०१३ दरम्यान रु. १०१.३२ कोटी कमिशनपोटी MBPT ला प्रदान करण्यात आले, ज्याबाबत महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. याबाबत खुलासा करण्याबाबत विभागीय प्रतिनिधींना समितीने साक्षीदरम्यान सांगितले असता, या सर्व सुविधा, प्रवेश परवानगी, स्थान या MBPT वर अवलंबून असून अजूनही तेथे मुंबई महानगरपालिकेचे कार्यालय असून कर्मचारी तेथे बसतात व त्यांच्या जागेचा वापर करण्यात येतो. त्यामुळे MBPT च्या परवानगीशिवाय विभागास हे कमिशन बंद करता येत नसल्यामुळे त्यांचेशी पत्रव्यवहार सुरू होता. MBPT ही शासकीय संस्था असल्यामुळे एका शासकीय विभागाकडून दुसऱ्या शासकीय विभागास देय असणारी ही रक्कम विभागास परस्पर कपात करता येत नाही. त्यामुळे MBPT ची संमती घेणेकरिता पत्रव्यवहार करून सहमती घेण्याच्या प्रक्रियेमध्ये वेळ लागल्यामुळे हे प्रदान झालेले आहे. सन २०१३ पासून विभागाने त्यांचेशी नवीन करार केलेला असून आता BPCL कडून ही रक्कम थेट वसूल करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**७.६ वास्तविक सन २०१० नंतर हे कमिशन बंद करण्याचा निर्णय विभागाने घेतला व MBPT च्या सहमतीविना परस्पर हे कमिशन बंद करता येत नसल्यामुळे यास MBPT ची सहमती घेणे बाकी होते. हा घटनाक्रमच चुकीचा आहे असे समितीचे मत आहे. महानगरपालिका व मुंबई पोर्ट ट्रस्ट हे दोन्ही शासकीय विभाग आहेत व MBPT च्या सहमतीविना हे कमिशन थेट बंद करता येत नाही असे जर विभागाचे म्हणणे आहे तर विभागाने प्रथम MBPT ची सहमती घेऊन नंतरच कमिशन बंद करण्याचा निर्णय घेणे अपेक्षित होते. विभागाने प्रथम सन २०१० ला कमिशन बंद करण्याचा निर्णय घेऊन टाकला व त्यानंतर सहमतीसाठी पत्रव्यवहार करणे हे योग्य नाही. तसेच कमिशन बंद करणेबाबतचा निर्णय जर सहमतीसाठी प्रलंबित असता तर सन २०१० ते २०१३ चे कमिशनचे प्रदान करणे समर्थनीय ठरले असते. परंतु विभागाने निर्णय सन २०१० मध्येच घेतला होता व नंतर सहमतीसाठी पत्रव्यवहार करण्यात येत होता तर हे कमिशनचे प्रदान करण्याची आवश्यकता नव्हती व ते प्रदान प्रलंबित ठेवणे आवश्यक होते. महानगरपालिकेने हे प्रदान घाईने MBPT ला करण्याची गरज नव्हती. सन २०१३ ला MBPT ने विभागाच्या निर्णयास मान्यता दिली व या निर्णयाची अंमलबजावणी सन २०१० पासूनच होणे आवश्यक होते. परंतु तोपर्यंत महानगरपालिकेद्वारे सन २०१० ते २०१३ चे प्रदान करण्यात आले होते. अशा वेळी रु. १०१.३२ कोटीचे प्रदान महानगरपालिकेस टाळण्याजोगे होते या महालेखाकार यांचे अभिप्रायाशी समिती सहमत आहे. रु. १०१.३२ कोटी ही थोडीफार रक्कम नसून या निधीचा वापर मुंबई महानगरपालिकेला अन्य सार्वजनिक महत्त्वाच्या कामाकरिता करता आला असता. सन २०१३ मध्ये MBPT ने या निर्णयाला जरी सहमती दिली असली तरी या निर्णयाची अंमलबजावणी ही भुतलक्षी प्रभावाने म्हणजे सन २०१० पासून होणे वस्तुतः अपेक्षित होते. परंतु तरीही एकीकडे प्रदान बंद करणेबाबतचा पत्रव्यवहार करणे व दुसरीकडे प्रदानही करीत राहणे ही बाब नक्कीच समर्थनीय नाही. त्यामुळे महालेखाकारांनी या परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे योग्य असून मुंबई महानगरपालिकेला MBPT ला देण्यात आलेल्या ह्या मोठ्या रकमेचे प्रदान नियमानुसार व गुणवत्तेवर टाळता आले असते, असे समितीचे स्पष्ट मत आहे. या रकमेचे प्रदान अगोदरच करण्यात आलेले असल्यामुळे ही रक्कम आता महानगरपालिकेला परत घेता येऊ शकते काय याबाबतचा पुर्ण अभ्यास करून नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी. तसेच सन २०१० ला कमिशन बंद करण्याचा निर्णय विभागाने घेतलेला असतानाही व त्यानंतर MBPT च्या सहमतीसाठी बाब प्रलंबित असतानाही रु. १०१.३२ कोटी एवढ्या मोठ्या रकमेचे प्रदान MBPT ला करण्यास जबाबदार असणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट-अ

**मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०१६**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १.०० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(७) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(८) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१०) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स.

(११) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. श्री. चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय, मुंबई**

श्रीमती मिनाक्षी मिश्रा, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग, मंत्रालय**

श्रीमती मनिषा वर्मा, सचिव

**साक्षीदार :**

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. विकास खारगे, सचिव, वन विभाग

(३) डॉ. संजय कोलते, सह नों.मु.नि.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.२ संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग व सचिव, वन विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २ मार्च २०१६**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक २ मार्च २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री. संत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१०) श्री. वसंत चव्हाण, वि.स.स.

(११) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१२) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय, मुंबई**

श्रीमती मिनाक्षी मिश्रा, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग, मंत्रालय**

श्री. विजयकुमार, प्रधान सचिव

**साक्षीदार :**

**विभागीय प्रतिनिधी**

**ग्रामविकास विभाग**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**

श्री. राजेशकुमार, प्रधान सचिव

**नोंदणी महानिरीक्षक कार्यालय**

श्री. रामस्वामी, नोंदणी महानिरीक्षक

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.२ संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग व प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी १२९८—११ (८००—७-२०१७)

**मंगळवार, दिनांक ७ जून २०१६**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ७ जून २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स

(६) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री. संत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१०) श्री. वसंत चव्हाण, वि.स.स.

(११) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१२) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय, मुंबई**
श्रीमती ए. एस. लक्ष्मी, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग, मंत्रालय**
श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

**साक्षीदार :**

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. अजोय मेहता, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

(२) डॉ. संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

(३) श्री. संजय गोखले, उप सचिव, नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ५.२ संदर्भात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक ८ जून २०१६

## लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ८ जून २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी २.०० वाजता स्थगित झाली.

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(७) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(८) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(९) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१०) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(११) श्री. संत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(१४) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखापाल यांचे कार्यालय**

श्रीमती ए. एस. लक्ष्मी, प्रधान महालेखापाल

श्रीमती शीला जोग, महालेखापाल, नागपूर

**वित्त विभाग, मंत्रालय मुंबई.**

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

**साक्षीदार :**

**विभागीय प्रतिनिधी :**

**ग्रामविकास विभाग**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव

**सहकार विभाग**

श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.२ व २.३ संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास व सहकार विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ११ जुलै २०१७**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ११ जुलै २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायं. ४.३० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(४) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(५) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(११) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(१२) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला.

## गुरुवार, दिनांक १३ जुलै २०१७

## लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १३ जुलै २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी २.०० वाजता स्थगित झाली.

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(४) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(५) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(६) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(७) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई